KANE POORMIMASPADTICHA ITIHAS (HINDI)

IGNCA

SKC-?
181.42
KAN

शिक्षण-प्रसारक-मंडळी

# मीमांसाविद्यालय.

पुस्तक नं. २.

# पूर्वमीमांसापद्धतीचा इतिहास.

निबंधलेखक ( इंग्रजींत. )
रा. पां. वा. काणे एम्. ए. एल्‌एल्. एम्.
हायकोर्ट वकील मुंबई.

या निबंधाचें पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे, बी. ए. एल्‌एल्. एम्.
वकील उमरावती यांनीं मराठींत पूर्वमीमांसा विद्यालया-
करितां रूपांतर केलें.

१९२५.

81·4

Indira Gandhi National Centre for the Arts

SUNITIKUMAR COLLECTION
Acc. No..........
Date..........
CALCUTTA-29

Indira Gandhi National
Centre for the Arts

# प्रकाशकाचे दोन शब्द.

मुंबईचे प्रसिद्ध पंडित रा. पां. वा. काणे यांनीं शिक्षणप्रसारकमंडळीचे मीमांसा-विद्यालयमंदिराचा प्रवेशसमारंभ करतेवेळीं जो सुश्राव्य आणि विद्वत्ताप्रचुर निबंध इंग्रजींत वाचला तो मराठी वाचकांस उपलब्ध व्हावा या हेतूनें आज प्रसिद्ध करीत आहोंत. निबंधाचें भाषांतर उमरावतीचे विद्वान् रा. पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे, B. A., LL. M. यांनीं विद्यालयाचे विनंतीवरून हौसेनें करून दिलें याबद्दल त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतों. या कामीं लागणारा खर्च मुंबईचे रा. रा. विश्वनाथपंत साळवेकर यांनीं उदारपणानें दिला याबद्दल त्यांचेही आभार मानणें आमचें कर्तव्य आहे. रा. काणे यांनीं सदर भाषांतर पाहून पसंत केलें आहे. आणि प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली याबद्दल त्यांचेही आभार मानले पाहिजेत.

रा. काणे यांचा निबंध सर्वत्र वाखाणला जात आहे. आणि काशी येथील हिंदु वि. विद्यालयानें तो त्या विषयांतील उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत प्रविष्ट केला आहे.

प्रस्तुत निबंध गुजराथी, हिंदी वगैरे देशी भाषांत आणि संस्कृतांतही प्रसिद्ध करावा असा विचार आहे. आणि अवश्य तें सहाय्य मिळेल तर विद्यालय तशी योजना आनंदानें करील.

विद्यालयाची सेवा मंडळींनीं गोड करून घ्यावी.

मीमांसाविद्यालय पुणें
मिति श्रा. शु. १५

दिनकर बळवंत देवधर.

Indira Gandhi National
Centre for the Arts

I.G N.C.A. LIB.
S-12387
Deptt of Arts
GOVT. OF INDIA

MAR
181.42
KAN

451

SV05

Indira Gandhi National
Centre for the Arts

# प्रस्तावना.

पुणें येथील शिक्षणप्रसारक मंडळीनें स्थापन केलेल्या व सरस्वतीभूषण वामनशास्त्री किंजवडेकर यांच्यासारखा अधिकारी व विद्वान् पुरुष नेता लाभलेल्या मीमांसाविद्यालयाचे अनावरणप्रसंगीं मुंबईचे प्रख्यात कायदेपंडित रा. रा. काणे एम्. ए. एलूएल्. एम्. यांचें पूर्वमीमांसाशास्त्र म्हणजे काय या विषयावर विचारपरिप्लुत व ओजस्वी असें इंग्रजींत भाषण झालें. हें भाषण विद्यालयानें छापवून प्रसिद्धही केलें आहे. रा. काणे यांचें भाषण इंग्रजींत असल्यामुळें महाराष्ट्रांतील बऱ्याच इंग्रजी न समजणाऱ्या लोकांना तें समजणार नाहीं, व त्यामुळें मीमांसाशास्त्राचा इतिहास समजून घेण्याची इच्छा असून सुद्धां ती इच्छा त्यांना पूर्ण करून घेतां येणार नाहीं हें जाणून सरस्वतीभूषण किंजवडेकर शास्त्रीबुवांनीं मला रा. काणे यांच्या वर निर्दिष्ट केलेल्या भाषणाचें मराठींत रूपांतर करावयास सुचविलें व माझ्यांत हें काम करण्याची पात्रता नाहीं हें ध्यानांत असून सुद्धां शास्त्रीबुवांच्या आज्ञेला मान देण्याकरतां मीं हें काम हातीं घेतलें. रा. काणे यांच्यासारख्या विद्वानांचें मीमांसाशास्त्रावरील भाषण म्हणजे वाचकांना विचाररूपी पक्वान्नांची नुसती मेजवानी आहे, या ठिकाणीं मी नुसतें वाढण्याचें काम करीत आहें. माझी ही अल्पशी सेवा महाराष्ट्रांतील सहृदय वाचकवर्ग मान्य करून घेईल अशी मला उमेद आहे.

शिक्षणप्रसारक मंडळीनें मीमांसाविद्यालय स्थापन केलें, तें कां? स. भू. किंजवडेकर शास्त्री व तपस्वी बाबासाहेब परांजपे यांच्यासारखे विद्वान् पुरुष या विद्यालयाकरतां अविश्रांत श्रम करतात; मुंबईचे दानशूर शेट पुरुषोत्तमदास जीवनदास यांच्यासारखे लक्ष्मीपुत्र या विद्यालयास २१००० रुपयांची देणगी देतात. रा. पां. वा. काणे, एलएल. एम्., श्रीमंत दादासाहेब खापर्डे, रा. अगे, डॉ. काणे प्रभृति, डॉ. गंगानाथ झा, रा. जयकर,

रा. भोपटकर यांच्यासारखे अधिकारी पुरुष या विद्यालयास यश यावें म्हणून खटपट करतात, असें मीमांसाविद्यालयांत श्रेष्ठत्व तें काय आहे? मीमांसाशास्त्र हें काय प्रकरण आहे अशा तऱ्हेचे नानातऱ्हेचे प्रश्न सामान्य वाचकांपुढें प्रामुख्यानें उभे रहातात व त्याच प्रश्नांचा येथें थोडक्यांत विचार करण्याचें मीं यथामति योजिलें आहे.

मीमांसाशास्त्रासंबंधी सध्यां जेवढे गैरसमज पसरले आहेत तेवढे कोणच्याही इतर शास्त्रासंबंधी पसरलेले नाहींत. मीमांसाशास्त्र म्हणजे काय हें पूर्णपणें समजून न घेतां त्याचा एकांगीच विचार केल्यामुळें त्या शास्त्रासंबंधी मोठमोठ्या विद्वानांची सुद्धां दिशाभूल झालेली आहे. तेव्हां आतां आपण मीमांसाशास्त्र ह्मणजे काय हें येथें थोडक्यांत पाहूं या. तसेंच या शास्त्राचे उपयोगही काय आहेत हें आपण नीटपणें समजून घेतल्यास मीमांसाशास्त्राचें महत्त्व किती आहे हें आपल्या लवकर लक्षांत येईल. हे उपयोग सामान्य वाचकांचे लक्षांत आल्यास त्या उपयोगाचा सदुपयोग केला जाईल. हें जाणून त्या विषयाचा थोडक्यांत विचार करावयाचें येथें योजिलें आहे.

**उपयोग पहिला:**—व्यवहारांत मनुष्याला आपले विचार स्पष्टपणें दुसऱ्याला सांगणें हें जितकें जरूर पडतें तितकेंच दुसऱ्याचे विचार आपण समजून घेणें हेंही जरूर पडतें. विचारविनिमय केल्याशिवाय जगाची उन्नति होणेंच अशक्य आहे आणि हें जाणून आपले विचार सुसंघटितपणें व ओजस्वी रीतीनें दुसऱ्याला कसे सांगावेत याचा मनुष्य नेहमीं विचार करीत असतो. आपले विचार दुसऱ्याला सांगतांना मनुष्य शब्दांचें संघटन करून ते वाक्यरूपानें दुसऱ्याला सांगत असतो. तेव्हां वाक्यें यावयाला लागलीं कीं मनुष्य कांहीं तरी विशिष्ट हेतु मनांत धरून बोलत आहे असें समजावयास हरकत नाहीं. म्हणूनच सर्व शास्त्रें वाक्यस्वरूप आहेत. आपल्या इकडील वेद, षड्दर्शनें, वेदांगें, इतिहास, पुराणें, इत्यादि ग्रंथ वाक्यस्वरूपीच आहे. त्याचप्रमाणें पूर्वमीमांसा हा ग्रंथही वाक्यस्वरूपच आहे. ह्या वाक्यांचा अर्थ याथातथ्य कसा समजून

Indira Gandhi National Centre for the Arts

द्यावा ही गोष्ट मीमांसाशास्त्र आपल्यास शिकवितें, या दृष्टीनें मीमांसाशास्त्राचा मनुष्याला प्रत्येक घटकेला व्यवहारांतही कसा उपयोग होणें सक्य आहे हें वाचकांच्या तत्काल लक्षांत येईल.

एकदां वाक्यसमूहासंबंधानें आपण विचार करूं लागलों, कीं त्या वाक्यांत प्रधानशब्द कोणचा, गौणशब्द कोणचा हें मनुष्यानें समजून घ्यावें लागतें. वाक्यांत सर्वच शब्द लिहिलेले असतात. या शब्दांपैकीं वाक्यार्थ पूर्ण होण्याला कोणच्या शब्दांची जरूरी आहे तें पहावें लागतें. या शब्दाचे अर्थावरच श्रोत्याला किंवा वाचकाला जोर द्यावा लागतो. या न्यायाला संस्कृतमध्यें " फलवत्संनिधौयद्फलंतदंगम् " असा न्याय म्हणतात. तेव्हां वाक्यांतील प्रधान शब्द व त्यांचें महत्त्व कसें ओळखावें हें आपल्याला मीमांसाशास्त्र शिकवितें.

**उपयोग दुसरा:**—पुष्कळ वेळां एखादी गोष्ट सांगितली जाते त्याचा अर्थच नीटपणें वाचकांच्या लक्षांत येत नाहीं. याचें कारण त्यांना त्या शब्दांचा अर्थ समजत नसतो असें नव्हे, पण तो कशा तऱ्हेनें समजायचा हें समजत नसतें हें होय. इसापनीतींतील गोष्टींत आपण पशुपक्षी बोलतात असें वाचतों. तेव्हां त्यापैकीं एखादी गोष्ट वाचून पशुपक्षी बोलणें ज्या अर्थी अशक्य आहे त्या अर्थी अशा तऱ्हेच्या गोष्टी लिहिणें मूर्खपणाचें आहे असें जर कोणी म्हणूं लागला तर तें शहाणपणाचें होणार नाहीं.. " यत्पर शब्दः स शब्दार्थः" असें एक वचन आहे. म्हणजे मनुष्यानें वाक्यांचें नेहमीं तात्पर्य लक्षांत घेऊन त्याप्रमाणें वाक्यांची संगति लावावी. हें तात्पर्य कां व कसें शोधून काढावयाचें हें आपल्याला पूर्वमीमांसाशास्त्र शिकवितें.

**उपयोग तिसरा:**—" अनेकार्थत्वं अन्याय्यम् " असें मीमांसाशास्त्र म्हणतें. आपल्याला दुसऱ्याचे विचार याथातथ्य रीतीनें समजायला पाहिजे असतील तर बोलणारा ज्या अर्थानें एखादा शब्द उपयोगांत आणीत असेल त्याच अर्थानें ऐकणाऱ्यानें त्याचा अर्थ घेतला पाहिजे हें उघड आहे. पण पुष्कळ वेळां एकाच शब्दाचे निरानिराळे अर्थ होतात. ' हरि ' या शब्दाचे

Indira Gandhi National
Centre for the Arts

‘ सिंह ’ घोडा, ‘ माकड ’ व ‘ विष्णु ’ असे चार अर्थ आहेत. तेव्हां ‘ हरिं आरुह्य ’ असें जर एखादा म्हणाला असेल तर त्याचा उद्देश समजणें फार जड जाईल. घोड्यावर बसून किंवा सिंहावर बसून हें कसें समजायचें ? ही अडचण ग्रंथ लावतांना येईल व त्यामुळें ग्रंथकारांत व ग्रंथ लावणारांत निष्कारण गैरसमज होण्याचा संभव असतो.

एकाच शब्दाचे दोन किंवा जास्त अर्थ केले जातात याचीं मुख्य कारणें दोन आहेत. पहिलें कारण कोणच्याही भाषेंत शब्दसमूह जर कमी असेल तर ती भाषा बोलणारांना एकाच शब्दाला दोन अर्थ देणें जरूर पडतें. भाषा जितकी जितकी विस्तृत होत जाईल तितका तितका त्या भाषेंतील शब्दसंग्रह वाढत जाईल हें निर्विवाद आहे. आणि म्हणून भाषावृद्धि करून एक शब्द एकाच अर्थानें वापरावा असें मीमांसाशास्त्राचें मत आहे.

एकाच शब्दाचे निरनिराळे अर्थ करून त्याप्रमाणें ते भाषेंत रूढ करणें हें अलंकारशास्त्रांचें ध्येय आहे. अशा तऱ्हेचे शब्दप्रयोग काव्यांत गोड दिसत असतील, अशा तऱ्हेचे शब्दप्रयोग कवींना खुलवीत असतील, अशा तऱ्हेचे शब्दप्रयोग काव्यमर्मज्ञांना झुलवीत असतील. ह्या सर्व गोष्टी खऱ्या; पण अर्थाच्या दृष्टीनें असे शब्दप्रयोग भाषेंत नसता घोटाळा उत्पन्न करून शब्दांच्या अर्थासंबंधानें विनाकारण वाद माजवून शास्त्रार्थ समजून घेण्याचे मार्गांत जबरदस्त अडथळे आणतात हेंही तितकेंच खरें आहे. आणि जगांत रहावयाचें म्हटलें म्हणजे काव्याची गोडी चाखीत बसण्यापेक्षां व्यवहारोपयोगी शास्त्रें हस्तगत करून घेणें जास्त श्रेयस्कर आहे हें विचारान्तीं वाचकांना सहज पटण्यासारखें आहे. तात्पर्य अलंकारशास्त्राच्या नादीं वाजवीपेक्षां जास्त न लागतां भाषेचा शब्दकोश वाढवून एकाच शब्दाचा एकच अर्थ करणें किती व कसें जरूर आहे हें शास्त्रोपयोगी तत्त्व मीमांसाशास्त्र आपल्याला शिकवितें.

**उपयोग चवथा:**—प्रत्येक मनुष्याला जन्माला येऊन पारमार्थिक दृष्ट्या कांहींही करावें असें स्वभावत:च वाटत असतें. मनुष्यमात्रांत दिसून

Indira Gandhi National Centre for the Arts

येणारी ही धार्मिक बुद्धि अव्यवस्थित राहूं नये म्हणून मीमांसाशास्त्रानें फार खबरदारी घेतली आहे. या शास्त्रांत धर्म म्हणजे काय हें समजून घेण्याला वाचकांना पूर्ण मुभा दिली आहे. अशा तऱ्हेची मुभा दुसऱ्या कोणच्याही शास्त्रांनीं दिली नाहीं हें येथें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. धर्मांत आचाराचा समावेश होतो. तेव्हां हें शास्त्र न समजतां धार्मिक ग्रंथ समजणें शक्य नाहीं. मनु याज्ञवल्क्य हे वेदांतील विधिनिषेधव्यतिरिक्त भागावरून सिद्ध झालेला आचार सांगतात. धर्मसूत्रें हीं सामयिकधर्म सांगतात, बहुतेक स्मृति व्यवहारावरच खर्चीं पडल्या आहेत. हे सर्व ग्रंथ धर्म असा आहे म्हणून सांगतात या मुळें संस्कृत भाषेंतील प्रत्येक ग्रंथ धर्मशास्त्रच सांगत असला पाहिजे, व त्यांतील वचनें आपण प्रमाण मानलींच पाहिजेत अशा मताचे कांहीं लोक बनतात. मीमांसाशास्त्राला ही बाबावाक्यं प्रमाणं पद्धति पसंत नाहीं. रूढी व शास्त्र या दोहोंमधील फरक मीमांसाशास्त्र विशद करून सांगतें. मीमांसाशास्त्राची ही कल्पना कुमारिल भट्टानें अत्यंत सोप्या तऱ्हेनें श्लोकवार्तिकांत सांगितली आहे. ते श्लोक येथें देणें अप्रस्तुत होणार नाहीं अशा कल्पनेनें खालीं देत आहें.

धर्माख्यं विषयं वक्तुं मीमांसायाः प्रयोजनम् ।
मीमांसाख्या तु विद्येयं बहुविद्यान्तराश्रिता ॥ १ ॥

मीमांसायां त्विहाज्ञाते दुर्ज्ञाते वाऽविवेकतः ।
न्यायमार्गे महान्दोष इति यत्नोपचर्यता ॥ २ ॥

यथा धर्मावबोधस्य प्रमाणं वैदिकं वचः ।
तदर्थनिर्णये हेतुर्जैमिनीयं तथैव नः ॥ ३ ॥

स्थिते वेदप्रमाणत्वे पुनर्वाक्यार्थनिर्णये ।
मातिर्बहुविदां पुंसां संशयान्नोपजायते ॥ ४ ॥

केचिदाहुरसावर्थः केचिन्नासावयंत्विति
तन्निर्णयार्थमप्येतत्परं शास्त्रं प्रणीयते ॥ ५ ॥

Indira Gandhi National
Centre for the Arts

प्रायेणैव हि मीमांसा लोके लोकायती कृता ।
तामास्तिकपथे कर्तुमयं यत्नः कृतो मया ॥

कुमारिलानें वर मीमांसाशास्त्राचे कित्येक उपयोग सांगितले आहेत. त्यांत धर्म म्हणजे काय हें समजण्याकरतां हें शास्त्र आपल्याला विचार करावयाला लावतें असें म्हटलें आहे. या ठिकाणीं धर्म हा शब्द फारच व्यापक अर्थानें उपयोगांत आणला आहे पारमार्थिक गोष्टींचा विचार करणें येवढाच धर्म या शब्दाचा संकुचित अर्थ नव्हे हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. सर्व मनुष्यजात सुखानें नांदावी, व तिची उन्नति व्हावी हा हेतु मनांत धरून त्या हेतूच्या अनुरोधानें मनुष्यानें अमूक एक रीतीनें वागावें, किंवा अमूक एक रीतीनें वागूं नये अशासंबंधीं जे नियम केले जातात त्यांना धर्म अशी संज्ञा आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे मीमांसाशास्त्र हें मनुष्याला पारमार्थिक गोष्टींचा व तसेंच व्यवहारांत संबंध येणाऱ्या गोष्टींचा विचार करण्याची दिशा दाखवितें. मीमांसाशास्त्र हें शब्दांना प्रमाण मानतें हें खरें, पण सत्य काय तें शास्त्रांतच आहे असें हें शास्त्र समजत नाहीं. हें शास्त्र मनुष्याला स्वतंत्रपणें विचार करावयाला शिकवितें आणि हेंच या शास्त्राचें वैशिष्ट्य आहे.

**उपयोग पांचवा:**—निरनिराळ्या शास्त्रांतील प्रमेयें घेऊन त्यांच्यांतून सामान्य सिद्धान्त व विशेष सिद्धान्त कसे काढावयाचे हें आपल्याला मीमांसाशास्त्र शिकवितें. मीमांसाशास्त्राचा हा पांचवा महत्त्वाचा उपयोग आहे. मीमांसाशास्त्राचा अशा तऱ्हेनें उपयोग करूनच वेदांतशास्त्रावर ग्रंथरचना करणारे लोक ( उदाहरणार्थ शंकर, रामानुज, वल्लभ, माध्वादि ) आचार्य या पदवीला पोंचले. मीमांसाशास्त्र ह्मणजे ज्याला आपण रोजच्या व्यवहारांत तर्कशास्त्र ह्मणतों तें नव्हे. कारण तर्कशास्त्रांतील ( Logic ) व्याप्ति ( Premises ) भौतिक शास्त्रांतीलच असतात. मीमांसाशास्त्राचा अधिकार वर सांगिलेल्या तर्कशास्त्रापेक्षां किती तरी व्यापक आहे.

Indira Gandhi National
Centre for the Arts

मीमांसाशास्त्राचे मतें ‘ शब्द ’ हा नित्य, अनादि व स्वयंभू आहे, हा या शास्त्रांतील नुसता सिद्धान्त येथें सांगितलेला आहे हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. कोणचाही जडसृष्टींतील प्राणी घ्या. ता पाहिल्या प्रथम शब्द करतो. मनुष्यप्राण्याची जसजशी मानसिक उन्नति होत गेली तसतसा पवित्रपणानें वागणाऱ्या अशा ऋषींचा एक वर्ग उदयास येऊं लागला. कोणच्याहि आधिभौतिक शास्त्राचें बंधन स्वतःवर लादून न घेतां, हे ऋषि शुचिर्भूत मनानें, व निःपक्षपातीपणानें विचार करूं लागले. त्यामुळें त्यांच्या विचाराला पावित्र्य आलें आणि ह्मणूनच ह्या ऋषींना एके ठिकाणीं ‘ साक्षात्कृतधर्माणः ’ असें म्हटलें आहे. ऋषींचे हे जे पवित्र शब्द व ह्या शब्दांत सांगितलेले जे ओजस्वी विचार ह्यांनाच मीमांसाशास्त्र प्रमाण मानतें. हे शब्द म्हणजेच वेद होत. हे शब्द प्राचीन आहेत, प्रमाण आहेत, व ओजस्वी आहेत असें मीमांसाशास्त्र ह्मणतें. याच मताचा अनुवाद कै. लोकमान्यांनीं आपल्या ओरायन ( Orian ) व आर्टिक होम ऑफ दि वेदाज् ( Artic Home of the Vedas) या ग्रंथांत केलेला आहे.

भगवद्गीतेंतही “ तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ” असें १६ व्या अध्यायांत वचन आहे. ह्या वचनासंबंधानें लिहितांना कै. लोकमान्यांनीं आपल्या जगद्वंद्य गीतारहस्यग्रंथांत खालीलप्रमाणें उद्गार काढले आहेत. “अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे धर्मकर्माचें किंवा कर्मधर्माचें हें एक स्वतंत्र शास्त्र असून न्यायव्याकरणापेक्षांही तें गहन आहे असें दिसून येतें. नीति हा शब्द जुन्या ग्रंथांतून प्रायः राजनीतिशास्त्रास लावण्यांत येत असून कर्तव्याकर्तव्यशास्त्रास धर्मशास्त्र असें ह्मणण्याची प्राचीन पद्धति आहे.” ( गीतारहस्य पृ. ४९ चवथी आवृत्ति ) यावरून आपल्याला असें दिसून येईल कीं, कै. लोकमान्यांनासुद्धां धर्मशास्त्र व मीमांसाशास्त्र हे दोन शब्द समानार्थी वापरण्यांत चूक वाटत नव्हती. मनुष्याच्या एकंदर वागणुकीसंबंधानें जें शास्त्र इतका विचार करतें तें प्रत्येक सुशिक्षित मनुष्याला तरी निदान माहिती असणें जरूर आहे व म्हणूनच या शास्त्राचें येवढें महत्त्व

Indira Gandhi National Centre for the Arts

आहे. दुर्दैवानें या शास्त्राची फारच हेळसांड झाली आहे, व बहुतेक लोक या शास्त्राविषयीं उदासीन किंवा विरोधी आहेत. ही उदासीनता दूर व्हावी व या शास्त्राचें एवढें महत्त्व सर्वांना कळावें, व ज्यांना या शास्त्राचें अध्ययन करावें अशी इच्छा असेल, त्यांची सोय व्हावी म्हणून हें विद्यालय शिक्षणप्रसारक मंडळीनें स्थापन केलें आहे.

उपयोग ६ वा:—वेद हे प्राचीन आहेत असें प्रस्थापित केल्यानंतर मीमांसकांनीं वेदांचे निरनिराळे पाठ गोळा केले, व त्यांचे सुसंगत असे अर्थ लावले. ही संगति लावीत असतांना त्यांना सकृत्‌दर्शनी विरोधी अशीं कित्येक स्थळें आढळलीं. त्यांचा सुसंगत अर्थ लावतांना मीमांसकांनीं कित्येक स्पष्टीकरणाचे नियम शोधून काढले. ह्या नियमांना इंग्रजींत Rules of Interpretation असें म्हणतात. कर्ममार्गासंबंधींही कांहीं नियम (Rituals) मीमांसकांनीं घालून दिलेले आहेत. आणि हे नियम आजच्या कोणच्याही न्यायशास्त्रज्ञ व तर्कशास्त्रज्ञ विद्वानाला आश्चर्य वाटावयाला लावतील इतके स्पष्ट व सहज समजण्यासारखे आहेत. मीमांसाशास्त्रांतील स्पष्टीकरणाचे नियम तर सर्व प्रसिद्धच आहेत.

वर आपण मीमांसाशास्त्रांत स्पष्टीकरणाचे जे नियम आहेत म्हणून ह्मटलें आहे त्या नियमांचा हिंदु कायदा समजून घेतांना फार उपयोग होतो. निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे हे नियम न समजल्यामुळें हिंदु कायद्याचें खरें स्वरूप, व त्याचा अर्थ चांगल्या रीतीनें समजूंच शकत नाहीं. बालासूच्या दत्तकसंबंधी प्रसिद्ध असलेल्या खटल्यांत हीच गोष्ट स्पष्ट होते. एकुलता एक मुलगा दत्तक देणें कायदेशीर आहे कीं नाहीं हा मुद्दा त्या खटल्यांत न्यायाधिशांचे समोर होता. " नैकं पुत्रं दद्यात् न गृह्णीयाच्च स हि संतानाय पूर्वेषां" या वचनाचे आधारें अशा तऱ्हेचें दत्तविधान जरी योग्य व इष्ट समजलें न गेलें तरी तें बेकायदेशीर होऊं शकत नाहीं असा प्री. व्ही. कौन्सिलनें निकाल दिला. वरील धर्मशास्त्राचा अर्थ लावतांना

(१) गौतमप्रणीत. (२) कणादप्रणीत.

मीमांसाशास्त्रांतील स्पष्टीकरणाचे नियम दुर्दैवानें पाळले गेले नाहींत. ते जर पाळले गेले असते तर वरील प्रमाणें प्रीव्ही कौन्सिलचा ठराव झाला नसता असें बऱ्याच प्रसिद्ध कायदेपंडितांचें मत आहे. एकंदरींत कायदेपंडितांना हिंदू कायद्याचा अर्थ लावतांना मीमांसाशास्त्राची माहिती असणें जरूर आहे हें निर्विवाद आहे दुर्दैवानें सध्यांच्या वकीलवर्गाचें या शास्त्राकडे अत्यंत दुर्लक्ष झालें आहे व त्यामुळें हिंदुकायद्याचें स्वरूप दिवसेंदिवस जास्त विकृत असें होऊं लागलें आहे.

मीमांसाशास्त्रांतील स्पष्टीकरणाचे नियम हे सडेतोड व बिनचूक कसे आहेत व त्यांचा उपयोग करून घेणें कायदेपंडितांना किती जरूर आहे हें वर पाहिलेंच आहे. पण येवढ्यानेंच झालें नाहीं. हे नियम अगदीं थोडक्यांत आपण सांगितलेले असून अर्थपूर्ण असे आहेत. Ex antecedentibus ct consequentibns fit optima interpretatio हा एक पाश्चात्यांचा स्पष्टीकरणाचा लॅटिन भाषेंतील नियम आहे. या नियमाचा अर्थ 'कोणच्याहि वाक्याचा अगर वाक्यसमूहाचा अर्थ लावतांना त्यांचेमागें येणारीं व पुढें येणारीं वाक्यें विचारांत घ्यावींत' असा आहे. येवढा लांबलचक अर्थ मीमांसाशास्त्रांतील उभयाकांक्षा या लहानशा वचनांत आलेला आहे, त्याचप्रमाणें Salus Populi Suprema Sex ह्या नियमाचा अर्थ कायद्याचा हेतु लोककल्याण हा असावा असा आहे. हा अर्थ "अर्थो धर्मः" या वचनावरून आपल्याला कळतो अशा तऱ्हेचीं अनेक उदाहरणें श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांनीं विद्यालयाचें अनावरणप्रसंगीं पाठविलेल्या संदेशांत दिलेलीं आहेत, तेव्हां त्या सर्वांचा पुनरुच्चार करण्याची जरूरी नाहीं, व स्थलाभावामुळें आपल्याला तसें करतांही येत नाहीं. असो.

वरील विवेचनावरून आपल्या रोजच्या व्यवहारांत सुद्धां कायदा समजण्याकरतां मीमांसा शास्त्राची किती जरूरी आहे व आपली पूर्वपरंपरा कायम राखण्याकरतां त्या शास्त्राचें अध्ययन करणें व त्यांत शोध लावून त्यांचे

Indira Gandhi National Centre for the Arts

आधारें हिंदु कायद्याचें खरें मर्म लोकांना समजून देणें किती अगत्याचें आहे हें आपल्या लवकर ध्यानांत येईल.

मीमांसा शास्त्र हें इतकें उपयुक्त शास्त्र असून सुद्धां त्यावर अनेक आक्षेप घेतले जातात त्यांपैकीं एकदोन आक्षेपांचा येथें विचार करणें अनाठायीं होणार नाहीं.

**आक्षेप पहिला:—**" पौरोहित्येन चरतां " म्हणजे पुरोहितपणावर उपजीविका करणाऱ्या लोकांचें हें शास्त्र आहे. म्हणून हें, हवन ज्यांना करण्याची जरूरी नाहीं, त्यांना हें शास्त्र शिकण्याचीही जरूर नाहीं, असा आक्षेप या शास्त्राविरुद्ध घेतला जातो. या शास्त्रांत जीं उदाहरणें घेतलीं आहेत तीं बहुतेक यज्ञयागासंबंधीं आहेत हें सारें गैरसमाजाचें कारण आहे. पण या शास्त्रांतील उदाहरणें यज्ञयागामधून घेतलीं आहेत म्हणून हें शास्त्रच पुरोहितांचें आहे असें अनुमान निघूं शकत नाहीं. हीं उदाहरणें यज्ञकर्मांतीलच कां घेतलीं याला पुष्कळ कारणें आहेत. कोणच्याही शास्त्रांतील उदाहरणें विद्यार्थ्याला समजतील अशीं असावीं लागतात. मीमांसाशास्त्र लिहिलें गेलें त्या वेळीं भारतवर्षांत चोहोंकडे यज्ञकर्में होत होतीं. मीमांसाशास्त्राचे विद्यार्थी अगोदरच विद्वान् असल्याकारणानें त्यांना यज्ञकर्मांची पूर्ण माहिती खात्रीनें असे. तेव्हां ह्या विद्यार्थ्यांना समजण्यास सोपें जावें म्हणून त्यांच्या पूर्णपरिचयांत असलेल्या यज्ञकर्मांतील उदाहरणें मीमांसाकारांनी दिली यांत कोठें बिघडलें ?

"**अविशिष्टस्तु वाक्यार्थः** " असें जैमिनीचें वचन आहे. वाक्यांची किंमत त्यांच्या अर्थावरून ठरवावयाची; त्यांत उदाहरणें कोठलीं आहेत यावरून ठरवावयाची नाहीं. साखर ही जांवयाकरतां आणली म्हणजे ती गोड लागते व तीच अनाहूत व आपल्याला नको असलेल्या पाहुण्याकरितां उपयोगांत आणली म्हणजे ती कडू लागते असें थोडेंच आहे. साखर ती साखरच. गोडी असणें हा तिचा अंगभूत गुण आहे. मग ती कोणाकरितांही कां आणलेली असेना. मीमांसाशास्त्रांत यज्ञकर्मांतील उदाहरणें जरी असलीं तरी व्यवहारांत सुद्धां त्याचा किती उपयोग आहे. कायदा समजण्याकरतां

Indira Gandhi National
Centre for the Arts

कायदेपंडित व न्यायाधीश यांना तें शास्त्र येत असणें किती अगत्याचें आहे हें आपण वर पाहिलेंच आहे तेव्हां या शास्त्रांतील उदाहरणें यज्ञकर्मांतून घेतलीं गेलीं आहेत ह्मणून तें शास्त्रच टाकाऊ आहे असें म्हणणें फारच अप्रयोजक होणार आहे.

**आक्षेप दुसरा:**—मीमांसाशास्त्राचा निराळा असा अभ्यास करण्याची मुळींच जरूरी नाहीं, असा या शास्त्राविरुद्ध दुसरा आक्षेप आहे. मिताक्षरा वाचतांना मीमांसाशास्त्राचीं कांहीं तत्वें कळतात. व्यवहारमयूख वाचतांना त्यांत सांगितलेलीं व उपयोगांत आणलेलीं तत्त्वें कळतात. एकंदरीत इतर शास्त्रांचे अध्ययनानेंही मीमांसाशास्त्राची जरूरीपुरती माहिती मिळते. तेव्हां मुद्दाम फक्त मीमांसाशास्त्राचेंच असें निराळें अध्ययन करण्याची काय जरूर आहे, असें वरील आक्षेपकांचें ह्मणणें आहे. मिताक्षरा किंवा मयूख वाचतांना त्यांत उपयोगांत आणलेले मीमांसाशास्त्राचे नियम आपल्याला कळून येतात ही गोष्ट खरी आहे. पण मिताक्षरेंत किंवा मयूखांत मीमांसाशास्त्रांतील नियमांचा योग्य व बरोबर असाच उपयोग केला असेल असें कां समजावयाचें ? त्यांनीं आपल्या ह्मणण्याच्या समर्थनार्थ त्यांचा ओढून ताणून अर्थ एखादे वेळेस बदलला असण्याचाही संभव आहे. आक्षेपकारांच्या मताप्रमाणें वागावयाचें ह्मटलें ह्मणजे बुद्धीची वाढ खुंटली ह्मणावयाची. कारण मिताक्षरेंत अमूकएक नियम सांगितलेला आहे. ह्मणून तो खरा व प्रमाण मानावयाचा ह्मटला ह्मणजे बुद्धीचें कामच संपलें. तेव्हां वरील शास्त्रांत सांगितलेले उपयोगांत आणलेले नियम बरोबर उपयोगांत आणले आहेत कीं नाहीं, हें समजण्याकरतां तरी निदान मीमांसाशास्त्राचे अध्ययनाची जरूरी आहे.

मिताक्षरेंत किंवा दुसऱ्या इतर शास्त्रांत मीमांसेंतील जे नियम आहेत ते एके ठिकाणीं सांपडत नाहींत व त्यांचा जरूरीपुरताच उपयोग करून घेतला जात असल्यामुळें त्या शास्त्रांतून मीमांसाशास्त्रांतील नियमांची पूर्णपणें व चांगली माहितीही मिळणें शक्य नाहीं. ती माहिती पूर्णपणें करून घेण्याला आपल्याला मीमांसाशास्त्रच शिकणें जरूर आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

**आक्षेप तिसरा:**—शंकराचार्यांनीं मीमांसाशास्त्राचें खंडन केलें आहे. तेव्हां हें शास्त्र शिकण्याची कांहीं जरूरी नाहीं असा या शास्त्राविरुद्ध तिसरा आक्षेप आहे.

मीमांसेंत एकंदर तीन मतें आहेत ह्मणजे जैमिनीच्या सूत्रांचा तीन प्रकारांनीं अर्थ विद्वान् ग्रंथकारांनीं (प्रभाकर, भट्ट, व मिश्र) लावला आहे. सर्वसंमत ग्रंथकारांनीं यांपैकीं भाट्ट मताचाच पुरस्कार केला आहे. ह्मणजे भाट्ट मत हेंच आदरणीय व सर्वसम्मत मत असल्यामुळें या मताचें जर आद्य शंकराचार्यांनीं खंडन केलें असलें तर मीमांसाशास्त्राचें खंडन झालें असें फार तर ह्मणतां येईल. पण वस्तुस्थिति अगदींच निराळी आहे. शंकराचार्यांनीं प्राभाकर व मिश्रमतांवर टीका केली आहे. शंकर दिग्विजयासारख्या काव्यांतून आचार्यांनीं मीमांसाशास्त्राचें खंडन केलें असें जें ह्मटलें जातें तो आचार्यांचा नुसता गौरव होय. तेव्हां ज्या अर्थीं शंकराचार्यांनीं भाट्टमताचें खंडन केलेलें नाहीं व ज्याअर्थीं भाट्टमत हेंच मीमांसाशास्त्रांतील सर्वसम्मत मत आहे, त्याअर्थीं आचार्यांनीं मीमांसाशास्त्राचें पूर्ण खंडन केल्यामुळें तें शास्त्र शिकण्याची आतां जरूर राहिली नाहीं असें ह्मणणें न्याय्य होणार नाहीं हें उघड आहे.

**आक्षेप चवथा:**—कोणचेंहि शास्त्र जिवंत रहावयाला त्या शास्त्राचा व्यवहारांत थोडा बहुत तरी उपयोग व्हावा लागतो. वनस्पतिशास्त्र, औषधीशास्त्र, भूस्तरशास्त्र व अशा कित्येक आधिभौतिक शास्त्रांत सध्यां बरीच प्रगति होत आहे याचें कारण या शास्त्राचा व्यवहारांत फार उपयोग होतो. ज्या वेळीं देशांत चोहोंकडे अग्निहोत्र धारण करणारे ब्राह्मण सांपडत असत त्यावेळीं मीमांसाशास्त्राच्या अध्ययनाची जरूर होती. पण आजच्या परिस्थितीला अग्निहोत्री ब्राह्मण फारच थोडे सांपडतात, तेव्हां त्यांना लागणाऱ्या मीमांसाशास्त्राचीही जरूरी नाहीं असें कांहीं आक्षेपकांचें म्हणणें आहे. हा आक्षेप पहिल्या आक्षेपासारखाच आहे. मीमांसाशास्त्राचा उपयोग नुसत्या अग्निहोत्री ब्राह्मणांनाच होतो असें नसून व्यवहारांत तो सर्वांना होतो. हिंदु

Indira Gandhi National
Centre for the Arts

कायदा समजण्याकरतां मीमांसाशास्त्राची किती जरूरी आहे हें आपण वर पाहिलेंच आहे व सध्यां वकीलही फार कमी आहेत असें म्हणण्याचें कोणीही धाष्टर्य करणार नाहीं.

मीमांसाशास्त्रावरील कांहीं आक्षेपांचा आपण आतांपर्यंत विचार केला. मीमांसाशास्त्राचे अध्ययनाची जरूरी आहे हेंही आपण प्रस्थापित केलें तरीही पण हें शास्त्र शिकविण्याकरतां न्यू पूना कॉलेजमध्यें एखादा अध्यापक नेमावयाचा सोडून शिक्षणप्रसारक मंडळीनें हें विद्यालय व त्याला जोडून एक अग्निहोत्रशाला कशाला बांधली असा कांहीं लोक आक्षेप काढतात त्याला उत्तर दिल्याशिवाय ही अगोदरच लांबलेली प्रस्तावना संपाविणें योग्य होणार नाहीं.

सध्यांचे शिक्षणपद्धतीचा प्रयोगपद्धतीवर विशेष जोर आहे. विज्ञानशास्त्र नुसतें वर्गांत अध्यापकांचीं व्याख्यानें ऐकून नीटसें समजत नाहीं. त्याला प्रयोगशाळेची जरूर लागते. तसेंच औषधीशास्त्राचेंही अर्थशास्त्र आजपर्यंत अध्यापक नुसतीं व्याख्यानें देऊन शिकवीत असत. पण आतां त्या शास्त्रांत सुद्धां प्रयोग जरूर आहेत. मजुरांचेसंबंधीं बोलतांना विद्यार्थ्यांनीं स्वतः जाऊन कारखाने पहाणें, व मजूरवर्गाच्या आर्थिक परिस्थितीची ओळख करून घेणें अत्यंत जरूर आहे असें आतां शिक्षणशास्त्रांतील तज्ज्ञ लोक म्हणूं लागले आहेत तेव्हां बहुतेक विषयांना जर प्रयोग आतां लागूं लागले आहेत. तर ज्या शास्त्रांत मुद्दाम प्रयोग सांगितले आहेत त्या शास्त्राचे अध्ययनाला प्रयोगशाळा असणें हें अत्यंत जरूर आहे हें ओघानेंच प्राप्त होतें. तेव्हां शिक्षणप्रसारक मंडळीनें हें विद्यालय व त्याला जोडून हें शास्त्र पूर्णपणें समजावें म्हणून प्रयोगशाळा काढली हें योग्यच केलें असें प्रत्येक विचारी पुरुषाला वाटेल, या शास्त्रांत गौणत्व असूं नये म्हणून प्रयोगांची जरूर आहे व या प्रयोगांत थोडीशी हिंसाही करणें जरूर पडलें तरी ती करणें जरूर आहे.

हिंसा करूं नये हें तत्त्व सर्वमान्य आहे. कारण नसतांना किंवा जिव्हा-

Indira Gandhi National Centre for the Arts

लौल्यार्थ हिंसा करणें हें केव्हांही त्याज्यच होईल. पण ज्ञान मिळविण्याकरतां जरूरीपुरती हिंसा करणें सयुक्तिक होईल. अशा वेळीं हिंसा ही आपद्धर्म म्हणून केली जाते. अशी हिंसा जर केली नसती तर वैद्यशास्त्राची आज जी प्रगति झालेली आपल्याला दिसते आहे ती दिसली नसती. वैद्यशास्त्र शिकतांना बेडुक किंवा ससे मारणें हें त्याज्य आहे असें कोणीं ह्मटल्याचें ऐकिवांत नाहीं. मीमांसाशास्त्रांत त्या शास्त्रांत सांगितलेले प्रयोग समजावेत या हेतूनें प्रेरित होऊन जी हिंसा केली जाते ती ज्ञानार्जनाकरतां जरूर ह्मणूनच केली जाते हें सर्वांच्या लक्षांत येईल.

पूर्वमीमांसाशास्त्र सर्वतोमुखीं व्हावें, त्या शास्त्राचा लोकांनीं रोजच्या व्यवहारांत, पुरोहितांनीं यज्ञकर्मांत, कायदेपंडितांनीं न्यायमंदिरांत ज्याला जसा योग्य वाटेल त्या तऱ्हेनें त्यानें त्या शास्त्राचा उपयोग करून घ्यावा या सद्धेतूनें प्रेरित होऊन शिक्षणप्रसारकमंडळीनें हें विद्यालय सुरू केलें आहे. समर्थांचे या विद्यालयाला आशीर्वाद आहेत तेव्हां हें विद्यालय यशस्वी होईल यांत मुळींच शंका नाहीं. या विद्यालयांतून दरवर्षी विद्वान् असे मीमांसक बाहेर पडावेत व त्यांनीं देशाची सर्वांगीण उन्नति करावयाचें पवित्र काम हातीं घेऊन विद्यालयाच्या यशोवैभवांत भर घालावी हीच लेखकाची ईशचरणीं प्रार्थना आहे.

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

अनसूयासदन
अमरावती,

**पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे.**

Indira Gandhi National
Centre for the Arts

# पूर्वमीमांसापद्धतीचा इतिहास.

( १ ) पुण्यांतील हें मीमांसाविद्यालय सुरू होण्याचा आजचा शुभदिन आहे अशा सुप्रसंगीं येथें जमलेल्या विद्वज्जनापुढें भाषण करावयाला आपण मला बोलाविलेंत हा माझा आपण बहुमान केला आहे. खरें पाहूं गेलें असतां आपण माझ्यावरं जी कामगिरी सोंपविली आहे ती माझ्याकडून कशी पार पाडली जाईल याची मला काळजीच वाटत आहे. मीमांसाविद्यालयाच्या अनावरणप्रसंगीं त्या शास्त्राचा ज्यानें जन्मभर अभ्यास केला आहे अशाच एखाद्या विद्वान् व अधिकारी पुरुषाचें येथें व्याख्यान होणें जरूर होतें. आणि अशा प्रसंगीं मान्यवर महामहोपाध्याय डॉक्टर गंगानाथ झा यांच्यासारख्या पडितांना येथें व्याख्यानाकरितां आणणें व्यवस्थापकमंडळाला जर शक्य झालें असतें तर फार बहार झाली असती. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें डॉक्टरसाहेबांना येथें येणें अशक्य झालें असें मला कळलें. येथील शिक्षणप्रसारक मंडळीच्या कार्यासंबंधीं मला पूर्ण आदर आहे. ही शिक्षणसंस्था आज तीस वर्षें ज्ञानदानाचें पवित्र कार्य यशस्वितेनें करीत आहें. मीमांसाविद्यालय हें वरील शिक्षणप्रसारक मंडळीच्याच नेतृत्वाखालीं आपलें काम करणार आहे, ही आनंदाची गोष्ट होय. मीमांसाशास्त्राचा, थोडाफार कां होईना पण मी अभ्यास केला आहे व अजूनही करीत आहे आणि म्हणून मीमांसाविद्यालयाच्या अनावरणप्रसंगीं मीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी जेव्हां व्यवस्थापक मंडळींनीं मला विनंति केली तेव्हां मला नाहीं म्हणवेनाच; तरी पण अशा प्रसंगीं अध्यक्षाचें भाषण ज्या तऱ्हेचें व दर्जाचें झालें पाहिजे असें आपल्याला वाटतें, त्या तऱ्हेचें व दर्जाचें माझें भाषण जरी झालें नाहीं तरी आपण सहृदय होऊन मला क्षमा कराल अशी आशा आहे. अशा प्रसंगीं अध्यक्ष होऊन अधिकारी वाणीनें आपल्याला दोन शब्द सांगण्याची माझ्यांत पात्रता नाहीं हें मी पूर्णपणें

Indira Gandhi National Centre for the Arts

जाणून आहे. ही जाणीव असून देखील शिक्षणप्रसारक मंडळींच्या चालकांनीं मला अगदीं आपलेपणानें केलेल्या विनंतीचा अनादर करणें मला कृतघ्नपणाचें वाटलें, व त्यांच्या विनंतीला मान देण्याकरितां आणि मीमांसाशास्त्रासंबंधीं मला जें आत्यंतिक प्रेम वाटत आहे तें व्यक्त करण्याकरितां अशा दुहेरी उद्देशानें मी ही जबाबदारी अंगावर घेतली. माझ्या ह्या धाडसाबद्दल आपण मला क्षमा कराल अशी मला आशा आहे.

( २ ) या प्रसंगीं मीं खालील गोष्टींचा विचार करावयाचें योजिलें आहे. पहिल्यानें मी आपल्याला मीमांसाशास्त्राच्या इतिहासासंबंधीं कांहीं माहिती थोडक्यांत सांगेन. त्यानंतर पूर्व मीमांसासूत्रांत काय सांगितलें आहे तें आपण पाहूं. त्यानंतर मीमांसाशास्त्रासंबंधीं संस्कृत वाङ्मयांत कोणकोणते ग्रंथ आहेत, त्याचा आपण शोध करूं. त्यानंतर मीमांसाशास्त्रानें हिंदी विचारांना व तत्वज्ञानाला कसें वळण लाविलें आहे याचा आपण विचार करूं. त्यानंतर ग्रंथांचा अर्थ लावतांना आपल्याला कोणचे नियम पाळणें जरूर आहे आणि हे नियम धर्मशास्त्रांनाही कसे लागूं आहेत हें आपण पाहूं. नंतर हिंदू कायदा हा कायद्याच्या दृष्टीनें सूत्रबद्ध करण्याची किती जरूरी आहे याचा आपण विचार करूं, व सरते शेवटीं या काळांत मीमांसाशास्त्राचें निराळें व स्वतंत्र असें वेगळें विद्यालय काढणें किती अगत्य आहे या महत्वाच्या विषयाचा थोडक्यांत विचार करून आजचें भाषण संपवूं.

मीमांसा शब्दाचा इतिहास.

( ३ ) मीमांसा या शब्दाचा इतिहास जर आपल्याला पहावयाचा असला, तर आपणांस फार प्राचीन काळपावेतों मागें गेलें पाहिजे. तैत्तिरीयसंहितेंत (८,५,७,१) खालील वचन आपल्याला आढळतें."ब्रह्मविद् लोक, दिवस सोडावा कीं मोजावा या प्रश्नाचा विचार करितांना तो सोडावा असें आपलें मत देतात."

१ " उत्सृज्यां ३ नोत्सृज्यां ३ इति मीमांसन्ते ब्रह्मवादिनस्तद्वाहुः रुत्सृज्यमवेति " असें मूळ संस्कृत वचन आहे. या ठिकाणीं

Indira Gandhi National Centre for the Arts

" मीमांसन्ते " असा शब्दप्रयोग आहे. व हा प्रयोग 'वादग्रस्त प्रश्नासंबंधानें विचार करून नंतर त्याचा कांहीं तरी ठाम निर्णय करणें' अशा अर्थानें केला आहे. दुसऱ्याही पुष्कळ ठिकाणीं " मीमांसन्ते " या शब्दाचा उपयोग न करतां " ब्रह्मविद् लोक असें सांगतात " अशा रीतीनें सुरवात करून पुष्कळ वादग्रस्त मुद्यांचा ऊहापोह केलेला आपल्याला आढळून येतो. ( उदाहरणार्थ तै, सं. २,५,३,७. ) तांड्यमहाब्राह्मणांत " ब्राह्मणं पात्रे न मीमांसेत " ( ६-५-९ ) म्हणजे ब्राह्मणाच्या गुणावगुणांची चर्चा करूं नये असें वचन आहे. त्याच 'ब्राह्मणांत' दुसऱ्या एका जागीं मीमांसेरन् असा शब्दप्रयोग आपल्याला आढळतो. ( २३, ४, २ ) यास्तल्पे वोदके वा विवाहे वा मीमांसेरंस्त एता उपेयुः ।

कौषीतकि ब्राह्मणांत मीमांसन्ते हा शब्दप्रयोग बऱ्याच ठिकाणीं केलेला आपल्याला दिसेल. उदाहरणार्थ एके ठिकाणीं (२, ९) आपल्याला खालील वचन आढळतें ॥ उदिते होतव्या ३ मनुदित इति मीमांसन्ते । ...... तस्मादनुदिते होतव्यम् । म्हणजे अग्नीला बलिदान करावयाचे तें सूर्योदया-पूर्वीं करावें, कीं सूर्योदयानंतर करावें या विषयाचा विचार करतांना दोन्ही बाजूंच्या साधकबाधक गोष्टींचा विचार करून नंतर बलिदान हें सूर्योदया-पूर्वीं करावें अशा तऱ्हेचा निर्णय दिलेला आपल्याला दिसून येतो. दुसऱ्या एका ठिकाणीं मीमांसन्ते हा शब्द वापरलेला आपल्याला आढळतो आणि त्या ठिकाणीं पैंग्य व कौषीतकि यांचा मतभेद आपल्याला स्पष्टपणें दिसून येतो. ( कौषितकि ब्रा. २६, ३ ) कौषितकि ब्राह्मणांतही मीमांसा हा शब्द वापरला आहे. ( १८-४ ) 'आतां आपण " परिधानाचा " विचार करूं या' अशा अर्थाचें वाक्य आपल्याला तेथें सांपडतें. कण्वशाखीय शतपथ ब्राह्मणांत देखील " मीमांसा " हा शब्द वापरला आहे. ( S. B. E. ) पुस्तक २ रें पान २५ नोट १ )

उपनिषदांमध्यें आपल्याला पुष्कळ वेळां हें क्रियापद आढळतें. छांदोग्यांत असें म्हटलें आहे कीं, एकदां प्राचीनशाल औपमन्यवांसारखे पुष्कळसे महा-

Indira Gandhi National Centre for the Arts

विद्वान् जिज्ञासु एके ठिकाणीं जमले व त्यांनीं 'आत्मा म्हणजे कोण,' 'ब्रह्म म्हणजे काय' या प्रश्नांचा विचार करावयास सुरुवात केली [ प्राचीनशाल औपमन्यवा: ... महाश्रोत्रिया: समेत्य मीमांसां चक्रु: को नु आत्मा किं ब्रह्मेति छान्दोग्य; सैषानन्दस्य मीमांसा भवति । तै. उ. ] तैत्तिरीय उपनिषदांमध्यें आपल्याला खालील वाक्य आढळतें. "परमसुख किंवा निर्वाण ( Bliss ) म्हणजे काय या प्रश्नाचा विचार करून शेवटीं त्याचा निर्णय असा ठरतो." या सर्व उताऱ्यांवरून एक गोष्ट स्पष्टपणें सिद्ध होते, व ती ही कीं अगदीं प्राचीन काळापासून तों उपनिषदांच्या काळापर्यंत "मीमांसन्ते" या क्रियापदाचा व मीमांसा या शब्दाचा "संस्कार अनुष्ठान ( Rituals ) किंवा वेदान्त यांतील कठीण अशा प्रश्नांचा ऊहापोह" अशा अर्थानें उपयोग केला गेला आहे.

निरुक्तांत ( अध्याय ७ ) यज्ञप्रसंगीं आणि मंत्र म्हणन आवाहन ज्या देवतांना केलें जातें त्या देवता साकार आहेत कीं निराकार आहेत यासंबंधानें मनोरंजक चर्चा आहे. तेथें या विषयासंबंधानें निरनिराळीं मतें दर्शविलीं आहेत. पूर्वमीमांसासूत्रांत ( ९,१,६,१० ) ह्याच विषयासंबंधानें विवेचन केलें असून यज्ञांत आवाहन केलेल्या देवता निराकार आहेत, असा त्या विवेचनाचा मथितार्थ दिसतो. पाणिनीमध्यें (३,१,६) "मीमांसते" "बीभत्सते" ह्या शब्दप्रयोगांचा अर्थ समजून सांगण्याकरितां एक निराळें सूत्रच आहे; तें सूत्र हें मान्-बध-दान्-शान्भ्यो दीर्घश्चाभ्यासस्य ( यासंबंधीं मानेर्जिज्ञासायाम् असें वार्तिक आहे ) बौधायन ( १,४,१० ) आणि वसिष्ठ ( २२·२ ) धर्मसूत्रांत "मीमासन्ते" हा शब्दप्रयोग आपल्याला आढळून येतो. कांहीं धर्मसूत्रांतही निवळ मीमांसेचे नियम व तत्त्वें सांगितलेलीं आहेत. गौतमधर्मसूत्रांत "जेव्हां सारख्या अधिकाराच्या दोन ग्रंथांत ( Text ) मतभेद होतो तेव्हां तेथें विकल्प समजावा" असें सांगितलें आहे. आपस्तंबधर्मसूत्रांत ( धर्मसूत्र ११,४,८ ) खालील वचन आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

" श्रुतिर्हि बलीयस्यानुमानिकादाचारात् । " म्हणजे एकादें आज्ञार्थी व स्पष्ट असें वेदवचन जर असेल तर त्याची योग्यता नुसत्या चालीरीतींवरून अनुमानानें काढल्या जाणाऱ्या वेदवचनापेक्षां खात्रीनें जास्त आहे. हें वचन 'जैमिनीच्या' ( १,३,३ ) " विरोधेत्वनपेक्षं स्यादसति ह्यनुमानं " ह्या वचनाच्याच अर्थाचें आहे. दुसऱ्या एका ठिकाणीं आपस्तंबांत खालील वचन आहे. " यत्र तु प्रीत्युपलब्धितः प्रवृत्तिर्न तत्र शास्त्रमस्ति " म्हणजे जें कार्य फक्त सुखप्राप्तीकरतांच करण्याला—सुखप्राप्ति होत असल्या-मुळें—मनुष्य प्रवृत्त होतो त्यासाठीं शास्त्र नको. जैमिनीहि ( ४. १. २. ) ' यस्मिन् प्रीतिः पुरुषस्य तस्य लिप्सार्थलक्षणाविभक्तवात् " या वचनान्वयें आपल्याला तेंच सांगतो. आपस्तंबधर्मसूत्रांत मीमांसातत्त्वांनाच " न्याय " असें म्हटलें आहे असें आपल्याला दिसून येतें. ( २, ४, ८, १३, आणि २ ६, १४, १३ ) आपस्तंबांतील खालील सूत्रांत अशा तऱ्हेचा उल्लेख आपल्याला आढळून येतो. " अङ्गानांतु प्रधानैरव्यपदेश इति न्यायावित्समयः तसेंच " अथापि नित्यानुवादमविधिमाहुर्न्यायविद्दः " आपस्तंबांत ( २, ६, १३, ११ ) आणि पूर्वमीमांसेंत ( ६,१,१५ ) फारच साहश्य दिसून येतें. पतंजलीच्या महाभाष्यांत मीमांसकांचा उल्लेख आहे. ( किलहॉर्न पु. १ लें पृ. २३९ )

पतंजलींत काशकृत्स्निप्रणीत मीमांसाशास्त्राचें अध्ययन केलेल्या ब्राह्मणीचें उदाहरण घेतलेलें आपल्याला सांपडतें. ( पु. २, पृ. २०६, २४९, ३२५) ( काशकृत्स्निना प्रोक्ता मीमांसा काशकृत्स्नी काशकृत्स्नीमधीते काशकृत्स्ना ब्राह्मणी । ] ब्रह्मसूत्रांत ( १,४,२२ ) काशकृत्स्न हा शब्द वेदान्तशास्त्र पटविणारा गुरु अशा अर्थानें वापरला आहे. येथें मीमांसा हा शब्द पूर्वमी-मांसा या अर्थानें वापरला नसून वेदांतशास्त्र या अर्थानें वापरला असावा असें दिसतें. पतंजली सर्वांना माहीत असलेलें परिसंख्येचें उदाहरण देतो. "पञ्चपञ्चनखा भक्ष्या इत्युक्ते गम्यत एतदतोन्ये ऽभक्ष्या इति ।" असें पतंजली म्हणतो. याचा अर्थ पांच पांच नखें असलेले प्राणि भक्षण करावेत असें

Indira Gandhi National Centre for the Arts

शास्त्रवचन असल्यामुळें अशा तऱ्हेचें नसलेले प्राणि भक्षण करूं नयेत असें अर्थात् प्राप्त होतें अशी पतंजलीची टीका आहे. ( पु. १ पृ. ५ ) या सर्व गोष्टींवरून आपल्याला एक अनुमान काढतां येतें आणि तें हें कीं ख्रिस्ती शकापूर्वीं कित्येक शतकें मीमांसाशास्त्राचे नियम पूर्णावस्थेला पोंचले होते. आणि पतंजलीच्या पूर्वीं ( श. पू. १४० ) कित्येक वर्षें त्यांचे-संबंधी ग्रंथही झाले होते. आपल्या या अनुमानाला श्रौतसूत्रावरून बळकटीच येते. श्रौतसूत्रांपैकीं कित्येक सूत्रें ख्रिस्ती शकापूर्वीं कित्येक शतकें अगोदर केलीं गेलीं होतीं. आणि जैमिनीचें ग्रंथांत शास्त्रांचे स्पष्टीकरणासंबंधी जे नियम आढळतात, त्या नियमांचें वाचकांना अगोदरच ज्ञान आहे असें वर सांगितलेल्या श्रौतसूत्रांत गृहीत धरलें आहे असें आपल्याला आढळून येतें.

**५ जैमिनीचा काल**

जैमिनीचा काल कोणचा होता याविषयीं नुसता अंदाज करणें सुद्धां फार कठीण आहे. जैमिनीसूत्रांत बुद्धमताचा व तत्वज्ञानाचा स्पष्ट असा उल्लेख नाहीं मीमांसासूत्रांत धर्मशास्त्राचा ( ६, ७, ५, ) आणि स्मृतीचा उल्लेख आहे ( १२, ४, ४२,) शबराच्या टीकेवर जर आपण विश्वास ठेवला, तर जैमिनीसूत्रांत कल्पसूत्रांचें ( १, ३, ११ ) आणि म्लेंच्छ भाषेच्या कांहीं शब्दांचें ज्ञान वाचकाला अगोदरच आहे असें गृहीत धरलेलें आपल्याला आढळून येईल. या सर्व गोष्टींवरून जैमिनीसूत्रें हीं कांहीं सूत्रकालारंभींचीं अगदीं पहिलीं अशीं सूत्रें नव्हेत या विधानाला बळकटी येते. जैमिनीच्या सूत्रांचा व वेदांतसूत्रांचा कांहीं विवक्षित तऱ्हेचा संबंध आहे. जैमिनी हा पुष्कळ ठिकाणीं बादरायणाचा हवाला देतो हेंही आपण लक्षांत ठेवलें पाहिजे ( १, १, ५, ५. ३, १९, ६, १, १८, १०, १, ६५ ). यांतील एक सोडून बाकी सर्व ठिकाणीं (१०, ८, ४५) जैमिनीचीं व बादरायणाचीं मतें भिन्न नाहींत एक सोडून बाकी सर्व ठिकाणीं जेथें जेथें बादरायणाचा हवाला दिला गेला आहे ते सर्व मुद्दे वैदिक यज्ञविधीसंबंधींचे आहेत, आणि पूर्वमीमांसासूत्रांत उद्धृत केलेलीं बादरायणाचीं

Indira Gandhi National Centre for the Arts

कांहीं मतें आहेत त्यांच्यासारखीं मतें सध्यां उपलब्ध असलेल्या वेदांतसूत्रांत कोठेंही सांपडत नाहींत. या सिद्धांताला एकच अपवाद आहे आणि तो हा. बादरायणाचें मतें शब्द व अर्थ यांचा शाश्वतसंबंध आहे ( पू. मी. १, १, ५, ) ब्रह्मसूत्रांतही अशाच तऱ्हेचें मत प्रतिपादन केलें आहे ( १, ३, २८–२९ ) आतां ब्रह्मसूत्रांतच जैमिनीचे विचार कमींत कमी दहा वेळां तरी उद्धृत केले आहेत. ( १, २, २८, १, २, ३१, १, ३, ३१, ३, २, ४०, ३, ४, २, ३, ४, १८, ३, ४, ४०, ४, ३, १२, ४, ४, ५, ४, ४, ११, ) वर दर्शविलेल्या उदाहरणांतील फक्त दोनच उदाहरणांत सध्यां उपलब्ध असलेल्या पूर्वमीमांसाशास्त्राच्या कांहीं सूत्रांत, व जैमिनीचे म्हणून उद्धृत केलेल्या मतांत बरेंच साम्य आहे असें दाखवितां येईल. ब्रह्मसूत्रांतले ( ६ ३, २१, ) हे विचार पूर्वमीमांसेंतील ६, १, ५, येथील विचारांशीं जुळतात, आणि ब्रह्मसूत्रांमधले ( ३, २, ४०, ) विचार पूर्व-मीमांसा २, १, ५, येथील विचाराशीं जुळतात. [ मध्वादिष्वसंभवादन-धिकारं जैमिनिः । ब्रह्मसूत्र ३, ३१ – कर्तुर्वा श्रुतिसंयोगाद्विधिः कात्स्न्येंन गम्यते । पूर्वमी ६,१,५; धर्मं जैमिनिरत एव । ब्रह्मसत्र ६२,४० चोदना पुनरारम्भः । पर्वमी २,१,५. ]

शिवाय या दहांपैकीं पांच ठिकाणीं ब्रह्मसूत्रांत बादरायणांतील मतें जैमि-नीच्या मतांचे विरुद्ध अशीं दर्शविलीं आहेत.(१,३,३३,३,२,४,१,३,४१, ३,४,१९,४,४,२) व एके ठिकाणीं दोघांचे विचार थोडेसे निराळे आहेत असें सांगितलें आहे ( ४,४·१ ) येथें आपण हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं ब्रह्मसूत्रांपैकीं कित्येक सूत्रांत मीमांसाशास्त्रापैकीं कांहीं विधानांचा जागोजाग आधाराकरतां म्हणून प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. उदाहरणार्थ ब्रह्मसूत्र २,३,३३ आणि ५० मध्यें "तदुक्तम्" या शब्दाचा उपयोग केला असून तेथें ब्रह्मसूत्रांमधील सूत्रांचा, आणि अनुक्रमानें पूर्वमीमांसा ३,३,९ आणि २,३,३ मधील सूत्रांचा संबंध दर्शविला आहे. त्याचप्रमाणें ब्रह्मसूत्र ३,३, ४४, आणि ४९ लिहीत असतांना लेखकाचे अंतश्चक्षपुढें 'श्रुतिलिंग'

Indira Gandhi National Centre for the Arts

पूर्वमीमांसा ( ३,३,१३, ) हें सर्वांस माहीत असलेलें मीमांसासूत्र होतें असें म्हटल्यास आपली चूक होणार नाहीं. एकंदरींत या गोष्टींवरून आपल्याला पुष्कळशीं शक्य दिसणारीं अनुमानें काढतां येतील. ब्रह्मविद्येसंबंधीं बोलतांना जैमिनीचीं मतें आधारभूत समजलीं जातात, आणि वैदिक यज्ञासंबंधानें व अनुष्ठाना ( Rituals ) संबंधानें बोलतांना बादरायणांतील मतांचा आधार घेतला जातो, या दोन गोष्टींवरून वरील दोन्हीहि ग्रंथकारांनी यज्ञविधि शास्त्राचें व तसेंच उपनिषदांचें स्पष्टीकरण करण्याकरितां ग्रंथरचना केली होती असें एखादा जर म्हणूं लागला तर त्यांत बरेंच तथ्य आहे असें आपल्याला कबूल करावें लागेल. किंवा वरील दोन्ही आचार्यांनीं स्मृतींच्या वर सांगितलेल्या दोन्ही शाखांवर जरी ग्रंथरचना केली नसली तरी त्यांनीं वेदांतील कठीण व महत्वाच्या विषयांच्या संबंधी आपले विचार तोंडी आपल्या शिष्यवृंदांस सांगितले असावेत व नंतर ते परंपरेनें वरील आचार्यांच्या शिष्यशाखेंत पसरले असावेत असेंही आपल्याला म्हणतां येईल. या दोन तऱ्हेच्या विचारपद्धतींत पहिलीच जास्त सयुक्तिक दिसते. कांहीं लोकांचें मतें पुष्कळसें जैमिनी व पुष्कळसे बादरायण होऊन गेले असावेत. प्रत्येकानें पूर्व व उत्तर मीमांसेवर ग्रंथरचना केली असावी, आणि नंतर अर्वाचीन ग्रंथकारांनी त्यांच्या मतभेदांकडे लक्ष न देतां त्यांचीं मतें सरसकट आधारादाखल पुढें करण्यास सुरवात केली असावी. माझ्या मतें अशा तऱ्हेचा घोंटाळा इतक्या प्राचीन काळीं होणें असंभवनीय आहे. जैमिनी व बादरायण या दोन आचार्यांनीं आपआपले निरनिराळे सांप्रदाय ( Schools ) स्थापन केले व तेथें आपलीं मतें प्रतिपादिलीं. आज उपलब्ध असलेलीं व जैमिनी व बादरायंण यांचीं समजलीं जाणारीं सूत्रें हीं वरील आचार्यांनीं आपल्या सांप्रदायांत प्रतिपादलेलीं मतें होत. पण ज्या अर्थीं उपलब्ध असलेल्या ब्रह्मसूत्रांत ‘ तदुक्तम् ’ हा शब्दप्रयोग आढळतो, व ज्या अर्थीं विद्यमान पूर्वमीमांसासूत्रांत उपनिषदांचें स्पष्टिकरण करणाऱ्या एकाही ग्रंथाचा निर्देश केलेला दिसून येत नाहीं, त्या अर्थीं वर सांगितलेलीं पूर्व मीमांसासूत्रें हीं ब्रह्मसूत्रापेक्षां जुनीं आहेत, हें ओघानेंच सिद्ध होतें.

Indira Gandhi National Centre for the Arts

पूर्व मीमांसासूत्रांत उद्‌धृत केलेले इतर आचार्य खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत. जैमिनी ( ३ १, ४, ६, ३,४, ८ ३,७ ९ २, ३९ १२, १७ ) आत्रेय ( ४ ३,१८ ५,२,१८ ६,१,२५ ) ऐतिशायन अ २,४,३ कामुकायन कार्ष्णाजिनि ( ४,३,१७ ६,७,३५ ) बादरि ( ३,१,३, ६,१,२७, ८,८,६, ९,२,३३ ) लाबुकायन ( ६,७,३७, ); यांपैकीं आत्रेयाचा उल्लेख ब्रह्मसूत्रांतही आढळतो ( ३,४,४४ ); बादरि ( ४,३,७, ४,४,१० ३,१,२, १,२,३० ) आणि कार्ष्णाजीनि ( ३,१,९ ) यांचाही उल्लेख ब्रह्मसूत्रांत केलेला आहे.

शबरानें आपलें भाष्य निदान ख्रिस्तीशकाच्या पांचव्या शतकापूर्वीं लिहिलें. त्यापूर्वींच वृत्तिकार व आणखी इतर टीकाकार यांनीं सूत्रांवर भाष्यें लिहिलीं होतीं. यावर आज उपलब्ध असलेलीं मीमांसासूत्रें कितीही अलीकडे जरीं ओढलीं तरी तीं निदान इ. स. १०० च्या सुमारास लिहिलीं गेलीं असावींत असेंच सिद्ध होतें. ख्रिस्ती शकापूर्वीं तनिशें वर्षांपूर्वीं तीं लिहिलीं गेलीं असणेंही शक्य नाहीं. याज्ञवल्क्य हा त्या मानानें अर्वाचीन ग्रंथकार समजला जातो व त्याचा काल ख्रिस्ती शकाचे दुसरें शतकांत केव्हां तरी असा ठरविला गेला आहे. याज्ञवल्क्य हा मीमांसाशास्त्राला चौदा विद्यापैकीं एक विद्या असें संबोधितो ( १ ३. ) आपस्तंबांतील ग्रंथरचना पूर्वमीमांसासूत्राधारें जर केली गेली असली तर जैमिनीसूत्रें हीं ख्रिस्तीशकापवींच्या तीनशें वर्षांहूनही जुनीं आहेत असें आपल्याला ह्मणतां येईल.

**पूर्व मिमांसासूत्रांतलि मथितार्थ.**

पूर्व मीमांसासूत्राचे एकंदर बारा भाग आहेत प्रत्येक भागांत चार ‘ पाद ’ आहेत. तिसऱ्या, सहाव्या, व दहाव्या भागांत मात्र प्रत्येकीं आठ ‘ पाद ’ आहेत. प्रत्येक ‘ पादांत ’ कित्येक ‘ अधिकरणें ’ ( महत्त्वाचे चर्चाविषयक विषय ) आहेत. साधारणतः एक हजार अधिकरणें असावींत असा समज आहे. हा अंदाज शंकर भटांच्या मीमांसासंग्रह या ग्रंथावरून केला आहे. माधवासारख्या अधिकारी ग्रंथकारांचे मतें

Indira Gandhi National Centre for the Arts

अधिकरणांची संख्या हजारांहून कमीच असावी. एकंदर साधक बाधक प्रश्नांचा विचार करून सरतेशेवटीं प्रत्येक अधिकरणांत जो निर्णय ठरविला जातो त्याला 'न्याय' असें म्हणतात. या ग्रंथांत अंदाजानें सरासरी २७०० सूत्रें आहेत. या ग्रंथांत आणखी काय काय विषय आहेत ह्या सर्वांचें येथें दिग्दर्शन करणें वेळेच्या व कालाच्या अभावामुळें मला शक्य नाहीं. तरीही पण अगदीं थोडक्यांत या ग्रंथाची रूपरेषा जर मी येथें सांगण्याचा प्रयत्न केला तर तो अप्रस्तुत होणार नाहीं.

१ धर्म म्हणजे काय या प्रश्नाचा विचार करण्याचा या ग्रंथाचा मूळ उद्देश आहे. " वेदांतील आज्ञार्थी ( Injunctive ) वचनांनीं सांगितलेली कोणचीही इष्ट अशी वाटणारी गोष्ट " असा धर्म या शब्दाचा अर्थ आपल्याला या ग्रंथांत आढळून येतो; शब्द व अर्थ यांचा संबंध चिरस्थायी आहे; विधि व अर्थवाद यांचा संबंध काय याचेंहि येथेंच विवरण केलेलें आहे 'अर्थवाद हा मोठ्या ग्रंथाचा एक भाग आहे. आणि ह्मणून आज्ञार्थी वेदवाक्यांचा अर्थ विशद करून सांगण्याचें वेळीं अर्थवादांतील मत आधारादाखल ग्राह्य समजलें जातें. संस्काराचे वेळीं म्हणावयाचे मंत्रांचा काय अर्थ आहे हें येथेंच सांगितलें आहे; अष्टकाश्राद्धासंबंधींचे नियम सांगितले आहेत त्यासारखे दुसरे इतर स्मृतींतील नियम प्रमाण समजले जातात; श्रुति व स्मृति यांचा मतभेद होत असल्यास श्रुतींमधील वचन प्रमाण मानावें; पण या दोन ग्रंथांत जर विरोध नसेल तर उपलब्ध नसलेल्या श्रुतींच्या आधारें स्मृतींची रचना केली आहे असें समजावें; म्लेंच्छ भाषेंतून जे शब्द घेतले असतील त्यांचा अर्थ म्लेंच्छ लोक जो करीत असतील तसाच करावा., "होलाका" सारख्या चालीरीति प्रमाण मानाव्यात; अपभ्रंष्ट अशा शब्दांचा उपयोग न करतां व्याकरण–शुद्ध अशा शब्दांचा उपयोग करावा; उदाहरणार्थ, गौः या अर्थीं " गावी " हा शब्द वापरणें चूक आहे, कारण तो अपभ्रंश झालेला शब्द आहे. वेदांत वापरलेले शब्द व साधारण व्यवहारांतल्या भाषेंतले तेच शब्द यांचे अर्थ सारखे समजावे; शब्दांचा मूळ व मुख्य अर्थ

Indira Gandhi National Centre for the Arts

आकृति ( विवक्षित वर्ग दर्शविणारी ) आहे, ‘ उद्भिद् ’, ‘ चित्र ’, ‘अग्निहोत्र’ ‘ श्येन ’ वगैरे शब्द हे कांहीं यागांचीं नांवें आहेत. गौण असे विधि नव्हेत. “ यज्ञकर्ता पुरुष हा प्रस्तार किंवा यूप असतो ” अशा तऱ्हेचीं वाक्यें अर्थवाद आहेत; गुणविधि नव्हेत; एखाद्या शब्दाचा अर्थ जेव्हां बरोबर लागत नसेल तेव्हां एकंदर पूर्व संदर्भावरून तो लावावा.

( २ ) आज्ञार्थक वाक्यसमूहांत ज्याचे योगानें कोणची क्रिया व्हावयाची आहे हें आपल्याला कळतें, तो शब्द म्हणजे क्रियापद हा मुख्य शब्द जाणावा; वेदांनीं सांगितलेलीं कर्मैं केल्यामुळें एक तऱ्हेचें अदृश्य असें सामर्थ्य उत्पन्न होतें त्याचेंच नांव अपूर्व; कर्मांचे दोन भाग पडतात; मुख्य व गौण; मुख्य कर्मैं कोणचीं, व गौण कर्मैं कोणचीं यांचीं कांहीं उदाहरणें; ब्राह्मणांमधील क्रियापदें कोणचे विधि करावेत हें दाखवितात;मत्रांतील क्रियापदें ते दाखवीत नाहींत; मंत्र, व ब्राम्हण यांच्या व्याख्या; ऋक् साम यजु यांच्या व्याख्या, निगद हे यजु आहेत; यजूंच्या कोणच्या भागाचें एक वाक्य होतें यासंबंधीं थोडा खल प्रत्येक निरनिराळ्या क्रियापदांच्या योगानें ( उदाहरणार्थ जुहोति, यजेत, ददाति ) निरनिराळ्या क्रियांचा बोध होतो. ह्या प्रत्येक क्रियेलाच अदृश्य असें अपूर्व असतें. यासंबंधीं कांहीं उदाहरणें संख्या संज्ञा व देवता यांच्या भिन्नत्वामुळें कर्मभिन्नत्व होतें यासंबंधीं विचार; अग्निहोत्र हें सर्व आयुष्यभर करावयाचें कर्तव्य आहे. वेदांच्या निरनिराळ्या शाखांत सांगितलेलें अग्निहोत्र आणि इतर विधि हे शाखाभेदामुळें भिन्न भिन्न होत नाहींत.

( ३ ) “ शेष ” म्हणजे काय ? दुसऱ्याच्या उपयोगी पडणारा तो शेष; द्रव्य, गुण व संस्कार हेच तेवढे शेष आहेत असें नव्हे तर आणखी कित्येक गोष्टीही शेष समजण्यास हरकत नाहीं. मग हे पुरुषार्थाचे शेष आहेत; पुरुषार्थ हे कर्त्याचे शेष आहेत; आणि कर्ता हा कांहीं कर्माचा शेष आहे; “ तो पुरुष पात्र विसळतो ” या वाक्यांतील एकवचनानें अनेकवचनाचाही अंतर्भाव होतो. शेष व शेषिन् यांचीं उदाहरणें ( गौण व मुख्य

Indira Gandhi National Centre for the Arts

अशीं ); शब्दाचा मुख्यार्थ तेवढा घ्यावयाचा; श्रुति, लिंग, वाक्य, प्रकरण, स्थान, समाख्या, वगैरे वेदवचनांचा विनियोग कसा करावयाचा तें सांगणारीं साधनें आहेत; यांपैकीं दोन गोष्टींत जेव्हां विरोध होईल तेव्हां आपण काय करावयाचें, आपलें मत कशा तऱ्हेनें बनवावयाचें यासंबंधीं नियम; दर्शपूर्णमासांतील खोटें बोलूं नये ही आज्ञा हा विधि आहे अनुवाद नव्हे; ब्राह्मणवध करूं नये ही आज्ञा सर्वसाधारण व सर्व कालांस लागू आहे. दर्शपूर्णमासापुरतीच फक्त नव्हे; कर्त्याला उद्देशून लिहिलेले कित्येक वैदिक नियम ( उदाहरणार्थ सुवर्णालंकार धारण करणें ) अशासारख्या कित्येक नियमांचा याज्ञिक कर्मांशीं मुळींसुद्धां संबंध नाहीं. मुख्य गोष्टींचा विचार करितांना जो मार्ग अंगिकारावयाचा तोच मार्ग प्रतिनिधींना लागू आहे. यज्ञ करणाऱ्या पुरुषानेंच ऋत्विक् पसंत करावयाचा, हें काम अध्वर्यूनें करावयाचें नाहीं; त्याचप्रमाणें मुंडन करणें, नखें काढणें वगैरे संस्कारही यज्ञ करणाऱ्या पुरुषानेंच करून घ्यावयाचे. ज्यानें वेदपठण केलें असेल तोच यज्ञ करण्यास योग्य असा पुरुष आहे.

( ४ ) क्रत्वर्थ म्हणजे काय ? ( यज्ञकर्माकरितां जें जें कांहीं करावें म्हणून सांगितलें असेल तें तें कर्म करणें जरूर आहे. कारण त्यापैकींच कांहीं कृत्यें सोडल्यास यज्ञ पूर्णच होत नाहीं. ) पुरुषार्थ म्हणजे काय ? ( यज्ञ करणाऱ्या पुरुषानें जी गोष्ट करावी म्हणून सांगितली असेल ती त्यानें न केल्यास यज्ञपूर्तीच होत नाहीं असें नाहीं); क्रत्वर्थ व पुरुषार्थाचीं उदाहरणें सूर्य उगवता किंवा मावळता कोणीही पाहूं नये. हें प्रजापतिव्रत पुरुषार्थ आहे. क्रत्वर्थ नाहीं; दोन द्रव्यांपैकीं किंवा कृत्यांपैकीं कोणतें प्रयोजक आहे, याविषयीं खल; अर्थकर्म व प्रतिपत्तिकर्म यांचीं उदाहरणें; कांहीं कृत्यांची देश, काल व कर्ता कोण असावा हें सांगणारीं श्रुतिवाक्यें अर्थवाद नसून नियम होत; शेषाच्या उलट असणारें मुख्य तें काय आहे ? द्रव्यसंस्कार आणि इतर आनुषंगिक कृत्यें यांमुळें प्राप्त होणारीं बक्षिसें यांचें वर्णन करणारीं वाक्यें अर्थवाद होत. ज्या व्रतांना शास्त्रांत कोणचेंहि फल सांगितलें

नाहीं त्या व्रतांना स्वर्गप्राप्ति हेंच फल समजावें अशा तऱ्हेचा विश्वाजिन्न्याय; ज्या व्रतांचा उद्देश भोग्य वस्तु प्राप्त करून घेणें असाच आहे त्यांचे योगानें स्वर्गप्राप्ति कधींहि होत नाहीं; पुत्रजन्माचे वेळीं केलेलें वैश्वनरेष्टि व्रत हें पुत्राच्या मांगल्याकरितांच असतें. पित्याचा त्याच्याशीं कांहीं एक संबंध नाहीं. हें व्रत जातकर्मानंतर पौर्णिमेला अगर अमावास्येला करावयाचें असतें पिंडपितृयज्ञ हा दर्शपौर्णमास यागाचें अंग नाहीं.

( ५ ) क्रम म्हणजे काय ? कोणचेंही व्रत करतांना ग्रंथांतरीं अमूक एक गोष्ट अगोदर करावी, अमूक मागून करावी अशी यादी दिलेली असते, तेव्हां त्या यादीप्रमाणेंच गोष्टी घडल्या पाहिजेत कीं काय ? त्या यादी-प्रमाणेंच गोष्टी घडल्या पाहिजेत, असा नियम आहे. श्रुति, अर्थ, पाठ इत्यादि क्रम ठरविण्याचीं साधनें, यांच्यांतच जर विरोध झाला तर काय करावयाचें याविषयीं निर्णय.

( ६ ) अधिकार म्हणजे काय ? स्वर्ग हें द्रव्य नव्हे तर परमानंदाची स्थिति आहे. स्वर्ग हें मुख्य आहे. यज्ञ हा गौण असून स्वर्गाला पोंचवि-णारा एक धागा आहे. स्वर्ग प्राप्त करून घेऊं इच्छिणाऱ्या मनुष्यानें यज्ञ करावा. फक्त मनुष्यांनाच यज्ञ करण्याचा अधिकार आहे. देवतांना किंवा पशूंना नाहीं. पुरुष व स्त्रिया या दोघांनाही याग करण्याचा अधिकार आहे. पति व पत्नी या दोघांनीं मिळून याग करावयाचा असतो. पत्नीला यागांत फार थोडा भाग घेतां येतो. शूद्रानें याग करूं नये. एखादा अवयव अजी-बात नसलेल्या किंवा दुरुस्त होणें अशक्य अशा रोगानें पीडिलेल्या पुरुषाला याग करावयाचा अधिकार नाहीं. रथकार हा पहिल्या तीन वर्णांपैकीं नाहीं हें खरें; पण त्याला अग्नीचें आधान करितां येतें अशा तऱ्हेचें निराळें शास्त्र-वचन आहे; तसेंच निषादालाही रौद्रयाग करतां येतो. कित्येक दिवस चालू असणाऱ्या सत्रांत भाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला फलप्राप्ति होते. गुरूला वंदन कसें करावें व त्यांची आज्ञा कशी पाळावी ह्यासंबंधानें जे नियम सांगितले आहेत ते उपनयनाचे पर्वीं पाळावयाचे नसून उपनयनानंतर पाळावयाचे

Indira Gandhi National Centre for the Arts

असतात. तिन्ही उच्च वर्णांतील लोकांनीं शास्त्रांत सांगितलेल्या तिन्हीं ऋणांतून मुक्त होणें अत्यंत जरूर आहे; अवश्य म्हणून जीं कांहीं कर्तव्यें सांगितलीं आहेत तीं प्रत्येकानें यथाशक्ति करणें अत्यंत जरूर आहे. देवता, अग्नि, आनुषंगिक म्हणून सांगितलीं जाणारीं कृत्यें, मंत्र व यज्ञ करणारा पुरुष यांचीं कामें प्रतिनिधींकडून भागत नाहींत. ( यज्ञांतील ) पदार्थ जर सर्व किंवा अंशतः सांडले किंवा नाश पावले, तर त्यासंबंधीं घ्यावें लागणारें प्रायश्चित्त; ब्राह्मण हेच काय ते सत्र करण्यास अधिकारी आहेत; विश्वजित् यज्ञांत जी गोष्ट अगर वस्तु आपल्या खास मालकीची असेल तेवढीच दान करतां येते. आपलीं मातापितरें किंवा पत्नी यांचें दान करितां येत नाहीं. राजाला भूमिदान करतां येत नाहीं, कारण तिच्यावर सर्व प्रजेचा हक्क असतो. घोडे किंवा शूद्र ( ज्यांना कर्तव्य म्हणून त्रैवर्णिकांची चाकरी करावी लागते असे शूद्र ) यांचेंही दान करतां येत नाहीं. एक हजार संवत्सर चालू रहाणाऱ्या यज्ञासंबंधानें बोलतांना संवत्सर हा शब्द एक दिवस या अर्थानें वापरला जातो. ब्रह्मचाऱ्यानें जें बलिदान करावयाचें तें गृह्याग्नींतच करावयाचें, वैतान अग्नींत करावयाचें नाहीं. निषाद राजानें केलेल्या यज्ञालाही तोच नियम लागू आहे. दैवव्रत हें उदगयनांत शुद्ध पक्षांत एखाद्या सुमुहूर्त असणाऱ्या दिवशीं करावयाचें असतें.

( ७ ) अतिदेश म्हणजे काय ? ( दर्शपूर्णमासांत जे कांहीं विधि करावयाचे असतात तेच इतर यज्ञांतही करावयाचे कीं काय याविषयीं विवरण). दर्शपूर्णमासांतील सांगितलेलीं निरनिराळीं कर्मे ऐंद्राग्नांत व इतर सर्व यज्ञांत जरूरीप्रमाणें उपयोगांत आणलीं पाहिजेत. अगदीं स्पष्ट शब्दांतच जर सांगितलें असलें तरच अतिदेशाचा उपयोग करावयाचा असें नव्हे, तर शास्त्राचा तसा अर्थ तर्कशास्त्रान्वयें जर होत असेल तरीही करावयाचा. पहिल्या प्रकाराचें उदाहरण. श्येन यागांतील विधीप्रमाणेंच इषु यागांतील विधि करणें. तेंच नांव आल्यानेंही अतिदेश होतो. उदाहरणार्थ कुण्डपायिनामयन यांमध्यें अग्निहोत्र हें नाम आल्यामुळें अतिदेश होतो.

Indira Gandhi National Centre for the Arts

( ८ ) या पुस्तकांत अतिदेशाचें जें तत्त्व तें निरनिराळ्या उदाहरणांत कसें लागू केलें आहे याविषयीं विवेचन केलें आहे. येथें नियम आपण ध्यानांत ठेवावयाला पाहिजे तो हा. विकृति ( Modificatory ) यज्ञासंबंधानें जीं शास्त्रवचनें आहेत त्यांत ज्या गोष्टी सांगितल्या असतील व या यज्ञासंबंधीं जीं कांहीं आनुषंगिक वचनें असतील त्यांत ज्या गोष्टी सांगितल्या असतील त्या सर्व गोष्टी आणि दर्शपूर्णमासाप्रमाणें प्रकृतियज्ञांतले ते सर्व विधि सादृश्याच्या नियमाप्रमाणें दुसऱ्या इतर यज्ञांत करावयाला हरकत नाहीं. पण यज्ञफल स्वर्ग मिळवूं पहाणारा, यज्ञ करणारा पुरुष, जन्मभर अग्निहोत्र अंगीकारण्यासारखें मनुष्याच्या स्वातंत्र्याचे नियमन करणारे कांहीं नियम, दर्शपूर्णमासाप्रमाणें कृत्याची एकंदर विशिष्ट रचना येवढ्या गोष्टींत मात्र जे कांहीं नियम पाळावयाचे असतात, ते अतिदेशाचा आधार घेऊन दुसऱ्या गोष्टींना लावतां येत नाहींत. दर्विहोम हा गुणविधि नसून एक संज्ञा आहे आणि ती अष्टकासारख्या स्मार्तव्रतांनाहि त्याचप्रमाणें वैदिक व्रतांनाहि लागं पडत.

( ९ ) या पुस्तकांत ऊह म्हणजे काय यासंबंधानें विचार केला आहे. मन्त्र, सामन् ( Samans ) व संस्कार यांना अतिदशाचा नियम लागं करतांना त्यांत थोडा फार बदल करणें जरूर असतें. अग्निहोत्राचे जे एकंदर इत्थंभूत विधि करावयाचे असतात त्या सर्वांचा उद्दश “ अपूर्व ” हा असतो. फल हीच यज्ञांतील मुख्य गोष्ट होय; यज्ञदेवता ही नव्हे. आणि म्हणून यागांत जें कांहीं विधि करावयाचे असतात त या यज्ञदवतेकरतांच केले जातात असें नाहीं. ऊहांचीं उदाहरणें; ऊह कोठें लागू होत नाहीं अशीं उदाहरणें ज्योतिष्टोमांत सुब्रह्मण्य निगदांत खालील शब्द आहेत. “ हरिव आगच्छ ” ह्याच शब्दांचा उपयोग अग्निष्टुतांत वराल निगदाचा उपयोग केला गेला असतांना झाला आहे. अशा वेळीं ऊहाचे योगानें वरील शब्दप्रयोगांत फरक करूं नये.

( १० ) ह्या पुस्तकांत बाध आणि अभ्युच्चय या विषयांचा विचार केलेला आह. प्रकृति यांगांत ज्या ज्या गोष्टी करणें जरूर आहे असें सांगि-

Indira Gandhi National Centre for the Arts

तलें असेल त्या त्या सर्व गोष्टी विकृतियागप्रसंगीं केल्या पाहिजेत असें नाहीं. प्रायश्चित्तादाखल करावयाचीं कृत्यें, कांहीं शास्त्रीय संज्ञा, तसेंच प्रकृति यज्ञांत उपयोगांत आणलीं जाणारीं कांहीं द्रव्यें इत्यादि गोष्टी विकृति यागांत गाळल्या तरी चालण्यासारखें आहे. उदाहरणार्थ प्रकृति यागांत (Model) आरंभणीय इष्टि करणें जरूर असतें; पण दीक्षणीय यागांत या इष्टीची जरूर पडत नाहीं. द्वादशाहसत्रांत ऋत्विज निवडण्याची जरूरी नसते; ज्योतिष्टोमांत तशी असते. त्याचप्रमाणें द्वादशाहसत्रांत द्रव्य देऊन ऋत्विजांचें वरण करावयाचें नसतें, " वायव्यं श्वेतमालभेत " या वाक्यांत " श्वेत " हा शब्द पांढरा बोकड या अर्थी योजिला आहे. कोणचाही पांढरा प्राणि या अर्थी तो योजिला नाहीं. ज्योतिष्टोमांत दाक्षिणा म्हणून द्यावयाच्या गाई यज्ञ करणाऱ्या पुरुषानें स्वतः यज्ञांत भाग घेणाऱ्या ऋत्विजांस वांटून द्याव्यात. समुच्चयाचीं उदाहरणें यज्ञांत ज्या देवतांना आवाहन करावयाचें असेल त्यांना शास्त्रांत सांगितलेल्या संज्ञेनेंच आवाहन केलें पाहिजे. दुसऱ्या एखाद्या त्याच अर्थाच्या शब्दानें करून उपयोगी नाहीं. उदाहरणार्थ अग्निदेवतेला अग्नि या संज्ञेनेंच आवाहन केलें पाहिजे. पावक या संज्ञेनें करून उपयोगीं नाहीं. शास्त्रांत प्रकृति यागांतील कृत्यांच्या मालिकेंतील कांहीं गोष्टींचाच जर विकृति यागांत उपयोग करावयाचा असेल तर त्या मालिकेंतील अनुक्रमानें पहिल्या गोष्टींचाच उपयोग करावा. शेवटल्या गोष्टींचा करूं नये. सत्रांत एकापेक्षां जास्त यजमान असावयास पाहिजेत. सत्रांत यजमान हेच स्वतः ऋत्विज असतात. सत्र व अहीन यामधील फरक. सत्रांत कित्येक यजमान असतात. व " आसते, " " उपायन्ती " अशा शब्दांनीं सत्रांची शास्त्र संभावना करतें. अहीनांत यजमान अनेक नसतात आणि शास्त्र अहीनासंबंधानें बोलतांना " यजेत " यासारख्या शब्दाचा उपयोग करतें. बळी देण्याकरतां आणलेला सर्वच्या सर्व प्राणि हा कांहीं हविस् नव्हे. तर त्याच्या शरीराचे निरानिराळे भाग हे हविस् होत. प्रतिषेध, आणि पर्युदास यासंबंधीं विवेचन; नकारार्थी योजिला जाणारा " नञ् " या शब्दाचा अर्थ; हा शब्द पर्युदास किंवा अर्थवाद यांपैकीं एक असला पाहिजे. ( न तौ पशौ

Indira Gandhi National Centre for the Arts

करोति ' या वाक्यांत न शब्द अनुवादार्थी वापरला आहे. ) किंवा तो शब्द म्हणजे न प्रतिषेधही असूं शकेल. ( उदाहरणार्थ नातिरात्रे षोडशिनम् इत्यादि. )

( ११ ) ह्या पुस्तकांत तंत्र व आवाप यांचा विचार केला आहे. जें ( कृत्य ) नुसतें एकदां केलें असतांना, त्याचा पुष्कळ कर्मांत उपयोग होतो त्याला तंत्र असें म्हणतात. जें ( कृत्य ) पुष्कळ कर्मांत उपयोगी पडावें म्हणून पुष्कळ वेळां करावें लागतें त्याला आवाप असें ह्मणतात; दर्श-पूर्णमासांतील आग्नेयासारख्या ज्या कांहीं गोष्टी आहेत त्या सर्वांना मिळून स्वर्ग हें फल प्राप्त होतें. प्रत्येक गोष्टीला निरनिराळें असें फल सांगितलेलें नाहीं. यज्ञांतील सर्व अंगांचा हेतु एकच असतो. ( उदाहरणार्थ यज्ञ यशस्वी व्हावा ह्मणून खटपट करणें ) आणि म्हणून निरानिराळ्या प्रयत्नांना निरानि राळें फल सांगितलेलें नाहीं. कामनापूर्तीसाठीं करावयाचीं जीं व्रतें आहेत तीं वाटेल तितक्या वेळ करावयाला हरकत नाहीं. जीं कांहीं कृत्यें करावींत असें शास्त्रांत सांगितलेलें आहे ( साळी कांडणें यासारखीं ) त्यांचा अमूक अमूक दृश्य परिणाम होईपर्यंत करीत रहावें असें जर सांगितलें असेल तर तेवढा वेळपर्यंत ती क्रिया करीत रहाणें जरूर आहे; ज्या कृत्यांचा परिणाम दृग्गोचर होणें शक्य नाहीं अशीं कृत्यें पुनः पुनः करणें जरूर नाहीं. प्रयाजा-सारखीं अंगें फक्त एकदांच करावयाचीं असतात जेव्हां एखादा शब्द अनेक-वचनीं योजला असेल तेव्हां त्या अनेकवचनाचे योगानें संदर्भावरून दुसरा अर्थ स्पष्टपणें निघत नसेल तर तीन वस्तूंचा बोध होतो अशा अर्थाचा कपिं-जल न्याय; मुख्य व्रतांचे वेळीं व तसेंच आग्नेयादि गोष्टींचे वेळीं वेळ, काल, व ऋत्विज हे तेच असावेत या विषयीं विवेचन, अर्थकर्म व प्रतिपत्तिकर्म यांचीं उदाहरणें; आधान (जातिधर्माप्रमाणें अग्नींचें वसंत ऋतुंत, उन्हाळ्यांत, अगर पावसाळ्यांत आधान ) हें फक्त एकदांच करावयाचें प्रत्येक इष्टि पशु-याग व सोमयाग यांचे वेळीं पुनः पुनः करण्याची जरूर नाहीं यज्ञाचे वेळीं वापरलीं जाणारीं भांडीं यज्ञ करणाऱ्या पुरुषाच्या मृत्युकालपर्यंत



Indira Gandhi National Centre for the Arts

ठेवावयाचीं; कारण त्या पुरुषाचे अंत्यसंस्काराचे वेळीं तीं भांडीं मृतांबरोबरच दहन करावींत असें शास्त्र आहे. ( हें त्या भांड्यांचें प्रतिपत्तिकर्मच आहे. )

( १२ ) या पुस्तकांत प्रसंगाचा विचार केलेला आहे. एखादे वेळीं एखादे कृत्यांपैकीं कांहीं गोष्टी दुसऱ्याच एखाद्या कृत्याकरतां करण्याचा नाइलाजानें प्रसंग येतो. अशा अडचणीच्या वेळेलाच प्रसंग असें म्हणतात. अग्नीषोमीय पशूसंबंधानें जें एक प्रकरण आहे त्यांत एक पशुपुरोडाश सांगितलेला आहे. यासंबंधानेंच पशुयागांतील कित्येक अंगांची पुरोडाशाबरोबर पुनः पुनः आवृत्ति करावयाची कीं काय अशी एक शंका येते. या शंकेचें उत्तर तसें करण्याची जरूरी नाहीं असें आहे. जेव्हां जेव्हां निरनिराळ्या परस्परविरोधी धर्मांचा समुच्चय होत असेल, तेव्हां तेव्हां त्यांतील जास्तींत जास्ती पण विरोधी नाहींत असे धर्म घ्यावे. जेव्हां कित्येक वस्तु एकाच उपयोगाला येत असतील, ( उदाहरणार्थ तांदूळ आणि यव ) तेव्हां आपण आपल्या कामाकरितां कोणचीही वस्तु वापरावी. जेव्हां आपल्या हातून एखादें पाप चुकून झालें असेल व जेव्हां त्या पापाचे क्षालनार्थ निरनिराळीं प्रायश्चित्तें सांगितलीं असतील, तेव्हां त्या प्रायश्चित्तांपैकीं कोणचेंही एक प्रायश्चित्त घ्यावें; पण याखेरीज अन्य प्रसंगीं शास्त्रांत सांगितलेलीं सर्व प्रायश्चित्तें घेणें जरूर आहे. वेदपठणाच्या अनाध्यायाचे नियम फक्त वेदाभ्यासालाच लागू आहेत; यज्ञप्रसंगींच्या वेदपठणाला लागूं नाहींत. पहिल्यानें मंत्र म्हणून नंतर त्या मंत्रानुरूप क्रिया करावी; ( इषे त्वा इति छिनत्ति । याप्रमाणें ) हौत्र मंत्रांचे संबंधांत विकल्प नाहीं, कोणच्याही विवक्षित व्रत प्रसंगाचे नसलेले असे मंत्र, स्तुतिपर मंत्र आणि आशिर्वादपर मंत्र हे एकामागून एक म्हणावेत ( म्हणजे याचा समुच्चय होतो, विकल्प नाहीं ). सत्रांत अंजनासारखीं जीं संस्कार म्हणून करावीं लागणारीं कृत्यें तीं सर्व यज्ञ करणाऱ्या पुरुषांनीं करावींत. ऋत्विज् ( Priest ) होण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांचाच आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

जैमिनीसंबंधीं इतिहास दृष्ट्या फारच थोडी माहिती आहे असें म्हटलें असतां चालेल. ब्राह्मण, श्रौतसूत्र, आणि गृह्य-सूत्र ह्या तीन ग्रंथांचा कर्ता जैमिनी असावा असें समजलें जातें. पण पूर्व मीमांसाकाराचे हे ग्रंथ असावेत हें फार असंभवनीय दिसतें. तर्पणांत, आश्वलायन गृह्यांत, सुमंतु, वैशंपायन, यांचे बरोबर जैमिनीचाही नामनिर्देश आहे. [ सुमन्तु-जैमिनिवैशम्पायनपैलसूत्रभाष्यभारतमहाभारतधर्माचार्याः । ] भागवतपुराणांत (१२, ६, ७५) जैमिनी हा सुमंतूचा गुरु व सामवेदाचा प्रसारक होता असें म्हटलें आहे. पंचतंत्रांत मीमांसाकार जैमिनी हा हत्तीच्या पायाखालीं सांप-डून मारला गेला असा उल्लेख आहे. जैमिनी हा उत्तर हिंदुस्थानांतील लेखक असावा असें दिसतें. जैमिनीला म्लेच्छ भाषा निदान समजत होती असें शबराचें मत आहे. व मथुरावासी लोकांसंबंधीं जैमिनीच्या ग्रंथांत उल्लेख आहे. ( १, ३, २१ ) त्याच्या सूत्रांत ब्रह्मसूत्रांच्या इतकाही सुटसुटीत-पणा नाहीं; मग पाणिनीशीं तुलना तर करावयासच नको. शबराच्या वेळेला तर सूत्रांवर बरींच भाष्यें होतीं, येवढेंच नव्हे तर सूत्रांतच कित्येक पाठभेदही झाले होते. [ ये "तु ऐककर्म्यात् इति सूत्रं पठन्ति ।" शबर ११, १, १४–१५ ] शबरानें जैमिनीचीं कांहीं सूत्रें सोडून दिलीं आहेत असें तंत्रवार्तिकांत म्हटलें आहे [ तन्त्रवार्तिक पृ ६४६ " अत्रान्तरे भाष्य-कारस्य सूत्रं प्रभ्रष्टं वाक्यासमयादिति " पृ. ९१५ अतःपरं षट्सूत्राणि भाष्यकारेण न लिखितानि तत्र व्याख्यातारो विवदन्ते. ] शबराची ज्यांच्या-वर टीका नाहीं अशा सहा सूत्रांपैकीं एका सूत्राचा शंकराच्या ब्रह्मसूत्रांवरील भाष्यांत उल्लेख आढळतो ( ३, ४, १० ) तन्त्रवार्तिकाचे मतें जैमिनीच्या कांहीं सूत्रांत फारसा अर्थ नाहीं आणि म्हणून भाष्यकारांनीं तीं सूत्रें सोडून दिलीं असावींत. [ सन्ति च जैमिनेरेवं प्रकाराण्यप्यनत्यन्तसारभूतानि सूत्राणि । ]

जैमिनीसंबंधीं कांहीं माहिती

Indira Gandhi National Centre for the Arts

या ठिकाणीं सूत्रांवरील टीकाकाराविषयीं आणि मीमांसाशास्त्रावरील कांहीं महत्त्वाच्या ग्रंथाविषयीं विचार करणें जरूर आहे. या ठिकाणीं अशा ग्रंथांची परिपूर्ण अशी यादी देणें मात्र शक्य नाहीं. अगदीं जुन्यांत जुना टीकाकार वृत्तिकार होय. शबर हा वृत्तिकाराचा उल्लेख नेहमीं फार सन्मानपूर्वक करतो असें आपल्याला आढळून येतें. ( 'अत्र भवान्' किंवा, 'भगवान्' २, ३, १६; ३, १, ६; ७, १, २, ) कांहीं ठिकाणीं शबराचा व वृत्तिकाराचा मतभेदही झालेला आपल्या दृष्टीस पडतो हें येथें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. ( १, १, ३–५; ७, २, ७, ) शबरानें वृत्तिकारावर टीकाही करावयाला कमी केलें नाहीं. ( २, १, ३३ ) वृत्तिकाराचें नांव काय होतें हें ठरविणें शक्य नाहीं. आनंदगिरीसारखे पुष्कळ विद्वान् गृहस्थ उपवर्ष हाच वृत्तिकार असावा असें म्हणतात. महामहोपाध्याय डॉक्टर गंगानाथ झा यांचेंही तसेंच मत आहे. पण असें म्हणणें शक्य दिसत नाहीं, सूत्रासंबंधीं वृत्तिकाराचे जे कांहीं विचार आहेत ते थोडक्यांत सांगत असतांना शबर हा उपवर्षाचें मतही आधारादाखल मधून मधून पुढें करतो. ( १, १, ३–५ ) ब्रह्मसूत्रावरील भाष्य लिहीत असतांना शंकराचार्यही उपवर्षाचें तेंच मत उल्लेखितात. आणि उपवर्षानें पूर्व व उत्तर मीमांसा या दोन्ही ग्रंथांवर टीका लिहिली आहे असेंही आपल्याला सांगतात ( ३, ३, ५३, ) तंत्रवार्तिकांत ( पृ. ३७–२, १, १२ ) उपवर्षाला महाभाष्यकार असें म्हटलें आहे, असें सोमेश्वराच्या न्यायसुधेचें मत आहे. तंत्रवार्तिकांत वृत्तिकार व भगवान् उपवर्ष या दोघांचाही एकाच ठिकाणीं उल्लेख आलेला आहे, व तेथें त्या दोघांमधील फरकही दाखविलेला आहे. (तंत्रवार्तिक पृ. ६०७–२, ३, १६,) यावरून आपल्याला असें दिसून येईल कीं, वृत्तिकार व उपवर्ष हे दोघे निरनिराळे लेखक असावेत. शबर हा एकाच सूत्राचे निरनिराळे अर्थ असणें शक्य आहे असें म्हणतो. (४, १, २; ४, ३, २७–२८; १, ८ ३४, ३९; ८, ३, १४–१५; ९, १, १, आणि ३४–३५ ) यावरून शबरापूर्वी कित्येक टीकाकार होऊन गेले असावेत असें अनुमान काढावयाला हरकत

पूर्वमीमांसा पद्धतीचें कांहीं वाङ्मय.

Indira Gandhi National Centre for the Arts

नाहीं. दुसऱ्या लेखकांनीं देखील सूत्रावर पुष्कळ टीकाकारांनीं टीका लिहिल्या आहेत असें म्हटलें आहे. कुमारिलानें श्लोकवार्तिकांत ( १, ९३ ) भवदास हा एक टीकाकार होता असें म्हटलें आहे. न्यायरत्नकारानें (श्लोकवार्तिक १,१०) भर्तृमित्रानें मीमांसासूत्रावर एक प्राचीन टीका लिहिली आहे, व त्यांत मीमांसाशास्त्रांत पाखंडवादी होते असें दर्शविलें आहे. शास्त्रदीपिकेंत हरीचा उल्लेख आहे. ( १०, २, ५९–६० ) या सर्वांचा आपसांत व शबराशीं काय संबंध आहे हें आपल्याला आज सांगतां येणें शक्य नाहीं. सध्यांतरी त्यांच्या नांवापलीकडे आपल्याला त्यांच्यासंबंधानें जास्त कांहीं माहिती नाहीं. शबराच्या भाष्यावरून जी काहीं माहिती मिळणें शक्य होती तेवढी मीं गोळा केली आहे. ( मुंबई रॉयल एशियाटिक सोसायटीचें जर्नल १९२३. पु. नं. २६, ३४, Part ५,) शबराला, कात्यायन पतञ्जली पिंगलाचा छंदोबद्ध ग्रंथ, पाणिनीय शिक्षा, बौधायन, आपस्तंब धर्मसूत्र, मनुस्मृति, महाभारत, पुराणें, बौद्ध शून्यवाद वगैरे ग्रंथांची व मतांची माहिती होती. कुमारिल पुष्कळ वेळां शबराचीं वचनें आपल्या ग्रंथांतून उद्धृत करतो. व मधून मधून त्यांचेवर प्रतिकूल टीकाही करतो. शांकरभाष्यांतही शबराचा उल्लेख आहे.(३,३, ५३.) एकंदरींत शबर हा इ. स. ५००च्या पूर्वीं आणि १००च्या नंतर एवढ्या दरम्यानच्या काळांत झाला असावा. खालील विवेचनावरूनही आपल्या वरील सिद्धान्तालाच बळकटी येते. हा ग्रंथकार उत्तर हिंदुस्थानचा रहिवासी होता. यापलीकडे आपल्याला त्याच्या ठावठिकाणाविषयीं जास्त कांहीं एक माहिती मिळत नाहीं. म्लेंच्छ हे पक्षी पकडण्यांत व त्यांची वाढ करण्यांत कुशल आहेत ( १, १, ३०, ) असें हा म्हणतो. तसेंच जो क्षत्रिय देशाचें अगर आपल्या नगराचें संरक्षण करण्यांत आपली उपजीविका न करतां कार्यक्रमणा करतो त्याला आन्ध्रलोक ' राजन् ' असें म्हणतात असें शबर आपल्याला सांगतो. वराहमिहिर, भर्तृहरि, विक्रम, हरिश्चन्द्र, शंकू आणि अमर हे शबराचे मुलगे होत अशी एक दंतकथा आहे [ ब्राह्मण्यामभवद्वराहमिहिरो ज्योतिर्विदामग्रणी राजा भर्तृहरिश्च विक्रमनृपः क्षत्रात्मजायामभूत् । वैश्यायां हरिचन्द्रवैद्यतिलको जातश्च शङ्कुः कृती शूद्रायाममरः षडेव शबर-

Indira Gandhi National Centre for the Arts

स्वामिद्विजस्यात्मजः] शबराचें खरें नांव आदित्यदेव असें होतें. जैन लोकांच्या जुलमांतून मुक्त होण्याकरतां व त्याचा त्रास चुकविण्याकरतां तो जंगली माणसाप्रमाणें राही, ह्मणून त्याला शबर असें नांव पडलें अशीही एक दंतकथा आहे. दत्तकमीमांसा या ग्रंथांत सत्याषाढ हिरण्यकेशी सूत्रावर शबराची टीका आहे असा उल्लेख आढळतो, हाच बहुतकरून मीमांसाभाष्यकार असावा. दीप्तस्वामींचा मुलगा शबर स्वामी यानें लिंगानुशासनावर सर्वार्थलक्षणी नांवाची टीका लिहिली आहे. हा शबरस्वामी व भाष्यकार हे दोघेही एकच आहेत कीं काय हें सांगतां येणें आज शक्य नाहीं.

कुमारिल आणि शबर यांच्या काळांत कित्येक शतकें मध्यें गेलीं असलीं पाहिजेत. कुमारिल हा मीमांसाशास्त्रावर एक प्रसिद्ध लेखक समजला जातो. ह्यानें श्लोकवार्तिक ( १–१ ) तंत्रवार्तिक (१–२–३) आणि पूर्वमीमांसासूत्राच्या शेवटल्या नऊ अध्यायांतील सूत्रांवर टुप्‌टीका इत्यादि ग्रंथरचना केली आहे. कुमारिल हा कट्टा मीमांसक होता, व त्याचे विचार नेहमीं प्रभाकराच्या विचाराविरुद्ध असतात. तो शबरावर नेहमींच टीका करितो. ( तंत्रवार्तिक पृ. ७२८, ८१७, ९९७, ११२७, ११५० ) भाष्यकारांनीं जीं सहा सूत्रें सोडून दिलीं आहेत, त्याबद्दल कुमारिलानें आपलें जें मत प्रदर्शित केलें आहे त्यावरून आपल्याला एक अनुमान काढतां येतें; तें हें कीं, शबर आणि कुमारिल यांच्या मधल्या काळांत सूत्रांवर व शबराच्या भाष्यावर कित्येक टीका झाल्या असल्या पाहिजेत. कुमारिलाच्या ग्रंथांत शबराखेरजि दुसऱ्या भाष्यकाराचा उल्लेख केलेला आढळतो. ( ग्रंथांत त्याला भाषांतरकार असें नांव दिलेलें आहे ) हा भाषांतरकार शबरानंतर केव्हांतरी झाला ( तंत्रवार्तिक पृ. ६१६ ६२५, १००८, आणि न्यायसुधा, पृ. ४८० ) कुमारिल वाक्यपदीय या ग्रंथावर टीका करतो. हा ग्रंथ इ. स. ६५० च्या सुमारास रचला गेला असावा असें अनुमान निघतें. वाचस्पतिमिश्र हा कुमारिलाचा शिष्य होऊन गेला. ह्यानें मंडनमिश्राच्या विधिविवेक या ग्रंथावर टीका लिहिली आहे. ह्यानेंच आपला एक ग्रंथ

Indira Gandhi National Centre for the Arts

विक्रम संवत ८९८ म्हणजे इ. स. ८४१ सालीं लिहिला. यावरून कुमारिल हा इ. स. ७५० च्या सुमारास आपल्या ग्रंथरचनेनें प्रसिद्धीस आला होता असें म्हणतां येईल. कुमारिल हा कुमाराचा अथवा कार्तिकेयाचा अवतार आहे अशी एक दंतकथा आहे. कदाचित् कुमारिलाच्या नांवावरूनही लोकांना ही दंतकथेची कल्पना सुचली असेल. कुमारिल हा दक्षिण हिंदुस्थानांतील तामिल किंवा मलयालम् या प्रदेशांतील रहिवासी होता. कारण त्याच्या आपल्या ग्रंथांत त्या प्रदेशांतील भाषेंतील कित्येक शब्द आढळतात, ( तंत्रवार्तिक पृ. १५७ ). लाट भाषाही ( सुरतेच्या जवळपासच्या प्रदेशांतील भाषा ) कुमारिलाला येत होती असें दिसतें. ( पृ. २००, ९८९ ). कुमारिलाला भट्टपाद या नांवानें इतर ग्रंथकार संबोधितात. मेधातिथीनेंही त्याला भट्टपादच म्हटलें आहे. अर्वाचीन ग्रंथकार त्याला नुसतें " भट्ट " म्हणतात व त्याचे अनुयायांना भाट्ट या नांवानें संबोधितात.

प्रभाकराचा संप्रदाय.

प्रभाकरानें ( ह्याला गुरु असेंही म्हणतात ) शबराच्या भाष्यावर दोन टीका लिहिल्या एक मोठी, व एक लहान. मोठ्या टीकेचें नांव बृहती आणि लहान टीकेचें नांव लघ्वी. ( गायकवाड सरकारच्या ओरिअंटल् सिरिजमध्यें रामानुजाचार्यांचा तंत्ररहस्य हा ग्रंथ छापला आहे तो पहावा ). बंगालच्या एशियाटिक सोसायटींत " बृहती " टीकेची एक हस्तलिखित प्रत आहे. आणि त्यांत प्रभाकराला गुरु असें म्हटलेलें नाहीं. महामहोपाध्याय डॉक्टर गंगानाथ झा यांचें मतें प्रभाकराच्या जरूरीपेक्षां जास्त विवरण करण्याच्या, व, त्याच्या गुंतागुंतीच्या पद्धतीची चेष्टा करण्याच्या उद्देशानें कांहीं लोक त्याला 'गुरु' म्हणूं लागले असावेत. प्रभाकराचा एक शिष्य शालिकनाथ या नांवाचा होता. त्यानें आपल्या ग्रंथांतून प्रभाकराला 'गुरु' या बहुमानवाचक नांवानें संबोधलें आहे. आणि यांवरूनही कदाचित् लोक प्रभाकराला गुरु म्हणूं लागले असावेत. ( प्रकरणपञ्चिका पृ. १२, ४४, १२६, २०१ पहा ). [ शास्त्रमुखं नाम गुरोराविष्कर्तुं गभीरमपि भावम्' प्रकरण प. पृ. १२ ].

Indira Gandhi National Centre for the Arts

शालिकनाथानें कांहीं ठिकाणीं प्रभाकराला नुसतें प्रभाकर या नांवानेंहि संबोधलें आहे. शालिकनाथ प्रभाकराच्या शिष्यांना प्राभाकर असें नांव देतो ( प्रकरण पृ. ७४, १४१, १८८ ). नंतरच्या लेखकांनीं प्रभाकराला निबंधनकार असें नांव दिलें आहे. ( शास्त्रदीपिका २, १, १, व प्रबोध-चन्द्रोदयावरील चंद्रिका नांवाची टीका ( २, ३ ) पहा. ). प्रभाकराचा व कुमारिलाचा काय संबंध होता हा वादग्रस्त प्रश्न आहे. प्रभाकर हा कुमारिलाचा शिष्य होता अशी एक कथा आहे. शंकराचार्यविरचित समजल्या जाणाऱ्या सर्व सिद्धान्तसंग्रहांत वरील कथेला दुजोरा मिळतो ( १, १८-१९ मीमांसावार्तिकं भाट्टं भट्टाचार्यकृतं हि तत् । तच्छिष्योल्पभेदेन शबरस्य मतान्तरम् । प्रभाकरगुरुश्चक्रे तद्धि प्राभाकरं मतम् ॥ ). सर्वसिद्धान्तसंग्रह हा ग्रंथ पुष्कळ कारणावरून आचार्यांचा असणें शक्य नाहीं, व तीं सर्व कारणेंही येथें देणें स्थलाभावामुळें शक्य नाहीं. पूर्व मीमांसा व उत्तरमीमांसा हीं दोन्ही एकच शास्त्रें आहेत, ही गोष्ट आचार्यांना मुळींच कबूल नाहीं. ( १, १, १, ) सर्वसिद्धांतसंग्रहांत मात्र पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा व देवताकान्ड हीं तिन्ही मिळून एकच शास्त्र कल्पिलें आहे. या दोन विद्वानांच्या ग्रंथांवरून डॉक्टर गंगानाथ झा यांचें मत असें झालें आहे कीं, प्रभाकर हा कुमारिलाचा शिष्य असणें शक्य नाहीं. डॉक्टर साहेबांचे मतें प्रभाकर हा कुमारिलाच्या अगोदर होऊन गेला. दोघांच्याही कालांत असलाच तर फारच थोडा फरक असेल याविषयीं शंका नाहीं. शालिकनाथ हा प्रभाकराचा शिष्य होता हें आपण मागें पाहिलच आहे. त्यानें सुद्धां कुमारिलाच्या श्लोकवार्तिकावर प्रतिकूल टीका केली आहे. ( श्लोक १, २ हा ५ व्या पानावर सांपडतो व श्लोकवार्तिकांतील अभाव प्रकरण १३२ कविता २८ वी ही प्रकरणपंचिकेचें १२२ वें पान आणि श्लोकवार्तिकें, अथापत्ति प्र. कविता २१ प्रकरणपंचिकेच्या ११४ पानावर ) यावरून कुमारिल व प्रभाकर हे समकालीन होते असें दिसून येतें. न्यायरत्नकाराच्या मतें कुमारिल कांहीं ठिकाणीं प्रभाकराचा उल्लेखही करतो. नुसत्या दोघांच्या लेखनशैलीवरून दोघांचें कालमान ठरविणें शक्य नाहीं. आणि

Indira Gandhi National
Centre for the Arts

181.42
KAN



कुमारिलाची चपळ अशी भाषाशैली, व प्रभाकराची साधी व सडेतोड लेखनपद्धति हे दोन लेखकांचे निरानिराळे गुण त्यांच्या परिस्थितीमुळें व कर्तृत्वशक्तीच्या भिन्नतेमुळें त्यांच्या भाषेंत आले आहेत. कदाचित् प्रभाकर हा कुमारिलापेक्षां थोडा अगोदर झाला असेल. प्रबोधचन्द्रोदयांत पूर्व मीमांसाशास्त्रावर ज्यांनीं ग्रंथकर्तृत्व केलें आहे अशा चार लेखकांचीं नांवें दिलीं आहेत, तीं येणेंप्रमाणें गुरु, कुमारिल, शारिक (म्हणजेच शालिकनाथ) आणि वाचस्पति [ नैवाश्रावि गुरोर्मतं न विदितं कौमारिलं दर्शनं तत्वज्ञानमहो न शारिकगिरां वाचस्पतेः का कथा । ] शेवटल्या तीन ग्रंथकारांचीं नांवें त्यांच्या कालानुक्रमानें दिलीं आहेत. हें उघड दिसतें. तेव्हां प्रभाकर हा कुमारिलाचे अगोदर झाला असें जर आपण अनुमान काढलें तर आपली फारशी चूक होणार नाहीं. प्रबोधचन्द्रोदय हा ग्रंथ इ. स. १०५० ते १११६ यांचे दरम्यान केव्हां तरी लिहिला गेला आहे. (Epi. Ind. Vol. १ पृ. २२०) कुमारिलाच्या सडेतोड व विजयी लेखनशैलीमुळें प्रभाकराचा संप्रदाय हळूहळू मागें पडला. तरीपण जुन्या ग्रंथांतून प्रभाकराचा उल्लेख आढळतोच. मालकी ही "लौकिक" आहे कीं नाहीं या प्रश्नाचा विचार करतांना मिताक्षरेंत प्रभाकराचा उल्लेख आहे [ द्रव्यार्जनस्य प्रतिग्रहादिना स्वत्वसाधनत्वं लोकसिद्धमिति पूर्वपक्षः समर्थितो गुरुणा 'ननुच द्रव्यार्जनस्य क्रत्वर्थत्वे स्वत्वमेव न भवतीति याग एव न संवर्तेत प्रलपितमिदं केनापि अर्जनं स्वत्वं नापादयतीति विप्रतिषिद्धाम्' इति वदता' हा भाग पू. मी. ४, १, २, या ठिकाणीं आहे. ] देशांतील सर्व भागांत प्रभाकराचे ग्रंथाचा अभ्यास केला जात होता आणि प्रभाकर सांप्रदायाचें विशिष्टत्व इ. स. १८ व्या शतकापर्यंत मान्य केलें जात होतें असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं वार्तिककार हा प्रभाकराच्या थोड्या अगोदर होऊन गेला असावा आणि त्याचीं मतें ग्राह्य असें समजून नंतर प्रभाकरानें ग्रंथरचना करण्यास सुरवात केली असावी. प्रकरणपंचिकेंत कोणा एका वार्तिकाकारमिश्राचा गौरवपूर्वक उल्लेख केलेला आहे ( पृ. ३ ) हा लेखक कुमारिल नसावा, कारण कुमारिलाच्या ग्रंथांत हीं अवतरणें सांपडत नाहींत. तंत्र-

I.G.N.C.A. LIB. Deptt. of Arts GOVT. OF INDIA S-12387
Indira Gandhi National Centre for the Arts

वार्तिकांत कुमारिलानें वार्तिकाकाराचा उल्लेख केला आहे असें दिसतें. हा वार्तिककार वृत्तिकाराच्या नंतर व शबराच्या अगोदर झाला असावा. [ सूत्रेष्वेवाहि तत्सर्वं यद्वृत्तौ यच्च वार्तिके। सूत्रं योनिरिहार्थानां सर्वं सूत्रे प्रतिष्ठितम् ॥ इति ये वदन्ति तान् प्रत्युच्यते ] या कारणामुळेंच जुनें वार्तिक कोणचें तें समजावें म्हणून कुमारिलाच्या ग्रंथांना श्लोकवार्तिक व तंत्रवार्तिक अशीं नांवें दिलीं गेलीं असावींत.

आतां प्रभाकराचे महत्त्वाचे ग्रंथ या ठिकाणीं सांगावयास हरकत नाहीं. प्रभाकरानें बृहती व लघ्वी अशा दोन टीका लिहिल्या हें आपण मागें पाहिलेंच आहे. शालिकनाथ मिश्रानें ( शालिकनाथानें स्वतःला प्रकरणपंचिकेंत हें नांव घेतलें आहे. पृष्ठ ३८ ) या दोन टीकांवर आपल्या दोन टीका लिहिल्या बृहतीवरच्या टीकेचें नांव 'ऋजुविमला' व लघ्वीवरच्या टीकेचें नांव 'दीपशिखा' ( प्रबोधचन्द्रोदय २, ३ वरील 'चन्द्रिका' नावाची टीका आणि तन्त्ररहस्य पहा ). शालिकनाथानें अगदीं स्वतंत्र अशी प्रकरणपंचिका या नांवाची ग्रंथरचना केली. ( हा ग्रंथ चौखंबा ग्रंथमालेंत छापला गेला आहे. ) या ग्रंथांत, मीमांसाशास्त्राचा हेतु, प्रमाणें, ज्ञान, व त्याची स्वतःची योग्यता व अधिकार, आत्म्यासंबंधीं विचार इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींचा विचार केलेला आहे. शालिकनाथ ह्यानें आपल्या ग्रंथांत धर्मकीर्तीनें प्रत्यक्ष या शब्दाची जी व्याख्या केली आहे तिचा उल्लेख केला आहे. ( प्रकरण पान. ४७ ), हा ग्रंथकार कुमारिलानंतर म्हणजे सरासरी इ. स. ७५० च्या सुमारास प्रसिद्धीस आला. डॉ. कीथ ( कर्ममीमांसा पान ९ नोट २ ) यांनीं त्याला कुमारिलाच्या अगोदर ओढलें आहे तें चूक आहे. याच प्रसिद्ध ग्रंथकाराचे मतानें प्रकरण पंचिकेंत उद्योतकाराचा उल्लेख केला गेला आहे. आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ हे ग्रंथकार प्रकरणपंचिकेच्या ४४ पानाचा हवाला देतात, पण त्या पानांत वरील ग्रंथकाराच्या म्हणण्याला पोषक असें कांहीं नाहीं, तेथें फक्त गौतमानें दिलेली 'प्रत्यक्षाची' व्याख्या व दुसऱ्या इतर लेखकांनीं त्यासंबंधीं केलेलें विवेचन येवढ्याच गोष्टी सांपडतात. भव-

Indira Gandhi National Centre for the Arts

नाथानें न्यायविवेक नांवाचा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथांत त्यानें शालिकनाथाच्या दोन्ही टीका आणि प्रकरणपंचिका या तिन्ही ग्रंथांचें थोडक्यांत सार दिलें आहे. स्मृतिचंद्रिकेंत (इ. स. १२०० चा सुमार) वडिलोपार्जित मिळकतींतील मुलाला जन्मतःच जो हिस्सा प्राप्त होतो त्याविषयीं विवेचन करतांना भवनाथाचा आधार घेतलेला आहे. महोदधि हा शालिकनाथाचा सहाध्यायी होता, आणि त्यानें प्रभाकराच्या मतांसंबंधानें ग्रंथरचना केली आहे असें प्रबोधचन्द्रोदयावरील चन्द्रिका नांवाच्या टीकेंत लिहिलें आहे. या सांप्रदायाचा अगदीं अलीकडचा ग्रंथ म्हटला म्हणजे रामानुजाचार्यांचें तन्त्ररहस्य हा होय.

कुमारिलाच्या अनुयायांनीं केलेली ग्रंथरचना.

कुमारिलाच्या अनुयायांची ग्रंथरचना बरीच आहे. पार्थसारथिमिश्र यानें न्यायरत्नाकर या नांवाची श्लोकवार्तिकावर एक टीका लिहिली. (ही टीका चौखंबा मालेंत प्रसिद्ध झाली आहे) सुचरितमिश्रानें त्याच ग्रंथावर काशिका नांवाची टीका लिहिली. पार्थसारथिमिश्र हा माधवाच्या अगोदर झाला. पार्थसारथीनें शास्त्रदीपिका नांवाची जैमिनीच्या सूत्रांवर टीका (ही टीका निर्णयसागरानें प्रसिद्ध केली आहे), तन्त्ररत्न (यांत सूत्र व भाष्य यांतील कठीण अशा मुद्यांचें विवेचन केलें आहे,) आणि न्याय रत्नमाला (हें पुस्तक बनारसला प्रसिद्ध झालें आहे) असे तीन ग्रंथ लिहिले. हा शेवटचा ग्रंथ मीमांसाशास्त्रावर एक स्वतंत्र ग्रंथ असून त्यावर रामानुजानें आपल्या नायकरत्नांत टीका लिहिली आहे. हा रामानुज विशिष्टाद्वैत सांप्रदायाचा मूळ प्रवर्तक नव्हे हें आपण येथें ध्यानांत ठेवलें पाहिजे. कुमारिलशिष्य भट्टोम्बेक यानेंही श्लोकवार्तिकवर टीका लिहिली आहे. शास्त्रदीपिकेवर (निर्णयसागर प्रत) युक्तिस्नेहप्रपूरणी या नांवाची एक टीका आहे. त्या टीकेंत भट्टोम्बेकाचें श्लोकवार्तिकाच्या पहिल्या कवितेवरचें मत दिलें आहे [ उक्तंच भट्टोम्बेकेन ग्रंथारंभेऽभिमतदेवतानमस्कारं करोति वार्तिककारः। इति पृ.२ ] मालतीमाधवाच्या एका हस्तलिखित प्रतींत तें नाटक

Indira Gandhi National Centre for the Arts

कुमारिलाचा एक शिष्य उम्बेकाचार्य यानें लिहिलें आहे असं म्हटलें आहे (पंडिताची 'गौडवहो'ला लिहिलेली प्रस्तावना पृ. २०६ ). त्याचप्रमाणें चित्सुख [ ज्या चित्सुखीच्या मजकुरांत उम्बेकाचार्य व भवभूति हे दोघेही एकच आहेत असें म्हटलें आहे तो मजकूर फार मनोरंजक आहे " आप्तोदीरितवाक्येषु मालतीमाधवादिषु । व्यभिचारान्न तद्युक्तमाप्तत्वस्यानिरुक्तितः ॥ स्वकपोलकल्पितमालतीमाधवादिवाक्येषु प्रामाण्याभावादतिव्याप्तिः । नहि पुराप्त एव सन्नाटकनाटिकादिप्रबंधविरचनमात्रेणानाप्तो भवति भवभूतिः । उक्तं चैतदुम्बेकेन यदाप्तोपि कस्मैचिदुपदिशति न त्वया ननु भूतार्थविषयं वाक्यं प्रयोक्तव्यं यथाङ्गुल्यग्रे हस्तियूथशतमास्ते इति तत्रार्थव्यभिचारः स्फुटः " इति यावरून चित्सुखाच्या मतें सुद्धां ते दोघेही एकच होते असें दिसतें. ] ( पृ. २६५ निर्णयसागर प्रत) या ग्रंथाच्या टीकाकारानें उम्बेक व भवभूति हे दोघे एकच आहेत असें सांगितलें आहे. उम्बेकाचार्याचा ग्रंथ आतां उपलब्ध झाला आहे. महादेवाचा मुलगा सोमेश्वर ह्यानें न्यायसुधा नांवाचा ( याच ग्रंथाला राणक असें दुसरें नांव आहे व हा ग्रंथ बनारस येथें प्रसिद्धही झाला आहे ) तंत्रवार्तिकावर टीकाग्रंथ लिहिला आहे. सोमेश्वर हा निदान इ. स. १५०० पूर्वी झाला असला पाहिजे. कारण त्याचे ग्रंथांचा शंकरभट्टाच्या द्वैतनिर्णयांत उल्लेख केलेला आहे, व एका हस्तलिखित प्रतीवर १४४० हें वर्ष लिहिलेलें आहे. ( १४४० काय ? शके कीं संवत् ). सोमेश्वरानें आपल्या तार्किकाभरण नांवाच्या ग्रंथांत, व वेंकटेश्वर दीक्षितानें आपल्या वार्तिकाभरण नामक ग्रंथांत कुमारिलाच्या टुपटिकेवर टीका लिहिल्या आहेत. कुमारिलाचा एक विद्यार्थी मंडनमिश्र यानें विधिविवेक नांवाचा एक स्वतंत्र ग्रंथ लिहिला. आणि मीमांसानुक्रमणी या नांवानें शबरभाष्याचा अर्थ थोडक्यांत लिहून काढला. वाचस्पतिमिश्रानें आपल्या न्यायकणिका नांवाच्या ग्रंथांत विधिविवेकाचा अर्थ स्पष्टपणें सांगितला आहे. याच वाचस्पतिमिश्रानें तत्त्वबिंदु या नांवाचा दुसरा ग्रंथ लिहिला आहे. प्रबोधचंद्रोदयावरील चन्द्रिका नांवाच्या टीकेंत महाव्रत हा

Indira Gandhi National Centre for the Arts

भट्टाचा अनुयायी होता आणि भवदेवाचा ग्रंथ त्या कालीं लोकमान्य झाला होता असें म्हटलें आहे. बंगालमध्यें राढा येथें एक शिलालेख सांपडला त्यांत भवदेवाची त्याच्या मीमांसाशास्त्राच्या व ज्योतिषशास्त्राच्या ज्ञानाबद्दल खूप स्तुति केली आहे. ( Epi. Ind. Vol. 6 p. २०३ ff) इसवी सनाच्या अकराव्या शतकाच्या उत्तरार्धांत भवदेव झाला. भवदेवानें "तौतातितमतातिलक" या नांवाचा एक स्वतंत्र ग्रंथ आणि तंत्रवार्तिकावर एक टीका असे दोन ग्रंथ लिहिले. माधवाच्या 'जैमिनीय न्यायमालाविस्तार' या ग्रंथांत ( आनंदाश्रम पुणें ) कारिकाच्या द्वारें मीमांसासूत्रांच्या कित्येक अधिकरणांत काय आहे हें सांगितलें आहे व त्याचेंच गद्यांतही विवरण केलेलें आहे. अप्पय्यादीक्षितानें विधिरसायन या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. ( हा ग्रंथ बनारस येथें प्रसिद्धही झाला आहे ). नारायण भट्टानें शास्त्रदीपिकेवर टीका लिहावयाला सुरवात केली होती. ती टीका त्याचा मुलगा शंकर भट्ट यानें पुरी केली; तसेंच त्यानें मीमांसारससंग्रह ( चौखंबामाला ), मीमांसाबालप्रकाश ( चौखंबामाला ) व विधिरसायनदूषण असे तीन ग्रंथ लिहिले. तिसरा ग्रंथ त्यानें अप्पय्यादीक्षिताचें मतखंडन करण्याकरितां लिहिला. मानमेयोदय या ग्रंथांत प्रभा म्हणजे काय व प्रमेय कोणतें, याविषयीं कुमारिलाचें मत दिलें आहे व ठिकठिकाणीं बृहती, शालिकनाथ व दुसरे कित्येक ग्रंथकार यांचे दाखले दिले आहेत. खंडदेवानें ( हा इ. स. १६६५ च्या सुमारास वारला ). भाट्टदीपिका ( हा ग्रंथ प्रसिद्ध झालेला आहे ) आणि मीमांसाकौस्तुभ या नांवाचे ग्रंथ लिहिले. शिवराज्याभिषेकाच्या वेळीं प्रमुख भाग घेणारे गागाभट्ट यांनीं भाट्टचिंतामणि नांवाचा ग्रंथ रचिला. हा ग्रंथ विद्वानांना मान्य झाला आहे. लौगाक्षि भास्कराच्या अर्थसंग्रहांत ( ह्या ग्रंथाचें डॉक्टर थीबो यांनीं भाषांतर केलें असून ता बनारस सिरीजमध्यें प्रसिद्ध झाला आहे ) आणि आपदेवाच्या मीमांसान्यायप्रकाशांत मीमांसाशास्त्रांतील शास्त्रीय संज्ञा व मीमांसेचीं प्रमुख तत्त्वें यांचें विवेचन आहे.

Indira Gandhi National
Centre for the Arts

पूर्व मीमांसाशास्त्र हें रूढ अशा सहा 'दर्शनांपैकीं' एक दर्शन आहे. बाकीच्या पांच दर्शनांचीं नांवें सांख्य, योग, न्याय, वैशेषिक आणि वेदांत अशीं आहेत. आतां पूर्वमीमांसाशास्त्रानें हिंदुस्थानच्या तत्त्वज्ञानांत काय भर घातली आहे आणि या शास्त्राला आपल्याला "पद्धति" अशी शास्त्रीय व भारदस्त अशी संज्ञा लावून घेतां येईल कीं नाहीं हें आतां आपल्याला येथें पहावयाचें आहे. आजपर्यंत मीमांसाशास्त्राच्या ज्या कांहीं शाखा व उपशाखा झाल्या त्या सर्वांचा येथें विचार करणें अशक्य आहे. आज आपण सूत्रें, शबराचें भाष्य, कुमारिल व प्रभाकर यांचे ग्रंथ आणि त्यांच्या अनुयायांचीं लिखाणें, या ग्रंथावरून मीमांसापद्धतीचीं महत्त्वाचीं अशीं कोणतीं मूलतत्त्वें आहेत हीं शोधून काढण्याचा प्रयत्न करूं या. हीं मूलतत्त्वें प्रस्थापित करावयाला कोणच्या तर्कपद्धतीचा अंगिकार केला गेला हें अर्थात् आपल्याला येथें पहाणें शक्य नाहीं.

पूर्वमीमांसा शास्त्रांतील महत्त्वाचीं तत्त्वें.

पूर्वमीमांसाशास्त्राचा उद्देश धर्म ह्मणजे काय हें समजून घेणें हा आहे. वेदांताचा उद्देश ब्रह्म म्हणजे काय याचा शोध लावणें हा आहे. धर्मग्रंथांतील कांहीं अवतरणें मनुष्याला आपलें कर्तव्य करावयास उद्युक्त करतात. हीं अवतरणें आज्ञार्थी ( असें असें तूं कर असें सांगणारीं ) असतात. अशा धर्मग्रंथांतील अवतरणांतून मनुष्यानें करावयाचीं म्हणून जीं कांहीं कर्में सांगितलेलीं असतात त्यांना मीमांसाशास्त्र धर्म असें म्हणतें. नंतर धर्मशास्त्रांतील या आज्ञा कोठून येतात [चोदनालक्षणोऽर्थो धर्मः। पूर्वमी. १,१,२,] हा प्रश्न आपल्यापुढें उभा रहातो. या आज्ञा आपल्याला कोण करतो? या प्रश्नाचें उत्तर या आज्ञा चिरंतन अच्युत आणि स्वयंभू जो वेद त्यांतून आपल्याला मिळतात. प्रत्यक्षाचा येथें कांहीं एक संबंध नाहीं. वेद हे अनादि व अपौरुषेय आहेत हा मीमांसाशास्त्राचा आदिसिद्धान्त आहे. वेदांतमताप्रमाणें सर्वसमर्थ ब्रह्मापासून वेद झाले आहेत. [ शास्त्रयोनित्वात्। ब्रह्मसू

Indira Gandhi National Centre for the Arts

१, १, ३, ] पतंजलीच्या मताप्रमाणें वेदांतील वाक्यरचना ही सनातन नसून वेदांचा अर्थ हा सनातन आहे.

वेद हे प्रमादातीत व अनादि असल्यामुळें शबराच्या मताप्रमाणें कोणच्याही वादांत वेदांचा शेवटला शब्द असावयाला पाहिजे [ शब्दप्रमाणका-वयं यच्छब्द आह तदस्माकं प्रमाणम् । शबर , २, ३५, ]. वेदांचें नित्यत्व सिद्ध करण्याकरतां जैमिनीनें मोठालीं प्रमाणें पुढें केलीं आहेत. त्याच वेळीं शब्द व अर्थ हेंही नित्य टिकणारे आहेत असेंही सिद्ध करण्याचा त्यानें यशस्वी प्रयत्न केला आहे. वेदग्रंथ हा फार मोठा असल्याकारणानें जैमिनीनें त्याचे पांच भाग केले आहेत. विधि, प्रतिषेध, अर्थवाद ( प्रायश्चित्तें व शिफारशीदाखल पुढें ठेविले जाणारे ग्रंथांतील उतारे ), नामधेय ( श्येनासारख्या नुसत्या संज्ञा ) व मंत्र ( यागाचे वेळीं म्हणावयाचे ) अशीं वर सांगितलेल्या पांच भागांचीं नांवें आहेत. एकंदरींत धर्म काय आहे हें विधि ठरवितात. निरनिराळ्या मुख्य मुद्यांच्या दृष्टीनें या विधींचीं निरनिराळ्या प्रकारानें वर्गवारी करतां येते. अगदीं खास असे समजले जाणारे विधि-नियम व परिसंख्या हा वर्गवारीचा पहिला प्रकार होय. नित्य नैमित्तिक व काम्य हा दुसरा उत्पत्तिविधि ( अग्निहोत्रं जुहोति या वचनांतल्याप्रमाणें ), विनियोगविधि ( दध्ना जुहोति या वचनांतल्याप्रमाणें ) व अधिकारविधि ( राजा राजसूयेन यजेत या वचनांतल्याप्रमाणें ) हा तिसरा प्रकार आहे व क्रत्वर्थ व पुरुषार्थ हा चवथा प्रकार आहे. येथें जैमिनि हा स्मृति व होलाकासारख्या चालीरीति यांच्या आज्ञा बंधनकारक आहेत हें कबूल करतो, पण या आज्ञा वेदवाक्यांशीं विसंगत असून उपयोगी नाहीं. शास्त्रांत ज्या आज्ञा पाळाव्यात म्हणून सांगितलें असतें त्या जर पाळल्या तर त्याची फलप्राप्ति काय हेंही तेथेंच सांगितलेलें असतें. जेथें ही फलप्राप्ति सांगितलेली नसते तेथें सर्व कर्मांची फलप्राप्ति स्वर्ग असें जाणावें. (विश्वजिन्न्याय पूर्व मीमांसा ४, ३, १५. ) [ स स्वर्गः स्यात्सर्वान्प्रत्यविशिष्टत्वात् ] कोणच्याही तत्त्वज्ञान-पद्धतीमध्यें जगाचा नियंता कोण आहे, व लोकांना पुण्याबद्दल सुफल

Indira Gandhi National Centre for the Arts

कोण देतो व पापाचें शासन कोण करतो हे प्रश्न फार महत्त्वाचे आहेत, या प्रश्नाला मीमांसाशास्त्राचें खालील उत्तर आहे. यज्ञदेवता, अथवा परमेश्वर हे कांहीं मनुष्याला त्याच्या सुकृत्याबद्दल फल देत नाहींत; तर सुकृत्यें केल्यामुळें एक तऱ्हेची अदृश्य शक्ति (Invisible potency अगर अपूर्व) उत्पन्न होते व ही शक्ति मनुष्याला त्याच्या सुकृत्याचें फल देतें. [ चोदना पुनरारम्भः पूर्व मीमांसा २, १, ५, शबर म्हणतो " चोदनेति अपूर्वं ब्रूमः । अपूर्वं पुनरस्ति यत–आरम्भः शिष्यते स्वर्गकामो यजेतेति । इतरथा हि विधानमनर्थकं स्याद्भङ्गित्वाद्यागस्य । ब्रह्मसूत्रांत ( ३, २, ४० धर्मं जैमिनिरत एव ) जैमिनीच्या या मताचा उल्लेख आहे. ] जैमिनीचे व त्याच्या अनुयायांचे देवतांचेसंबंधीं विचार फारच विलक्षण आहेत. जैमिनीच्या मतें यज्ञांतील देवता गौण असते. ज्या ठिकाणीं देवता व हविस् ( हवनीय द्रव्य) यांचेमध्यें विरोध उपस्थित होईल तेथें ' हविस् ' लाच मोठेपणा दिला पाहिजे [विप्रतिपत्तौ हविषा नियम्येत कर्मणस्तदुपाख्यत्वात् । पूर्व मी. १,३२। 'अपि वा शब्दपूर्वत्वाद् यज्ञकर्म प्रधानं स्याद्गुणत्वे देवताश्रुतिः' पूर्वमीमांसा ९, १, १०, ] वेदांत यज्ञकर्म व देवता यांचा संबंध दाखविलेला आहे. आणि देवतेला बलिदान करावें असेंही सांगितलेलें आहे. पण देवता ही हाविष्याचा उपभोग घेऊं शकत नाहीं; देवतेला शरीर नाहीं; यज्ञ हा देवतेला संतोषित करण्याकरितां केला जात नाहीं; देवता ही सर्व वस्तूंची राज्ञी नाहीं; देवता ही मनुष्याचें कल्याणही करीत नाहीं. आणि यज्ञफल जें कांहीं मिळतें तेंही या देवतेपासून मिळत नाहीं. जैमिनीसूत्रांची ही अशी विचारपरंपरा आहे (९, १, १–१०) दुसऱ्या एका ठिकाणीं शबरानें असें म्हटलें आहे कीं, यज्ञदेवता या इतिहासांत व पुराणांत सांगितलेल्या व स्वर्गांत वास करणाऱ्या देवता नव्हेत तर ज्यांना उद्देशून सूक्तें म्हटलीं जातात, व ज्यांना हविर्दान करावें असें सांगितलें आहे, त्या ह्या देवता आहेत. [ शबर ४,२,३, तस्मात् सूक्तभाजो हविर्भाजश्च देवताः । यस्या वाचकं शब्दमुद्दिश्य स्मृत्वा वा हविस्त्यक्ष्यामीति संकल्पः क्रियते सा देवता भवति तत्र

...देवतायाश्च यज्ञसाधनभावो न रूपेण भवति केन तर्हि संबंधिना शब्देन। ...ननु एवं शब्द एव देवता प्राप्नोति । अत्रोच्यते । नैतदस्माभिः परिहर्तव्यं न हदिमुच्यमानमस्मत्पक्षं बाधते सुतरां शुच्यादीनामप्रसंग इति । ’ ] शबर पुढें म्हणतो देवता ही यज्ञांतील फक्त साधन आहे यज्ञदेवता हा नुसता शब्दप्रयोग आहे; आणि जेथें अग्नीलाच हविस् ( हवनीय द्रव्य ) द्यावें असें स्पष्टपणें सांगितलेलें आहे तेथें तेथें अग्नि या शब्दाचे जागीं पावक किंवा शुचि अशा तऱ्हेचे त्याच अर्थाचे शब्द वापरून उपयोगी नाहीं. प्रभाकर व कुमारिल यांचींही अशींच मतें आहेत. यज्ञदेवतेसंबंधीं त्यांचे विचारही सर्वसाधारण लोकांचे त्या देवतेविषयीं जे विचार आहेत, त्या विचारांच्या विरुद्ध आहेत, पण यज्ञदेवतेसंबंधानें त्यांचे नक्की विचार काय आहेत. याचा नीटसा उलगडा होत नाहीं. [ प्रकरणपञ्चिका पृ. १८५ पहा. ननु देवता फलदानसमर्था कर्मभिराराध्यते साराधिता प्रसन्ना भवाति प्रसन्नाच कर्तॄन्कालान्तरेपि फलेन योजयत्येवेति । नैतदेवम् । यागादीनां देवताराधन-हेतुत्वे प्रमाणाभावात्......अतो देवतोद्देशेन द्रव्यत्यागो याग इति गौणं देवतापूजात्मकत्वमवगमयितव्यम् । ’ ]

या नंतरचा सर्व प्रकारच्या तत्त्वदर्शनांत येणारा महत्वाचा प्रश्न म्हणजे जगाची उत्पत्ति कशी झाली हा होय. येथेंसुद्धां मीमांसेची एकंदर प्रवृत्ति निरीश्वरवादाचीच आहे. साकार अशा परमेश्वरानें हें जग उत्पन्न केलें किंवा ईश्वरी इच्छेनें परमाणूंना गति मिळून त्यामुळें विश्वाची उत्पत्ति झाली या दोन्ही गोष्टी प्रभाकर व कुमारिल या दोघांनांही नाकबूल आहेत. वैशेषिकांचें मत मात्र प्रभाकर व कुमारिल यांच्या उलट आहे [ प्रकरणपञ्चिका पृ. १३७-१४० न चेश्वरस्य सर्वज्ञानमपि सिध्यति ज्ञानहेत्वभावेन ज्ञानाभावनिश्चयात् । तेनानादिरेव वृद्धपरंपरा शब्दार्थावगमे हेतुर्न सृष्ट्यादावीश्वरकृतः संकेतः ( पृ. १३९ ) श्लोकवार्तिक ( संबंधाक्षेपपरिहार कविता ४३-१ ७. तस्मादद्यवदेवात्र सर्गप्रलयकल्पना । समस्तक्षयजन्मभ्यां न सिध्यत्यप्रमाणिका ॥ सर्वज्ञवान्निषेध्या च स्रष्टुः सद्भावकल्पना । ......... तस्मात्प्रागपि



Indira Gandhi National Centre for the Arts

सर्वेमी स्रष्टुरासन् पदादयः........अन्वेष्यो व्यवहारोयमनादिर्वेदवादिभिः ११३-११७ ] प्रभाकर व कुमारिल यांचें असें म्हणणें आहे कीं, जग हें कोणी उत्पन्न केलेलें नाहीं. तें आरंभाशिवायच किंवा स्वयंभू आहे. आणि वेदही परमेश्वरानें उत्पन्न केले नसून ते स्वयंभु आहेत. एकंदरींत वरील दोन्ही विद्वानांना सर्वज्ञानी व सर्वशक्तिमान् असा विश्वाचा एखादा उत्पत्तिकर्ता आहे व कालांतरानें अस्तित्वांत असलेल्या जगाचा लय होऊन पुन्हां दुसरें विश्व तयार होतें या दोन्ही गोष्टी मान्य नाहींत असें उघडउघड दिसतें.

विश्वाचा उत्पत्तिकार, जगाची उत्पत्ति, वेदांचें अपौरुषेयत्व ( वेद हे साकार किंवा निराकार, मर्त्य किंवा अमर अशा कोणीच उत्पन्न केले नाहींत अशा तऱ्हेचें मत ) या तीन गोष्टींसंबंधानें मीमांसाशास्त्राचीं जीं मतें आहेत त्यामुळें हें शास्त्र पाखंडी आहे अशा तऱ्हेचे विचार आपल्याला ऐकायला येतात. [ प्रायेणैव हि मीमांसा लोके लोकायतीकृता । तामास्तिकपथे कर्तुमयं यत्नः कृतो मया। श्लोकवार्तिक १-१० ] मीमांसाशास्त्र हें लोकायत मताच्या दर्जाला आलें आहे ( म्हणजे हें शास्त्र ईश्वर नाहीं आत्मा नाहीं. जगांत नीतिदृष्ट्या चांगलें वाईट कांहीं नाहीं असा पाखंडवाद करतें ) ही गोष्ट कुमारिलभट्ट कबूल करतो. आणि माझें काम मीमांसाशास्त्रासंबंधीं झालेला हा गैरसमज घालवून त्यांत नीतिदृष्ट्या चांगलें काय व वाईट काय या गोष्टींचें महत्त्व आहे असें शाबीत करणें हें आहे. मीमांसाशास्त्र पाखंडवादी नाहीं हें सप्रमाण सिद्ध करणें हें आहे असें तो आपल्या वाचकांना बजावून ठेवतो.

परमेश्वर व सृष्टीची उत्पत्ति यांचेसंबंधानें विचार करीत असतांना आत्म्याचे आस्तित्वाचा प्रश्न आपोआपच आपलेपुढें येतो. जैमिनीच्या ग्रंथांत आत्म्याच्या अस्तित्वाविषयीं एकसुद्धां सूत्र नाहीं ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. पण जैमिनीनें आत्म्याचें आस्तित्व गृहीत धरलें असावें असें समजण्यालाही जागा आहे. ( स्वर्गकामा यजेत यासारख्या वैदिक

Indira Gandhi National Centre for the Arts

वाक्यानें हीच गोष्ट सूचित होते ) आणि अशा तऱ्हेचें अनुमान त्याच्या सूत्रांतही सांपडतें ( ३, ७, १८ ) [ शास्त्रफलं प्रयोक्तरि तल्लक्षणत्वात् तस्मात्स्वयं प्रयोगे स्यात् ] आत्म्याच्या आस्तित्वासंबंधानें जैमिनी कांहीं बोलत नाहीं हें खरें, पण शबर मात्र शरीरविरहित, व शरीरावर अवलंबून नसणाऱ्या आत्म्याचें अस्तित्व, इंद्रियें, सुख व दुःख यांच्या जाणीवी इत्यादि गोष्टींचें विवरण फार विस्तारानें करतो. ( पृ. १८–२४ B.I. प्रत ) प्रभाकर व कुमारिल यांचे मतें प्रत्येक शरीरांत निरनिराळा आत्मा आहे; आत्मा हा शरीर, इंद्रियें व बुद्धि यांपेक्षां कांहींतरी निराळा आहे. हे निरनिराळ्या शरीरांत वास करणारे आत्मे सर्वव्यापी व शाश्वत आहेत. [ प्रकरणपञ्चिका पृ. १४१ पहा. बुद्धीन्द्रियशरीरेभ्यो भिन्न आत्मा विभुर्ध्रुवः । नानाभूतः प्रतिक्षेत्रमर्थवित्तिषु भासते ॥ प्रकरणप. पृ. १४१ श्लोकवार्तिक पृ. ६८९–७२४ ( आत्मवाद ) ज्ञानशक्तिस्वभावोतो नित्यः सर्वगतिः पुमान् । देहान्तरक्षमः कल्प्यः सोऽगच्छन्नेव योक्ष्यते ] मीमांसाशास्त्र हें निरनिराळ्या आत्म्याचें आस्तित्व मानतें ह्या गोष्टीवरूनच मीमांसाशास्त्र हें पाखंडी नाहीं असें सिद्ध होतें अशी कुमारिलाची विचारसरणी आहे. [ इत्याह नास्तिक्यनिराकरिष्णुरात्मा स्तितां भाष्यकृदत्र युक्त्या । दृढत्वमेतद्विषयश्च बोधः प्रयाति वेदान्तनिषेवणेन ॥ आत्मवाद १४८ ] यज्ञाभिमानी लोक (Ritualists) व वेदान्ती हे वेदाच्या निरनिराळ्या भागांवर कसा भर देतात हें येथें लक्षांत घेणें जरूर आहे; यज्ञाभिमानी लोकांचे मतें वेदांचा उद्देश म्हणजे मनुष्यप्राण्याला आपलीं कर्तव्यें करण्यास उद्युक्त करणें हा आहे. आणि म्हणून उपनिषदांचा जर कांहीं उपयोग असेल तर ( या उपनिषदांत आत्मा ह्मणजे काय व त्याचा ब्रह्माशीं काय संबंध आहे हें दाखविलें आहे ) तो वेदप्रणीत कर्मांचा जो कर्ता याविषयीं माहिती देणें हा होय. उपनिषदांतील उपदेशाचा दुसरा कांहीं एक उद्देश नाहीं. [ एतेन क्रत्वर्थकर्तृप्रतिपादकप्रतिपादनद्वारेणोपनिषदां नैराकांक्ष्यं व्याख्यातम् । तन्त्रवार्तिक पृ. १३ ] वेदान्ती लोकांचें म्हणणें असें आहे. कर्ममार्गाकडे नेणारा जो वेद तो फक्त अपराविद्या आहे. कर्ममार्ग पहिल्यानें आचरून त्याहून श्रेष्ठ असें जें ज्ञान तें

Indira Gandhi National
Centre for the Arts

हस्तगत करून घ्यावयाचें आणि ब्रह्मज्ञान प्राप्त होणें याला स्वतःचा व स्वतंत्र असा कांहीं हेतु आहे. (ज्ञान हें कर्ममार्गाकरतां नाहीं. तें स्वतंत्र आहे व ज्ञानाकरतांच ज्ञान आपण हस्तगत करून घेतलें पाहिजे. ) ( वरील कल्पना खालील वाक्यातही आली आहे. "ब्रह्मविदाप्नोति परम्" किंवा ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति. )

प्रभाकर व कुमारिल या दोघांच्याही ग्रंथांत मोक्षासंबंधी विवरण आहे. पण त्यांच्या मोक्षाचा अर्थ वेदान्ती लोकांच्या मोक्षाच्या अर्थापासून फार भिन्न आहे. अविद्या नाहींशी झाली कीं, आपोआपच मोक्षप्राप्ति होते असें वेदान्त्यांचें मत आहे. प्रभाकराचे मतें मनुष्याचे शरीरांतील सर्व धर्म अधर्म वगैरे प्रकार नाहींसे झाले म्हणजे शरीराच्या अस्तित्वाचेंच मुळीं काम रहात नाहीं. अशा तऱ्हेची अवस्था येणें म्हणजे मोक्ष [ प्रकरणपञ्चिका पृ. १५४ ते १६० अतो नाविद्यास्तमयो मोक्षः । आत्यन्तिकस्तु देहोच्छेदो निःशेषधर्माधर्मचपरिक्षय-निबन्धनो मोक्ष इति सिद्धम । धर्माधर्मवशीकृतस्तु जीवस्तासु तासु यानिषु संसरति । ...... यः खलु सांसारिकेभ्यो दुःखेभ्य उद्विग्नस्तदनुषङ्गशबले-भ्यश्च सुखेभ्योपि गतस्पृहो मोक्षायोत्तिष्ठते स तावद्बंधनहेतुभूतेभ्यो निषिद्धेभ्यः प्रत्यवायहेतुभूतेभ्योभ्युदयसाधनेभ्यश्च निवर्तमानः सन्नूत्पन्नपूर्वौ धर्माधर्मौ भोगेन कृतावपि क्षयं नयन् शमदमब्रह्मचर्यादिकाङ्गोपबृंहितेनात्मज्ञानेन न पुनरावर्तत इत्यपुनरावृत्तये चोदितेन निःशेषकर्माशयं नाशयन् मुच्यते । प्रकरणप. पृ. १५६-१५७ ]

शरीराला वर सांगितलेली अवस्था खालीं लिहिल्याप्रमाणें येते असें प्रभाकराचें मत आहे. पहिल्याप्रथम मनुष्याला संसाराचा पूर्ण कंटाळा येतो. त्याला संसारांतील सुखें सुद्धां नकोशीं होतात. कारण त्या सुखांत थोडाबहुत दुःखाचा अंश हा असतोच. या नंतर मनुष्याला मोक्षप्राप्तीची इच्छा होऊं लागते. नंतर शास्त्रनिषिद्ध अशीं कर्में करणें तो सोडून देतो. कारण तसल्या

Indira Gandhi National Centre for the Arts

कर्मांनीं मनुष्याला एक तऱ्हेच्या मानसिक पारतंत्र्यांत रहावें लागतें हें त्याला अनुभवानें समजलें असतें. तसेंच परलोकांत सुख व्हावें म्हणून या लोकांत करावयाचीं कर्मेंही तो सोडून देतो, नंतर त्यानें आयुष्यांत जीं कांहीं चांगलीं वाईट कर्में केलीं असतील त्यांचीं फळें भोगून त्या कर्मांतून तो थोडाबहुत मुक्त होतो. नंतर शम, दम, ब्रह्मचर्य वगैरे गोष्टींच्या सहाय्यानें तो आत्मज्ञान संपादन करतो ( अशा तऱ्हेचें ज्ञान संपादन करावें अशी उपनिषदांची आज्ञा आहे. ) नंतर त्या त्या ज्ञानप्राप्तीचे जोरावर तो पूर्णपणें कर्मयुक्त होतो आणि नंतर तो मुक्त होतो. कुमारिलाचेंही साधारणतः असेंच मत आहे. " आत्म्याची ओळख करून घे " (बृहदारण्य २, ४-५) या अर्थाचीं उपनिषदांत कांहीं वाक्यें आहेत. ही आज्ञा मोक्ष हें फल मिळावें या अर्थानें केलेली नाहीं. आत्मज्ञान झालें कीं, मनुष्याला यज्ञयाग करण्याची इच्छा होते. आणि श्रुतींत म्हणजेच उपनिषदांत आत्मज्ञानाचें जें फल म्हणून सांगितलेलें आहे तें निव्वळ अर्थवाद आहे. स्वर्गाहून इतर दुसरें कांहीं असें फल खास नाहीं. [ श्लोकवार्तिक पहा ( सबन्धाक्षेपपरिहार कविता १०२–११ ) आत्मा ज्ञातव्य इत्येतन्मोक्षार्थं न च चोदितम् । कर्मप्रवृत्तिहेतुत्वमात्मज्ञानस्य लक्ष्यते ॥ विज्ञातं चास्य पारार्थ्ये यापि नात्र फलश्रुतिः । सार्थवादो भवेदेव न स्वर्गादेः फलान्तरम् ॥ क. १०३–१०४ तस्मात्कर्मक्षयादेव हेत्वभावेन मुच्यते । नह्यभावात्मकं मुक्त्वा मोक्षनित्यत्वकारणम् ॥.........मोक्षार्थी न प्रवर्तेत तत्र काम्यनिषिद्धयोः । नित्यनैमित्तिके कुर्यात् प्रत्यवायजिहासया ॥ प्रार्थ्यमानं फलं ज्ञातं न चानिच्छोर्भविष्यति । ]

पूर्वमीमांसेचीं आणखीही कांहीं दुसरीं तत्त्वें येथें सांगणें अप्रस्तुत व्हावयाचें नाहीं. पूर्वमीमांसेंतील मताप्रमाणें जेवढें कांहीं ज्ञान म्हणून आहे ( Cognition ) तें सर्व स्वतः प्रमाण आहे. तें तसें नसेल तर तें तसें नाहीं असें म्हणणाऱ्यानें तसें शाबीत केलें पाहिजे. हें मत सांख्यमताविरुद्ध आहे. सांख्यमताप्रमाणें स्वतः प्रमाणता ( Validity ) किंवा अ-

Indira Gandhi National Centre for the Arts

प्रमाणता ( Invalidity ) ह्यांचें अस्तित्व दुसऱ्या कोणच्याही रीतीनें शाबीत करण्याची जरूरीच नाहीं. नैयायिकांच्या मतें ह्या दोन्ही गोष्टी दुसऱ्या पुराव्यावर अवलंबून आहेत. बौद्धांचे मतें सर्व ज्ञानच मुळीं अप्रमाण ( Invalidity ) आहे. आणि सप्रमाणता ही दुसऱ्या पुराव्यानें शाबीत केली पाहिजे. [ श्लोकवार्तिक सूत्र २ क. ३३–६१ आणि प्रकरणपञ्चिका पृ. ३२–३८ पहा ] एकंदरींत वरील बाबतींत पूर्वमीमांसेचें कोणाशींच पटत नाहीं.

मीमांसेचें दुसरें तत्त्व म्हटलें म्हणजे ' वाक्यांतील मुख्य भाग म्हटला म्हणजे क्रियापद हा आहे ' हें होय. ( २, ११–४ ).

शब्दाचा अर्थ ( import ) काय यासंबंधीं नुसतीं रणें माजलीं आहेत. पूर्वमीमांसामताप्रमाणें जाति ( वर्ग ) हा शब्दांचा मुख्य ( primary ) अर्थ आहे. (१. ३. ३३.) [ आकृतिस्तु क्रियार्थत्वात् । श्लोकवार्तिक आकृतिवाद पृ. ५४५ पहा ]. व्याकरणकाराच्या मतें जाति, द्रव्य, गुण अथवा क्रिया ह्या गोष्टी शब्दांचा मुख्य अर्थ आहेत. जुन्या नैयायिकांच्या मतें जातीनें दर्शविली जाणारी वस्तु हा शब्दाचा मुख्य अर्थ आहे. एकंदरींत येथेंही पूर्वमीमांसेचें व व्याकरणकार व नैय्यायिक यांचें पटत नाहीं.

प्रमाणें म्हणजे काय व तीं कोणचीं यासंबंधीं जैमिनी कोठेंही विवरण करीत नाहीं. 'प्रत्यक्षा'ची व्याख्या मात्र त्यानें दिली आहे. व अनुमानांचाही त्यानें उल्लेख केला आहे. वृत्तिकारांत सहाही प्रमाणांचीं नांवें दिलीं आहेत. तीं येणेंप्रमाणें—प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थापत्ति व अभाव किंवा अनुपलब्धि.

पूर्वमीमांसेची सत्यान्वेषणाची एक विशिष्ट पद्धति आहे. या पद्धतीनें जे कांहीं निर्णय ठरविले जातात त्यांचा अधिकरणांमध्यें समावेश होतो. अधिकरणाचे एकंदर पांच घटक आहेत. १ विषय ( वादाचा ) २ संशय,

Indira Gandhi National Centre for the Arts

३ पूर्वपक्ष ( वादांत साधारणतः बरोबर दिसणारी बाजू ) ४ उत्तरपक्ष ( पूर्वपक्षाला उत्तर ) व ५ सिद्धान्त ( वादाचे शेवटीं ठरला जाणारा निश्चय ). कांहीं ग्रंथकार उत्तरपक्षाच्या जागीं संगति ( मागें काय झालें व पुढें काय व्हावयाचें यांचा वादाचे विषयाशीं जो संबंध तो ) हा चवथा घटक समजावा असें म्हणतात. ही वर्गीकरणाची पद्धति फार सोइस्कर अशी आहे व ती तर्कशास्त्रांतील विचक्षणेला व बुद्धिसामर्थ्याचा प्रभाव दाखविण्याला योग्य अशी आहे. ब्रह्मसूत्रांतही याच पद्धतीचा अंगिकार केलेला आहे.

कुमारिल व प्रभाकर यांचेमधील महत्त्वाचे मतभेद.

ह्या दोन विद्वान् ग्रंथकारांचें पुष्कळ विषयांवर एकमत आहे हें जितकें खरें आहे, तितकेंच पुष्कळशा विषयांवर द्विमत होतें हेंही खरें आहे. त्यांचे जिथें जिथें मतभेद होतात ते सर्व विषय येथें देणें अशक्य आहे. त्यांपैकीं महत्त्वाचे असे कांहीं खालीं दिले आहेत.

(१) पहिल्या सूत्रासंबंधानें कुमारिलाचें असें म्हणणें आहे कीं ‘ स्वाध्यायो ध्येतव्यः ’ या वाक्यांतील विधि वाचकाला वेदाचा अर्थ शोधून काढावयाला सांगतो. प्रभाकराच्या मताप्रमाणें वेदांचा अर्थ शोधून काढावा असें सांगणारा वेदाचा भाग हाच कांहीं मीमांसाशास्त्राचा आत्मा (Moving Spring) नव्हे. शिक्षणासंबंधीं जीं वेदांतील आज्ञार्थी वाक्यें आहेत, ( अष्टवर्षम् ब्राह्मणमुपनयीत तमध्यापयीत ) त्यांचे योगानें पुरुषाला मीमांसाशास्त्राकडे धांव घ्यावी लागते [ प्रकरणपञ्चिका पृ. ५, १२ श्लोकवार्तिक सूत्र १ क. ७६–११० ] शिक्षकाला विद्यार्थ्याची जरूरी लागते आणि म्हणून शिक्षण म्हटलें कीं त्यांत अभ्यासाचा समावेश झालाच. ‘स्वाध्यायो ध्येतव्यः’ हे शब्द सर्वमान्य अशा गोष्टीचे फक्त अनुवाद आहेत.

( २ ) कुमारिलाच्या मताप्रमाणें धर्माची व्याख्या होणें शक्य नाहीं या सिद्धान्ताला दुसऱ्या सूत्रांत चांगलें उत्तर दिलें आहे. तसेंच त्यांत धर्माची

Indira Gandhi National
Centre for the Arts

उत्कृष्ट व्याख्याही दिली आहे आणि त्यांतूनच धर्माचें ज्ञान प्राप्त करून घेण्याकरितां वेदांत उत्कृष्ट साधनेंही आहेत असाही गर्भितार्थ निघतो. प्रभाकराच्या मताप्रमाणें पहिल्या सूत्रांत वेदाभ्यास झाल्यानंतर धर्मसंबंधीं विचारणा करण्यास सुरुवात करावी असें सांगितलें आहे. ह्या ठिकाणीं सर्व वेदांचा पूर्ण अर्थ येथें ध्वनित केला आहे आणि म्हणून धर्म या शब्दांत संपूर्ण वेदाची कल्पनाही येईल. या दुसऱ्या सूत्रांत वेद हा शब्द ( पहिल्या सूत्राप्रमाणें ) संपूर्णार्थी ( त्यांत निव्वळ अर्थवाद, व मंत्र यांचाही समावेश व्हावा अशा रीतीनें ) वापरलेला नाहीं, तर ज्यांत कांहीं तरी लोकांनीं करावें असा आज्ञार्थी भाग आहे तेवढा भाग दर्शविण्यापुरताच ह्या शब्दाचा उपयोग केलेला आहे. ( कार्यरूप म्हणजे सिद्धरूप नव्हे तो ) [ जैमिनीन्यायमाला विस्तार पृ. १४–१७ आनंदाश्रममाला पहा. ]

( ३ ) प्रभाकराचें अन्विताभिधान मत आहे. म्हणजे प्रभाकराचे मतें शब्दांचा अर्थ त्यांचा उपयोग वाक्यांत केला गेला म्हणजेच येतो. कुमारिलाचें मत अभिहितान्वय आहे म्हणजे शब्दांना स्वतःचा असा कांहीं अर्थ आहे. त्यांना असा अर्थ आहे म्हणूनच त्यांचा वाक्यांत उपयोग करतात व सर्व शब्द मिळून वाक्याचा अर्थ स्पष्ट करून दाखवितात.

( ४ ) प्रभाकराच्या मताप्रमाणें ‘ प्रमाणें ’ फक्त पांचच आहेत [प्रकरणपञ्चिका पृ. १३–१६ पहा ] प्रभाकर ‘ अभाव ’ हें प्रमाण आहे हें कबूल करीत नाहीं. कुमारिलाच्या मताप्रमाणें ‘प्रमाणें’ सहा आहेत.

( ५ ) अर्थापत्तीसंबंधानें कुमारिलाचा व प्रभाकराचा मतभेद आहे. “देवदत्त दिवसा कांहीं खात नाहीं ” हें वाक्य श्रुतार्थापत्तीचें एक उदाहरण म्हणून कुमारिल देतो [ श्लोकवार्तिक पृ. ४७३–४९२. प्रकरणपञ्चिका पृ. ४४–११८–१२४, १२९–१३२ ] प्रभाकराला वरील उदाहरण श्रुतार्थापत्तीचें आहे हें कबूल नाहीं. [ श्लोकवार्तिक अर्थापत्तीवरील कविता ५१६० प्रकरणपञ्चिका पृ. ११६–११८ श्लोकवार्तिकावरील न्यायरत्नकाराचे मतें ( अर्थापत्ति क. ९ पक्षदोषेषु चान्यासामुदाहरणविस्तरः )

Indira Gandhi National Centre for the Arts

कुमारिलानें प्रभाकराच्या बृहट्टीकेचा स्पष्ट उल्लेख केला आहे. ही गोष्ट विद्वानांच्या ध्यानांत आलेली नाहीं. ]

(६) निरनिराळया अधिकरणांच्याविषयीं प्रभाकर व कुमारिल यांच्यांत पुष्कळ मतभेद आहे. उदाहरणार्थ जैमिनीय–न्याय–माला–विस्तार १, २, १९–२५ पहा. ( विधिवन्निगदाधिकरण ), १, ३, २४–२९ ( साधु शब्द प्रयुक्ति अधिकरण ) १, ३, ३१–३५ ( आकृत्याधिकरण ) १,१,४,२, (उद्भिदादिनामधेयताधिकरण ) १,४,९, ( आग्नेयादिधिकरणनामधेयता) १, ४, १०, ( बर्हिरादिशब्दानां जातिवाचित्व ) १४, १३, १६, ( वैश्वदेवादिशब्दानां नामधेयता ) २, १, ५, ( अपूर्वाधिकरण ) २, १, ६--८, ( कर्मणां गुणप्रधानभाव ) २, २, १, ( अंगापूर्व ) इत्यादि.

पूर्वमीमांसाशास्त्राला नवीन असें कांहीं विशेष तत्त्वज्ञान शिकवावयाचें नाहीं, व त्यांत जगाची उत्पत्ति, परमेश्वराचें साकारत्व, विश्वाचें नैतिक शासन करणारी शक्ति, आत्मा म्हणजे काय इत्यादि महत्त्वाच्या वेदांतविषयासंबंधानें खल नाहीं, ह्या दोन्हीही गोष्टी खऱ्या आहेत. पण तेवढ्यानें या शास्त्राची योग्यता कमी होते असें नाहीं. वेदांचें चिरकालत्व, कर्तव्यासंबंधीं कांहीं ठोकळ नियम, शब्दांच्या व वाक्यांच्या अर्थासंबंधीं या शास्त्रानें सांगितलेली उपपत्ति आणि आपलें ह्मणणें प्रस्थापित करण्याकरतां शास्त्रांत केला जाणाऱ्या विशिष्ट तार्किक पद्धतीचा अवलंब या सर्व गोष्टींचेमुळें विद्वान् लोक या शास्त्राला चांगलाच मान देतात. व त्याला ‘ शास्त्र ’ ही संज्ञाही अर्पण करतात. जिच्या योगानें या शास्त्राला पंडित मान देतात अशी आणखी ही एक गोष्ट सांगावयाची राहिलीच ज्यांच्या आज्ञा सदैव प्रमाण समजल्या जातील असे जे महत्त्वाचे ग्रंथ आहेत त्यांचा अर्थ कसा लावावयाचा याविषयीं मीमांसेंत नियम सांगून ठेवले आहेत. हे नियम फक्त वेदांचा अर्थ लावण्यापुरतेच उपयोगी आहेत असें नाहीं. धर्मशास्त्रांचा अर्थ लावतांनां सुद्धां या नियमांचा उपयोग केला गेला आणि लोकांचे दररोज पाळावयाचे धार्मिक आचार काय असावेत, लोकांचे हक्क

Indira Gandhi National Centre for the Arts

काय असावेत, त्यांचीं कर्तव्यें कोणचीं असावींत, दत्तविधान, वांटणी, वारसासंबंधीं हक्क इत्यादि कायद्यांतील भानगडी कशा मिटवाव्यात या सर्व गोष्टींचा विचार करतांना मीमांसाशास्त्रांत सांगितलेल्या नियमांशिवाय लोकांचें चालेनासेंच झालें असें ह्मटलें असतां चालेल.

या ठिकाणीं वेदग्रंथाच्या स्पष्टीकरणासंबंधानें जे नियम आहेत त्यासंबंधीं थोडा विचार करणें अस्थानीं होणार नाहीं. ढोबळ मानानें पहातां हे नियम दोन प्रमुख सदरांखालीं येतात. साधारण नियम व विशिष्ट नियम. विधींचा कांहीं विशिष्ट अधिकार आहे, आणि जोंपावतों अर्थवाद हे विधींशीं विसंगत न होतां त्यांची अपूर्णता भरून काढतात तोंपावेतोंच अर्थवादांची प्रमाणता आहे हें पहिल्या वर्गाचें उदाहरण आहे. शुद्धविधि, नियम, व परिसंख्या यांमधील फरक हें दुसऱ्या वर्गाचें उदाहरण होय. मुख्य व गौण (शेष व शेषिन्) यांमध्यें फरक काय हें शोधून काढतांना सहा तत्त्वें, श्रुति लिंग, वाक्य, प्रकरण, स्थान, समाख्या या गोष्टींचा विचार करावा लागतो. व या दोन गोष्टींत जेव्हां वांधा पडेल तेव्हां प्रथम येणारी गोष्ट नंतर येणाऱ्या गोष्टीपेक्षां जास्त बलवान् समजली जाते ( ३, ३, १४ ) हा नियम पहिल्या वर्गांत मोडतो. "विश्वजित् यज्ञांत (यज्ञकर्ता पुरुष) सर्वस्वाचें दान करतो" या वेदवचनाचा अर्थ त्याच्या मालकीचें म्हणून जेवढें कांहीं असेल ( ६, ७, १-२ ) तेवढें तो देऊन टाकतो असें मीमांसेचें जें तत्त्व आहे हें दुसऱ्या वर्गांत ( विशिष्ट नियम ) घातलें जातें. त्याचप्रमाणें रात्रिसत्रासंबंधी वचनें (३,१७, १९) श्येन हें एक यज्ञाचें नांव आहे ही गोष्ट हीं दोन्हीं तत्त्वें दुसऱ्याच वर्गांत मोडतात.

जैमिनीनें स्पष्टीकरणाचे जे नियम दिले आहेत ते नियम व सध्यांच्या काळीं मॅक्स्वेलसारख्या प्रसिद्ध कायदेपंडितांनीं प्रचलित कायद्यांचे अर्थ लावण्याकरतां जे नियम सांगितले आहेत ते नियम पुष्कळ अंशीं सारखे आहेत. तसेंच जैमिनीचे नियम सध्यांच्या हिंदी कायद्यांतील कांहीं नियमांशीं जुळ-

Indira Gandhi National Centre for the Arts

तात. कायद्यांचें स्पष्टीकरण करण्यासंबंधीं पहिला नियम हा कीं, कायद्यांतील शब्दांचा व वाक्यांचा साधारणत: व्यवहारांत त्या शब्दांचा व वाक्यांचा जसा लोक अर्थ करतील तसाच अर्थ करावा मीमांसेचें श्रुति म्हणून जें एक अर्थ ठरविण्याचें साधन आहे त्यांत हाच नियम सांगितलेला आहे. कायद्याचा कांहीं विशिष्ट तऱ्हेनें अर्थ केल्यामुळें कायद्यांतील कांहीं शब्दांचा त्या अर्थाशीं जर अजिबात संबंधच येत नसेल तर तसा अर्थ करूं नये. अर्थात् दुसऱ्या एखाद्या कायद्यामुळें व एकंदर संदर्भामुळें तसा अर्थ करणें भागच पडत असेल तर गोष्ट निराळी आहे वर सांगितलेला निमय मॅक्स्वेलच्या सहाव्या आवृत्तींत ३३ व्या पृष्ठावरच दिलेला आहे. विधींच्या नंतर येणारे अर्थवाद विधींचा अर्थविस्तार करण्याकरतां योजिले असतात. अशा तऱ्हेचें मत पूर्वमीमांसेंत आहे ( १,२,१ व ७ ) याच योगानें या विधींच्या नंतर येणाऱ्या अर्थवादांना कांहीं अर्थच नाहीं अशा तऱ्हेची शंका कोणालाही काढतां येत नाहीं. हें पूर्वमीमांसेंतील तत्त्व मॅक्स्वेलच्या तत्त्वाशीं फारच जुळतें आहे. कायद्याच्या स्पष्टीकरणासंबंधीं आणखी एक असा नियम आहे कीं, अर्थ लावतांना कायद्याच्या सर्व कलमांचा एकदम विचार करावा. प्रत्येकाचा निरनिराळा विचार करणें चूक आहे. त्याचप्रमाणें एखादे शब्दाचे जर दोन परस्परविरोधी अर्थ होत असतील तर जो अर्थ कायद्याच्या एकंदर भावार्थाशीं जुळता असेल तोच आपण घ्यावा. (मॅक्स्वेल पृ. ९५.) जैमिनीमध्येंही आपल्याला हाच नियम सांपडतो [सन्दिग्धेषु वाक्यशेषात् ] मॅक्स्वेल म्हणतो कीं, दोन कायदे परस्परविरोधी आहेत असें आपण होतां होईल तों गृहीत धरूं नये. असा जो विरोध दिसून येतो त्याचें कारण दोन्ही कायद्यांचे हेतु निरनिराळे असतात आणि म्हणून प्रत्येक कायद्याची भाषा त्या कायद्यापुरतीच आहे असें समजून त्याप्रमाणें त्या कायद्याचा अर्थ लावावा. मीमांसाशास्त्रांतही अशाच अर्थाचा नियम दिलेला आहे. मीमांसेंतील नियम असा आहे: कायद्याचा अर्थ करतांना दोन अर्थांपैकीं कोणचाही अर्थ घ्यावा अशाबद्दल सवलत ( म्हणजे विकल्प ) जर द्यावयाची असली तर ती अगदीं सरतेशेवटीं सर्व उपाय हरले म्हणजे द्यावी. ( उदा-

हरणार्थ पुरुषानें तांदुळानें किंवा जवानें यज्ञ करावा किंवा तो षोडषिन् पेला घेतो किंवा घेत नाहीं. याठिकाणीं सवलत देणेंच जरूर आहे ). दुसऱ्या इतर वेळीं विशिष्ट ग्रंथाचा उद्देश विशिष्ट विषयापुरताच आहे असें समजून त्या प्रमाणें अर्थ लावावा. ( विकल्पव्यवस्था ) [ तन्त्रवार्तिक पृ. ९० पहा. एवमेषोऽष्टदोषोपि यद्व्रीहियववाक्ययोः ॥ विकल्प आश्रितस्तत्र गतिरन्या न विद्यते । ' ] हिंदुस्थानच्या 'जनरल क्लॉजेस् ॲक्ट' ( इ. स. १८९७ चा दहावा कायदा ) नांवाच्या कायद्यांत " कायद्यांत जेथें जेथें एकवचनी शब्द उपयोगांत आणला जाईल तेथें तेथें त्या शब्दांत बहुवचनाचा अन्तर्भाव होतो असें समजावें" अशा तऱ्हेचें एक कलम (Section 13 ) आहे. जैमिनीचेंही असेंच मत आहे. ( जैमिनी ३, १, १३-१५ ग्रहैकत्वन्याय) " तो ग्रह ( यज्ञांतील एक भांडें ) विसळतो " या वाक्यांत ' ग्रह ' हा शब्द जरी एकवचनी वापरला असला तरी त्याचा अर्थ सर्व भांडीं असाच करावयाला पाहिजे. मीमांसाशास्त्रांत व धमसूत्रांत दुसऱ्या कांहीं कारणाकरतां वरील वाक्य व त्याचें वरील प्रकारचेंच विवरण दिलेलें आहे. आपण वर पाहिलेंच आहे कीं, मीमांसाशास्त्रांतील नियमाप्रमाणें प्रत्येक वाक्यांत क्रियापद हाच मुख्य शब्द असतो आणि वाक्याचा अर्थ जें कांहीं तरी करावयाचें किंवा घडवून आणवायचें तें कांहींतरी काय हें सांगावयाचें हा असतो; तेव्हां ज्याच्यासंबंधानें कांहीं तरी सांगितलें जातें तो कर्ता गौण ठरतो. आणि म्हणून त्या कर्त्याचे जे गुण ( किंवा विशेषणें ) वाक्यांत सांगितलेले असतात त्यांचा वाक्यांतिल मुख्यार्थाशीं कांहीं एक संबंध येऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ, आपण नारदाचें एक वाक्य घेऊं. एकत्र कुटुंबांतील बंधूंचीं धर्मकृत्यें सारखीं असावींत ! या ठिकाणीं ' बंधु ' हा शब्द एकत्र कुटुंबांत रहाणाऱ्या पुरुषांचें विशेषण आहे, आणि म्हणून एकत्र कुटुंबांतील जे जे कोणी पुरुष असतील ( मग ते चुलते, पुतणे कोणीही असोत ) त्यांनाही वरील नियम लागू आहे. ( व्यवहारमयूख मंडलिकांची आवृत्ति पृ. ५० पहा ].

Indira Gandhi National Centre for the Arts

जैमिनीच्या मीमांसाशास्त्रांत विशिष्ट नियमांसंबंधीं ग्रंथकाराची वृत्ति बरीच उदार अशी आढळून येते. सध्यांच्या स्त्रियांची परवशता दूर करण्याच्या प्रयत्नाच्या काळांत जैमिनीच्या मताप्रमाणें पुरुष व स्त्री या दोघांनाही यज्ञकर्मांत सारखाच अधिकार आहे ही गोष्ट सुधारकांना खात्रीनें उत्तेजनकारक वाटेल. ( ६, १, ८ ) जैमिनीच्या मतें स्त्रियांचा क्रयविक्रय करणें निषिद्ध आहे. वेदांत कांहीं ठिकाणीं अशा क्रयविक्रयाचा उल्लेख आहे; तो होत असलेल्या गोष्टींचा निदर्शक नसून सांकेतिक अगर लाक्षणिक आहे. ( 'जिला पतीनें विकत घेतलेली असूनही परपुरुषाबरोबर राहते' या अर्थाचीं वेदांतील वाक्यें सांपडतात ). मनूनें स्त्रिया, दास आणि पुत्र यांना स्वतःचें असें धन असूं शकत नाहीं, असें जरी म्हटलें आहे तरी पण वेदवचनाप्रमाणें स्त्रियांचें स्वतःचें असें धन असूं शकतें. ( ६, १, १६ ). यजमानानें आपल्या पत्नीसमवेत यज्ञ करावा. ( ६, १, १७ ) अशा तऱ्हेचीं आजच्या सुधारकांच्यासाठीं उदार मतें जैमिनीनें त्या काळांत बोलून दाखविलीं होतीं. शद्राला यज्ञ करण्याचा अधिकार आहे असें जैमिनीनें म्हटलें नाहीं हें खरें आहे ( ६, १, २५–२८ ). पण याचें कारण शूद्रांना अशा तऱ्हेचा अधिकार आहे असा वेदांत कोठेंही उल्लेख नाहीं म्हणूनच जैमिनीनें त्यांना यज्ञ करण्याचा अधिकार आहे असें म्हटलें नाहीं. शूद्र हे जातीनें नीच आहेत म्हणून त्यांना यज्ञ करण्याचा अधिकार नाहीं असें जैमिनीनें केव्हांही म्हटलें नाहीं हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. त्या काळांतसुद्धां बादरानें ( ६, १, २७ ) शूद्रांना यज्ञ करण्याचा अधिकार आहे असें प्रतिपादन केलें होतें. रथकार हे पहिल्या तीन वर्णांचे नसूनसुद्धां त्यांना पवित्र अग्नि विधिपूर्वक प्रज्वालित करण्याचा अधिकार होता. ( ६, १, ५५ ) आणि निषाद जातीच्या राजाला तर रुद्रयाग [बौधायनसूत्र । ९२ (ब्राह्मणात्......शूद्रायां निषादः आणि २, २, २९ द्विजातिप्रवराच्छूद्रायां जातो निषादः ] करण्याचा अधिकार होता. ( ६, १, ५१ ) निषादाला रुद्रयाग करावयाचा अधिकार आहे या तत्त्वाच्या आधारावर व्यवहारमयूखांत शूद्रानें ब्राह्मणाकरवीं होम करून

Indira Gandhi National Centre for the Arts

विधियुक्त दत्तक घ्यावा असें प्रतिपादिलें आहे. शुद्धिविवेक ग्रंथाच्या कर्त्यांचे व इतर जुन्या मतांच्या पंडितांचे मतें शूद्राला दत्तक घेण्याचा अधिकार नाहीं. कारण दत्तविधानाला वेदमंत्रयुक्त होमाची आवश्यकता आहे व असा होम शूद्राला करतां येत नाहीं. बनारसच्या भट्ट घराण्यांतील पंडितांनीं मीमांसा व धर्मशास्त्र या ग्रंथांचा विशेष प्रकारें अभ्यास केला होता, आणि त्या घराण्यांतील वंशजांचे स्त्रियांच्या वारश्याच्या हक्कसंबंधी विचार फार प्रागतिक होते. विवाहित मनुष्यसुद्धां दत्तक घ्यावयाला कोणचीही हरकत नाहीं अशा तऱ्हेचे विचार त्यांनीं प्रदर्शित केलेले आहेत. या भट्ट घराण्यांतील पुरुषानेंच छत्रपति शिवाजी महाराज यांचे राज्याभिषेकप्रसंगीं प्रमुख असा भाग घेतला होता.

मीमांसाशास्त्राचे मतें ( ६, ७, ३, ) राजा हा आपल्या राज्याचा पूर्णपणें मालक नाहीं. एखादा मनुष्य आपल्या मालकीचें शेत दुसऱ्याला बक्षीस देऊ शकतो किंवा विकूं शकतो; तसें राजाला करतां येत नाहीं [ न भूमिः स्यात् सर्वान् प्रत्याविशिष्टत्वात् ] मुंबई इलाख्याच्या लँड रेव्हिन्यू कोडाच्या ३७ व्या कलमांत जें राजाच्या स्वैर मालकीचें तत्त्व ग्रथित केलें आहे त्यापेक्षां मीमांसेचें हें तत्त्व प्रजापक्षाला जास्त अनुकूल आहे. व्यवहारमयूखांत राजानें कुळाकडून जमिनीचा फक्त खंड घ्यावा, जमिनीवर मालकी शेतकऱ्यांची असावी असें म्हटलें आहे. [ संपूर्णपृथ्वीमंडलस्य तत्तद्ग्रामक्षेत्रादौ स्वत्वं तु तत्तद्भौमिकादीनामेव राज्ञां तु करग्रहणमात्रं (मंडलिक पृ. ३२ ) ]. या ठिकाणीं व्यवहारमयूखानें मीमांसेचाच आधार घेतला आहे. विश्वजित् यज्ञांत यज्ञकर्त्या पुरुषाला स्वर्वस्वाचें दान करतां येतें पण त्याला आपली पत्नी व इतर नातलग लोक यांचें दान करतां येत नाहीं कारण या लोकांचेवर त्याची मालकी ( अर्थात् कायदेशीर ) नसते असें मीमांसेचें एक तत्त्व आहे. या तत्त्वाधारें व्यवहारमयूखानें मनुष्याची आपल्या बायकोवर व मुलांवर ( कायदेशीर ) मालकी नाहीं असें प्रतिपादन केलें आहे. [ गवादादिव भार्यायां स्वःत्वाभावेन तस्यामुत्पन्नेऽपत्ये तदभावात् ( मंडलीक पृ. ३२ ) हें मत मिताक्षरेंत ग्रथित केलेल्या मताच्या विरुद्ध दिसतें. याज्ञ २, १७४]

Indira Gandhi National Centre for the Arts

कालानुसार स्मृतींची संख्या वाढली आणि त्यांचा अर्थ लावणें दिवसें-दिवस कठीण होऊं लागलें. तेव्हां धर्मशास्त्रावरील निबंधलेखकांचें मीमांसेकडे लक्ष वेधलें. मीमांसाशास्त्रांत वेदवचनाचा अर्थ लावण्यासंबंधीं फार सुलभ, सप्रमाण, व तार्किक कसोटीस उतरणारे असे नियम आहेत हें आपण मागें पाहिलेंच आहे. वरील निबंधकारांना मीमांसाशास्त्राची तर्कपद्धति पसंत पडली व त्यामुळें मीमांसाशास्त्रांतील तर्कशास्त्राचा धर्मशास्त्राचा अर्थ लावतांना सर्रास उपयोग केला जाऊं लागला. मेधातिथि, विज्ञानेश्वर यांच्यासारखे प्रख्यात ग्रंथकार धर्मशास्त्रीय-ग्रंथावर टीका लिहीत असतांना प्रत्येक ठिकाणीं विधि, नियम, परिसंख्या, अर्थवाद, यांसारख्या मीमांसेंतील शब्दांचा उपयोग करूं लागले. उदाहरणार्थ, याज्ञवल्क्य १८१ हा श्लोक, विधि, नियम किंवा परिसंख्या आहे यासंबंधानें मिताक्षराटीकेंत बरेंच मोठें विवेचन आहे. त्याचप्रमाणें मिताक्षरा व त्यासारखेच इतर ग्रंथ यांत अर्थवाद या शब्दांचा बराच उपयोग केला गेला आहे. उदाहरणार्थ "एखादा मनुष्य जर आततायीप्रमाणें आपल्यावर चालून येऊं लागला तर तो गुरु असो, लहान मूल असो, विद्वान् ब्राम्हण असो किंवा वृद्ध मनुष्य असो, तो कोणीही असो, त्याचें आपण मागेंपुढें न पाहातां पारिपत्य केलेंच पाहिजे " हा श्लोक मिताक्षरेचे मतें निव्वळ अर्थवाद आहे. ही आज्ञा खास नव्हे. " द्विजातीनें धर्मच्छल होत असतांना, स्वसंरक्षणा-करितां, गोमातेचें रक्षण करण्याकरतां, आणि युद्धसमयीं शस्त्राचा जरूर उपयोग करावा " असा एक नियम आहे. ह्या नियमाचें विवेचन करण्या-करतां म्हणून आपण वर उद्धृत केलेला आततायीविषयींचा श्लोक सांगितलेला आहे. आणि म्हणूनच मिताक्षरेचे मतें तो अर्थवाद आहे. ) "पिता जिवंत असतांनां मुलांनीं संपत्तीची मग ती त्यांच्या जन्मानंतर त्यांनीं मिळविलेली कां असेन , वांटणी करून घेऊं नये. वडिलांचे हयातींत मुलांना अशा तऱ्हेची वांटणी करून घेण्याचा अधिकार नाहीं कारण त्यांना संपत्तीच्या व धर्माच्या बाबतींत स्वतंत्रताच नाहीं " असें शंखाचें मत आहे.

मीमांसा शास्त्राचे नियम व त्यांचा धर्मशास्त्राशीं संबंध application

Indira Gandhi National Centre for the Arts

व्यवहारमयूख ह्या उताऱ्यासंबंधानें विवेचन करतांना आपलें मत अशा तऱ्हेनें वाचकापुढें मांडतो. वरील उताऱ्यातील मुलांना स्वतंत्रता नसण्यासंबंधानें जो भाग आहे तो निव्वळ अर्थवाद आहे. पहिल्या भागांत वडिलांच्या हयातींत मुलांनीं जिंदगीची वांटणी करून घेऊं नये म्हणून सांगितलें आहे. हें तत्त्व जास्त विशद करून सांगण्याकरतां दुसरा भाग तेथें घातला आहे. यापलीकडे त्य वाक्याचा जास्त कांहीं एक उद्देश नाहीं. [ पूर्वनिषेधार्थवादार्थानन्तरास्वातन्त्र्योक्तिः मण्डलिक पृ. ३१ ] यावरून " मीमांसाशास्त्रांतील विवेचनांत अर्थवाद ही एक फार महत्त्वाची अशी संज्ञा आहे, पण धर्मशास्त्राच्या परिभाषेंत ती संज्ञा गाळून टाकली आहे, असें जें कीथ साहेबांचें मत आहे [ कर्ममीमांसा पृ. ९९ ] तें अगदीं बरोबर नाहीं असें आपल्याला दिसून येईल. आपण मागें पाहिलेंच आहे कीं, क्रत्वर्थ विधि ह्मणजे बंधनकारक आज्ञा आहेत. त्या आज्ञा न पाळल्या तर यज्ञ पूर्ण झाला असें समजलें जात नाहीं. पुरुषार्थविधींचें तसें नाहीं. या आज्ञा निव्वळ उपदेशात्मक आहेत. या जर न पाळल्या तर यज्ञपूर्ति होत नाहीं असें नाहीं. नीतिदृष्ट्या यज्ञकर्ता हा उत्तम पुरुष समजला जाणार नाहीं येवढेंच कायतें. हा दोन विधींमधील महत्त्वाचा फरक धर्मशास्त्रांतही घेतला गेला आहे. याज्ञवल्क्य म्हणतो, (१,५३) कीं, विवाहेच्छु पुरुषानें जिला रोग नाहीं, जिला बंधु आहे व जी सगोत्र किंवा सप्रवर नाहीं अशा मुलीशीं विवाह करावा. या उताऱ्यांतील शेवटला भाग क्रत्वर्थ आहे आणि पहिल्या दोन गोष्टी पुरुषार्थ आहेत. मिताक्षरेचे मतें कोणाही पुरुषाचा सपिंड, सगोत्र व समवर मुलीशीं पति या नात्यानें संबंध होऊं शकत नाहीं. रोगी मुलीशीं किंवा भाऊ नसलेल्या मुलीशीं जर एखाद्यानें लग्न केलें तर तो मनुष्य प्रत्यक्ष दिसून येणाऱ्या गोष्टीच्या उलट वागल्यामुळें फार तर दोषास पात्र होईल [ सापिण्डासु समानगोत्रासु सप्रवरासु भार्यात्वमेव नोत्पद्यते । रोगिण्यादिषु तु भार्यात्वे उत्पन्नेपि दृष्टविरोध एव ।; व्यवहारमयूखाशीं ताडून पहा ( मंडलीक पृ. ३९ ) ] ! पण तें लग्नमात्र अशास्त्र होणार नाहीं. रोगी स्त्रीशीं विवाह केल्यानें संसारांत सुख होत नाहीं,

Indira Gandhi National Centre for the Arts

संतति रोगी होते ,वगैरे परिणाम दृश्य आहेत ). मनु एके ठिकाणीं ( ९, १६८ ) म्हणतो " आईनें किंवा बापानें संकटांत सापडल्यामुळें आपला मुलगा जर दुसऱ्याला देऊन टाकला तर घेणाऱ्या मनुष्यानें त्या मुलाला आपला दत्तक मुलगा समजून त्याचें परिपालन केलें पाहिजे. यावर मिताक्षरा म्हणते ( या. १२८-१३२ ) 'ज्या अर्थीं मनूच्या वाक्यांत ' 'संकटांत सांपडल्यामुळें' असे शब्द वापरले आहेत त्या अर्थीं दुसऱ्या कोणात्याही प्रसंगीं आपला मुलगा दुसऱ्याला देऊं नये. ही बंदी मुलगा देणाऱ्याला लागू आहे, घेणाऱ्याला नाहीं. देणाऱ्यानें मुलगा दिलाच तर तें दत्तविधान अशास्त्र होत नाहीं. ही बंदी पुरुषार्थ आहे क्रत्वर्थ नव्हे. [ व्यवहारमयूख ( मंडलीक पृ. ३९ ) पहा. अयं निषधो दातुरेव पुरुषार्थो न क्रत्वर्थः इति विज्ञानेश्वरः । तन्न इत्यादि ] त्याचप्रमाणें एके ठिकाणीं मिताक्षरा म्हणते ' वडिलोपार्जित मिळकतीला धक्का न लावतां जें कांहीं ( धन ) एखाद्या मनुष्यानें मिळविलें असेल ' हें याज्ञवल्क्याचें वाक्य खालील चार वाक्यांतील प्रत्येकाशीं संयुक्त आहे ( शेष ). येथें मिताक्षरा जैमिनीच्या तिसऱ्या पुस्तकांतील भाषेचा उपयोग करीत आहे ( शेष, व शेषिन् संबंधीं ) असें स्पष्ट दिसतें, मुख्य व गौण यांचा संबंध काय असतो, व ग्रंथांतील तत्त्वें परिस्थितीला कशी लागू करावयाचीं हें ठरवितांना मीमांसा 'क्रमा'चा उपयोग करते. ' कांहीं ठिकाणीं फक्त शब्द कोणच्या पद्धतीनें वाक्यांत घातलेले आहेत ( पाठक्रम ) येवढ्याकडेच आपण काळजीपूर्वक पाहून त्याप्रमाणें अर्थबोध करून घ्यावयाचा व कांहीं ठिकाणीं शब्दरचनेकडे फारसें लक्ष न देतां कोणच्या पदार्थांचा कोठें निर्देश केला आहे, व कोणची क्रिया केव्हां घडली आहे इकडे लक्ष देऊन अर्थबोध करून घ्यावयाचा ' असें मीमांसा आपल्याला सांगते. अशा वेळीं शब्दांच्या रचनेंत बदल करणेंही केव्हां केव्हां जरूर पडते. कायद्याच्या वाङ्मयांत ह्या दोन्ही तत्त्वांचा उपयोग केला जातो. उदाहरणार्थ, बंधूंचे तीन प्रकार आहेत. आत्मबंधु, पितृबंधु व मातृबंधु. शास्त्रांत हे तीन प्रकार एकानंतर एक अशा रीतीनें दिले आहेत. तेव्हां



Indira Gandhi National Centre for the Arts

या बंधूंपैकीं ( वारश्याकरतां ) कोणाला अगोदर पसंत् करावें हें ठरवितांना "ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें आपली पसंती आपण दर्शवावी असें नीलकंठ आपल्याला सांगतो म्हणजे प्रथम आत्मबंधु यावेत. नंतर पितृबंधु यावेत व सरतेशेवटीं मातृबंधु यावेत असें नीलकंठांचें मत आहे; याज्ञवल्क्यांत ( २, १३७ ) अरण्यवासी ऋषींची जें संन्याशाची व ब्रह्मचाऱ्याची संपत्ति त्याचे मरणानंतर अनुक्रमें गुरु, सच्छिष्य व सहाध्यायी यांचेकडे वारसहक्कानें जाते असें ह्मटलें आहे. या उताऱ्यासंबंधीं लिहितांना मिताक्षरा म्हणते कीं, याज्ञवल्क्यांत वारसांची जी यादी दिली आहे, ती व्युत्क्रमानें ( ह्मणजे उलट ) वाचावी ह्मणजे ती संपत्ति पहिल्याप्रथम सहाध्यायाला तो नसल्यास सच्छिष्याला व तोही नसल्यास गुरूला मिळावयास पाहिजे व व्यवहाराला हें मत धरून आहे. या नकारदर्शक शब्दाची व्याख्या ठरविण्याचे कामीं मीमांसेंत बरीच मेहनत घेतलेली आहे. कांहीं ठिकाणीं शब्दाचा उपयोग अमुक एक गोष्ट निषिद्ध आहे असे सांगण्याकडे होतो; कांहीं ठिकाणीं त्याचा उपयोग अपवाद दर्शविण्याकरितां होतो आणि कांहीं ठिकाणीं तो शब्द नुसता अर्थवाद असतो. जेव्हां एखाद्या ग्रंथांत अमुक एक गोष्ट करावी असें सांगितलें असतें व तितक्याच महत्त्वाच्या दुसऱ्या एखाद्या ग्रंथांत ती करूं नये असें सांगितलें असतें तेव्हां दुसऱ्या ग्रंथांतील वचनाला 'प्रतिषेध' असें म्हणतात ( पूर्वमीमांसा १०,८,६ ) याला उदाहरण तो षोडशिन् अतिरात्रांत घेत नाहीं. हें वचन आहे. पण अशा तऱ्हेचीं परस्परविरोधी वचनें समोर आलीं ह्मणजे वाचकाला वाटेल तें वचन अंगिकारावयाची सवलत मिळते. आणि अशा तऱ्हेची सवलत मिळणें ही कांहीं मोठीशी चांगली गोष्ट नाहीं. कारण त्या योगानें दोन्ही ग्रंथांचें वजन कमी होतें. तेव्हां ह्या अडचणींतून मुक्त होण्याकरितां नकारदर्शक जें वचन असेल तें अपवाद ( पर्युदास ) किंवा अर्थवाद असें समजावें. या पर्युदासासंबंधींच्या मुद्यासंबंधानें पूर्वमीमांसेंत ( १०,८,१-४ ) नियम दिलेला आहे व त्यावर पुष्कळशीं उदाहरणेंही दिलीं आहेत. [ १०, ८, ४. अपि तु वाक्यशेषः स्याद-

Indira Gandhi National Centre for the Arts

न्याय्यत्वादिकल्पस्य विधीनामेकदेशः स्यात्. ] "अनुयाजांत तो ( पुरुष ) 'ये यजामहे' या शब्दांचा उपयोग करीत नाहीं" असें जेव्हां म्हटलें जातें तेव्हां त्या वाक्याचा अर्थ तसें करणें निषिद्ध आहे असा होत नाहीं. त्याचा अर्थ अनुयाग सोडून बाकीच्या प्रसंगीं 'ये यजामहे' हे शब्द वापरणें जरूर आहे असा होतो. ( या ठिकाणीं नकारार्थी अव्ययाचा संबंध 'करोति' कडे नसून 'अनुयाऽजेषु' या शब्दाकडे आहे ). कांहीं ठिकाणीं सबंध नकारदर्शक वाक्यचे वाक्यच अनुवाद असतें ( अनुवाद हा अर्थवादाचाच एक भाग आहे ). असें वाक्य निव्वळ विधींची स्तुति करण्याकरतां, किंवा विधि नसलेल्या गोष्टी महत्त्वाच्या नाहींत हें दर्शविण्याकरतां उपयोगांत आणलें जातें. उदाहरणार्थ "पवित्र असा अग्नि नुसत्या जमिनीवर, आकाशांत किंवा स्वर्गांत प्रज्वलित करूं नये.' अशा अर्थाचें एक वेदवचन आहे. आतां आकाशांत अग्नि प्रज्वलित करणें शक्य नाहीं हें प्रत्येकाला माहीत आहे. तेव्हां या वाक्याचा उद्देश जमिनीवर प्रथम सुवर्ण ठेवून नंतर त्यावर अग्नि प्रज्वलित करावा या विधीचा पुनरुच्चार व स्तुति करावयाचा आहे. निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे हा निव्वळ अर्थवाद आहे. ही गोष्ट पूर्वमीमांसेंत जास्त स्पष्ट रीतीनें सांगितलेली आहे. १. २. ५. आणि १८ आणि १०. ८. ७. वगैरे. "ठेव, गहाण वस्तु ( pledge ) मुलगा व पत्नी हीं कोणालाही देऊन टाकतां येत नाहींत" ह्या नारदवचनाचें व 'आपल्या पत्नीचें व मुलाचें नुकसान न होईल अशा रीतीनें पुरुषाला कांहींही दान करतां येतें" ह्या ( २, १, १५ ) या याज्ञवल्क्य वचनाचें विवरण करतांना व्यवहारमयूखानें 'पर्युदास' व 'अनुवाद' या तत्त्वांचा उपयोग करून घेतला आहे [ मंडलीक पृ. ७७ 'निक्षेपं पुत्रदारांश्च सर्वस्वं चान्वये सति । अदेयान्याहुराचार्या यच्चान्यस्मै प्रतिश्रुतम् । अत्र पुत्रदारान्तेषु स्वत्वाभावात्तद्विषये नान्तरिक्षे न दिवीतिवन्निषेधानुवादमात्रम् । एतेन स्वकुटुंबाविरोधेन देयं दारासुतादृते इति याज्ञवल्कीयः पर्युदासोपि

व्याख्यात: ] स्वत:चें म्हणून जें कांहीं असेल तें माणसाला खुशाल दुसऱ्याला देऊन टाकतां येतें ही गोष्ट खरी आहे, पण आतांपर्यंत आपण पुष्कळ वेळ पाहिलें आहे कीं, ठेवींची, स्त्रीची व मुलांची ( कायदेशीर ) मालकी पुरुषाला नसते, तेव्हां जी गोष्ट सर्वांना माहीत आहे तीच येथें पुन्हा एकदां सांगितलेली आहे. हा नुसता 'नित्यानुवाद' आहे. मनूंत प्रथम 'नियोगपद्धतीला' मान्यता दर्शविली आहे ( ९, ५२. ff ) आणि नंतर ती त्याज्य आहे असेंहीं म्हटलें आहे. तेव्हां नियोग योग्य कीं त्याज्य हा प्रश्न आपोआपच उद्भवतो. या ठिकाणीं लोकांना सवलत द्यावयाची कीं काय या प्रश्नासंबंधानें विचार करतांना मिताक्षरा ( यज् २. १२७ ) म्हणते कीं, या ठिकाणीं लोकांना सवलत देऊं नये. मिताक्षरेचे मतें मनूनें नियोगपद्धति निषिद्ध आहे असेंच म्हटलें आहे. नियोगाला मनूनें जी सम्मति दर्शविली आहे ती निव्वळ आपद्धर्म म्हणूनच आहे व तिचा उपयोग फार जपून करावयाला पाहिजे. एखाद्या कुमारिकेचा वाङ्निश्चय होऊन लग्न होण्यापूर्वीं जर तिचा नियोजित पति वारला. आणि नंतर त्या मुलीचें त्या मनुष्याच्या भावाशींच जर लग्न ठरलें तर त्या मुलीच्या बाबतींत नियोगपद्धतीचा अंगिकार क्षम्य आहे. आगन्तुकांना शेवटीं बसवावे या न्यायाचा उपयोग व्यवहार मयूखांत मनुष्याचे मरणानंतर त्याचे उत्तराधिकारी कोण याची चर्चा करतांनां केलेला आहे.

[ पर्वमीमांसा ५, २, १९ आणि ६ ३. ९ व शबर १०. ५. ४. युक्तं यद्वास्तव्यैराक्रान्ते देशे आगन्तुर्जनोऽ संभवादन्ते निविशते ] मनु ह्मणतो "मातेच्या मरणानंतर आजीकडे पित्याच्या मातेकडे वारसा जातो. (९, २१७) याज्ञवल्क्य, 'विधवा, मुलगी, मुलीचा मुलगा, माता पिता, बंधु, बंधूचा मुलगा' अशी उत्तराधिकाऱ्यांची एक यादीच्या यादीच देतो. यावरून याज्ञवल्क्याच्या यादींतील वारस सरले कीं मग आजीकडे वारसा जातो असें दिसतें. याच बाबतींत विवादताडवांतही वरील युक्तिवादाचेंच अनुकरण केलेलें आहे.

Indira Gandhi National Centre for the Arts

इंग्रजी कोर्टांतील हिंदु कायदा, व तो सूत्रबद्ध करण्याची जरूरी.

आतां आपण ब्रिटिश अमलांतील हिंदु कायद्याकडे वळूं या. निरनिराळ्या कायद्यान्वयें, व सरकारी ठरावान्वयें (उदाहरणार्थ गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९१५, ५ व ६ जॉर्ज पांचवे प्र. ६१ कलम ११२ ) पुष्कळसे तंटे ब्रिटिश कोर्टांना पक्षकारांच्या व्यक्तिविषयक कायद्याचे आधारें तोडावेत असें ठरलें आहे आणि म्हणून हिंदुंच्या, वारसा, उत्तराधिकार, लग्न, धार्मिक संस्था, दत्तविधान, इस्टेटीची वांटणी, बक्षिसपत्रें, मृत्युपत्रें वगैरे प्रकरणांत हिंदूंना त्यांचा हिंदू कायदा लाविला जातो. निबन्धलेखकांच्या वेळीं हिंदु कायद्याचें जें स्वरूप होतें तें आतां राहिलें नाहीं. इंग्रजी कायद्यांनीं जुन्या हिंदु कायद्यांत बराच फरक घडवून आणला आहे; उदाहरणार्थ इ. स. १८५० चा २१ वा कायदा ( धर्मस्वातंत्र्यासंबंधीं कायदा ), १८७० चा २१ वा कायदा हिंदु मृत्युपत्रासंबंधीं कायदा ), इ. स. १८८२ चा ४ था कायदा ( तबदिलीसंबंधानें कायदा ), १८७५ चा ९ वा कायदा ( हिंदु पुरुष सज्ञान केव्हां होतो यासंबंधीं कायदा ), १८९० चा ८ वा कायदा ( पालक व अज्ञान यांच्यासंबंधीं कायदा ), इ. स. १९१६ चा १५ वा कायदा ( हिंदू लोकांचे स्वतःची मालमत्ता देण्यासंबंधीं काय अधिकार आहेत, यासंबंधीं कायदा ) वगैरे वगैरे, पण इतक्यानेंच हा धुमाकूळ संपला नाहीं. जुना हिंदु कायदा आजच्या हिंदुंना लावतांनां प्रचलित ब्रिटिश कोर्टांनीं त्यांत बरींच नवीं तत्वें घुसडून दिलीं आहेत व त्याचे परिणामही विलक्षणच झाले आहेत. खरोखर पाहूं गेलें असतां ब्रिटिश कोर्टांची स्वतःची अशी मुळीं सुद्धां चूक नाहीं. त्यानीं त्यांच्या समोर असणाऱ्या मुद्यांसंबंधीं हिंदु कायद्याचें ( अर्थात् जुन्या ) काय म्हणणें आहें हें प्रामाणिकपणें समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना तो जसा दिसला त्याप्रमाणें ते वागले. पण ब्रिटिश कोर्टांच्या मार्गांत पहिल्यापासूनच कित्येक अडचणी होत्या. ब्रिटिश कोर्टांतील जे वरिष्ठ असे न्यायाधीश होऊन गेले त्यांचेपैकीं कोलब्रूक व सर जॉर्ज नॉक्स यांचेसारखे हाताचे बोटांवर मोजण्यासारखे

Indira Gandhi National Centre for the Arts

न्यायाधीश सोडून बाकीच्या सर्वांना संस्कृत भाषा मुळींच अवगत नसे. सर्व हिंदु कायदा संस्कृतामध्येंच असल्याकारणानें या न्यायाधिशांना भाषांतरावर अवलंबून रहावें लागे. ब्रिटिश अमदानीच्या ऐन सुरवातीला अशा तऱ्हेचीं फक्त तीनच भाषांतरें अस्तित्वांत होतीं. तीं हीं, हॅलहेडचें जंतु (Gentoo) कोड, सर वुइल्यम जोन्सचें मनुस्मृतीचें भाषांतर आणि कोलब्रूकचें जगन्नाथाच्या ग्रंथाचें भाषांतर ( इ. स. १७९६ ). याशिवाय इसवी सनाच्या एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत दायभाग, व्यवहारमयूख, मिताक्षरा ( इ. स. १८१० ), दत्तकमीमांसा, व दत्तकचन्द्रिका ( इ. स. १८२१ ) या ग्रंथांची कोलब्रूक, बोराडेल ( Borradaile ) सदरलंड वगैरे सारख्या विद्वानांनीं इंग्रजींत भाषांतरें केलीं. इ. स. १८६५ नंतर पूर्वेकडील धर्मग्रंथमालेंत ( Sacred Books of the East Series ) धर्मसूत्रांचें भाषांतर प्रसिद्ध झालें. स्मृतिचंद्रिकेच्या कांहीं भागांचें भाषांतर कृष्णस्वामी अय्यर यांनीं केलें, तसेंच ॰. सी. टागोर यांचें विवादाचिंतामणीचें आणि सरकारचें वीरमित्रोदयाचें अशीं दोन भाषांतरें त्याचवेळच्या सुमारास प्रसिद्ध झालीं. इतकेंही जरी झालें तरी बराचसा हिंदू कायदा तसाच राहिला. इंग्लिश न्यायाधीशांना संस्कृत येत नसल्यामुळें, व हिंदु धर्मग्रंथांतील कोणचा ग्रंथ कोणच्या परिस्थितींत, कोणच्या काळीं कशाकरतां लिहिला गेला, याची त्यांना मुळींच कल्पना नसल्यामुळें फारच घोंटाळा माजला. उदाहरणार्थ बेनिप्रसाद वि॥ हरदाई बिबि या खटल्यांत (I.L.R.14 All.67) मीमांसाशास्त्राचा प्रवर्तक जैमिनी हा ख्रिस्ती शकाच्या तेराव्या शतकांत होऊन गेला असें त्या खटल्यांतील एका बाजूच्या विद्वान् कायदे पंडितानें न्यायाधिशांनां सांगितलें ( पृ. ७० पहा ). गुजराथेंत व्यवहारमयूखाचा अधिकार सर्वांत जास्त कां समजला जातो याचेंही असेंच कारण आहे. व्यवहारमयूख हा ग्रंथ मराठ्यांनीं आपल्याबरोबर प्रथम गुजराथेंत नेला. ऐन इंग्रजीच्या सुरवातीला गुजराथेंत पंडित यांतूनच कायद्याचे आधार पहात. आणि त्यानंतर फारच लवकर या ग्रंथाचें इंग्रजींत भाषांतर झाल्या-

Indira Gandhi National
Centre for the Arts

मुळें न्यायाधीश व वकील यांना त्यांतील आधार पाहणें सोपें जाऊं लागलें. यामुळें गुजराथेंत व्यवहारमयूख हाच कायद्याचा ग्रंथ आहे असें इंग्लिश न्यायाधिशांना वाटून त्याप्रमाणें त्यांनीं निवाडे दिले. गुजराथेंत व्यवहार-मयूख हाच सर्वांत श्रेष्ठ असा कायद्याचा ग्रंथ ठरला. खरें पाहूं गेलें असतां नीलकंठाचे कुटुंबांतील मंडळी प्रथम महाराष्ट्रांतून काशीला गेली, आणि तेथें नीलकंठानें एका बुंदेले संस्थानिकाच्या आश्रयानें आपला ग्रंथ लिहिला. चंडिकाबक्ष विरुद्ध मुना कुंबर ( I. L. R. 24 All 273 ) या मुकद्दम्यांत प्रीव्ही कौन्सिलमधील न्यायाधिशांनीं व्यवहारमयूखाच्या बोराडेलच्या ( Seoke's Hindu Laws chap. 4, ) चुकीच्या भाषांतराचा आधार घेतल्यामुळें " मेलेल्या भावाचा मुलगा हा आपल्या चुलत्याचे बरोबर वांटणींत हिस्सा मागूं शकतो " अशा तऱ्हेचा चमत्कारिक निकाल दिला. एवढ्यानेंच झालें नाहीं. सदहू न्यायाधिशांनीं आम्ही जो वर मयूखाचे म्हणण्याप्रमाणें निकाल दिला आहे तो गुजराथेंतील रिवाजांना धरूनच आहे असेंही एक विधान आपल्या निकालांत करून ठेवलें. ह्या विधानाला खरें पाहूं गेलें असतां कांहीं एक आधार नाहीं, असें येथें फार दुःखानें ह्मणावें लागतें. चुकीच्या भाषांतरावर अवलंबून राहिल्यामुळें हा सर्व घोंटाळा झाला. व्यवहारमयूख हा गुजराथेंतील सर्वांत वरिष्ठ असा कायद्याचा ग्रंथ आहे असें ज्या वेळीं समजलें जात होतें त्यावेळीं सुद्धां त्यांतील तत्त्वें सर्व ठिकाणीं अमलांत आणलीं जात नव्हतीं. सावत्र भावांना आजाचे बरोबरीनें वारशांत हक्क प्राप्त होण्यासंबंधीं, मुलीचा मुलगा दत्तक घेण्यासंबंधीं तसेंच बहिणीचा अगर मावशीचा मुलगा दत्तक वरच्या तीन वर्णांनीं घेण्यासंबंधीं व्यवहारमयूखाचे जे नियम आहेत तेही पूर्णपणें अमलांत आणले जात नसत. व्यवहारमयूखाचा अधिकार या ठिकाणीं मानला न जाण्याचें कारण हें होतें. दत्तविधानासंबंधीं दत्तकमीमांसा व दत्तकचन्द्रिका असे जे दोन ग्रंथ आहेत त्यांचें मत दत्तक प्रकरणांत सर्वमान्य समजलें जातें. जेव्हां या दोन ग्रंथांत मतभेद होतो

Indira Gandhi National
Centre for the Arts

तेव्हां बंगाल प्रांतांत व दक्षिणेकडील प्रांतांत दत्तकचन्द्रिकेचें मत जास्त ग्राह्य समजलें जातें व दत्तकमीमांसेचें मत बनारस व मिथिला या प्रांतांत ग्राह्य समजलें जातें. ( भगवान्सिंग विरुद्ध भगवानसिंग I. L. R. २१ All. at ४१९ तसेंच २२ Mad. ३९८ at ४११–१२ हाही निवाडा पहा ) दत्तकचन्द्रिका हा ग्रंथ स्मृतिचंद्रिका या ग्रंथाच्या कर्त्यानें लिहिला आहे अशी जी पूर्वी समजूत होती ती चुकीची आहे, ही गोष्ट आतां जगजाहीर झाली आहे. ही टीका कोलब्रूकच्या एका पंडितानें लिहिली असावी व ती स्मृतिचंद्रिकाकारानें लिहिली आहे असें दडपून सांगून तिचा उपयोग एका मुकदम्यांत करून घेतला असावा असा तर्क आहे. मिताक्षरा हा ग्रंथ बंगाल-खेरीज सर्व हिंदुस्थानांत कायद्याचे बाबतींत प्रमाण समजला जातो. बंगाल-मध्यें दायभागाला जास्त महत्त्व दिलें जातें. असें असूनसुद्धां ब्रिटिश कोर्टातील सर्वांत वरिष्ठ न्यायाधिशांनीं कुटुंबाला कसची जरूर नसतांना सुद्धां एकत्र कुटुंबांतील एखाद्या मनुष्याला आपला हिस्सा दुसऱ्याला योग्य किंमत घेऊन विकण्याचा अधिकार ( जो मिताक्षरा ग्रंथांत नाहीं तो ) दिला आहे. मुलाची मुलगी व मुलाची विधवा यांना उत्तराधिकारी होतां येतें असें म्हटलें आहे.

तसेंच एखाद्या स्त्रीला दुसऱ्या स्त्रीकडून मिळालेलें, किंवा उत्तराधिकारी या नात्यानें तिच्याकडे आलेलें धन हें कायद्याच्या दृष्टीनें खास तिचें असें स्त्रीधन होऊं शकत नाहीं असाही निवाडा दिला आहे. ( शिव शंकर लाल विरुद्ध देवी सहाइ (I. L. R. २५ All. ४६८ P. C.) हे निवाडे जुन्या हिंदु कायद्याला धरून नाहींत.

ब्रिटिश कोर्टातील न्याय धिशाच्यासंबंधानें जें वर मत प्रदर्शित केलें आहे तें त्यांच्यावर कटु टीका करण्याच्या उद्देशानें केलेलें नाहीं. हें मत प्रदर्शित करण्यांत लेखकाचा एकच हेतु आहे. सध्यांच्या हिंदु कायद्याची स्थिति शोचनीय आहे. हिंदु धर्मशास्त्रांत कायद्याचेसंबंधांत प्रमाण असे समजले

Indira Gandhi National Centre for the Arts

जाणारे कांहीं ग्रंथ आहेत. त्या ग्रंथांत हिंदु कायद्याचीं म्हणून जीं कांहीं तत्वें सांगितलेलीं आहेत त्यांत ब्रिटिश कोर्टांनीं आपल्या निवाड्यांनीं पुष्कळच फरक घडवून आणला आहे. यामुळें जुन्या मताचे लोक नाराज झालेले आहेत. बरें ! कायद्यांत परिस्थित्यनुरूप सुधारणा झाली पाहिजे असें म्हणणारे लोक सध्यांच्या स्थितींत खूष आहेत असें म्हणावें तर तसेंही नाहीं. विसाव्या शतकांतिल न्यायमूर्तींना हिंदु कायद्यासंबंधीं निकाल देतांना मध्ययुगीन कायद्याप्रमाणें विचार करून तसा निकाल द्यावा लागतो. यामुळें न्यायाधिशांच्या मनांत असूनसुद्धां आजच्या परिस्थितीला योग्य असे कायद्याचे नियम अमलांत आणतां येत नाहींत. यामुळें सुधारणा करण्याची इच्छा असूनसुद्धां न्यायमूर्तींना ती एक तर करतां येत नाहीं, व आली तरी फार हळूं हळूं करतां येते. यामुळें सुधारणावादी लोक सुद्धां नाखूषच असतात. या लोकांनीं पाश्चात्य कायद्यांचें अध्ययन केलें असल्यामुळें त्यांच्या समतेच्या कल्पना जास्त विस्तृत व उदार झालेल्या असतात. त्यांना या विसाव्या शतकाच्या काळांत लग्न, वारसा, एकत्र कुटुंब या व इतर गोष्टींत कायद्याचे बाबतींत जास्त सुधारणा पाहिजे असते. हें सर्व कसें व्हावयाचें ? हिंदुस्थानांत आज सुमारें दीडशें वर्षें ब्रिटिश कोर्टें न्यायदान करीत आहेत. त्यांनीं दिलेल्या निवाड्याचे भराभर ग्रंथ आतांच झाले आहेत; त्याचप्रमाणें कांहीं विद्वानांनींही कायद्यावर ग्रंथ लिहिले आहेत. या सर्व संग्रहांतून हिंदू कायदा शोधून काढावयाचें काम फार जिकीरीचें व त्रासदायक आहे. सध्यां हिंदुस्थानांतील बराचसा दुसरा कायदा सूत्रबद्ध आहे ( Codified ) हिंदु कायदा सूत्रबद्ध करण्याचे मार्गांत साठ वर्षांपूर्वीं पुष्कळ अडचणी होत्या. त्यावेळेस त्या दृष्टीनें प्रयत्न करणें शक्यहीं नव्हतें. पण आतां तें काम कायदेमंडळानें हातीं घ्यावयाला कांहीं हरकत नाहीं. सध्यां हिंदु कायदा सूत्रबद्ध नसल्यामुळें कांहीं विविक्षित बाबतींत आपण कोठें आहोंत हें पक्षकाराला कळतच नाहीं. ते बिचारे आपले कज्जे भांडतच असतात; पैसे खर्च करीतच असतात. नुसत्या कज्जांचा फैसला होण्यापूर्वीं कित्येक दिवस पक्षकारांना काळजींत काढावे लागतात, व सर-

Indira Gandhi National
Centre for the Arts

तेशेवटीं हिंदु कायद्याच्या मुद्यासंबंधानें काय निकाल होईल याची दोन्ही पक्षांना खात्री नसते. कायदा सूत्रबद्ध केल्यामुळें हा सर्व त्रास चुकेल. कायदा सूत्रबद्ध करणें सर्वस्वी चांगलें आहे, त्यांत तोटे मुळींच नाहींत असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं. कायदा एकदां सूत्रबद्ध केला गेला कीं त्यांत बदल करून घेणें फार कठीण जातें. समाज पुढें जात असतो व बदलेल्या परिस्थितींत त्याला जास्त प्रागातिक अशीं कायद्याचीं तत्त्वें पाहिजे असतात. पण कायदा सूत्रबद्ध असल्यामुळें तो नेहमीं कालाच्या मागेंच रेंगाळतो व त्यामुळें त्यासंबंधीं लोकांत पुष्कळ वेळां असंतोष उत्पन्न होतो. कांहींही झालें तरी सध्यांच्या परिस्थितींत हिंदु कायदा सूत्रबद्ध नसल्यामुळें आज जो त्रास होत आहे त्यापेक्षां कायदा सूत्रबद्ध केल्यामुळें खात्रीनें कमी त्रास होईल. कायदा हा कालाबरोबर आपोआपच सुधारणार नाहीं हें खरें, पण कायदेमंडळाला त्यांत परिस्थिती-प्रमाणें नवीन कलमें घालून किंवा जुन्यांत जरूर तो बदल करून वाटेल ती सुधारणा करून घेतां येईल. सध्यां कायद्यांत सूत्रबद्धता नसल्यामुळें लोकांना दररोजच्या व्यवहारांतसुद्धां पुष्कळ वेळां अडचणी उद्भवतात. एखादे वेळेस एखादें हायकोर्ट आपल्या निकालांत एकादें तत्त्व प्रस्थापित करतें, त्या तत्त्वाचा आधार घेऊन त्या तऱ्हेनें दुसरेंही पुष्कळ फैसले होतात. अमूक एका मुद्यावर अमूक एक कायदा अशा खात्रीनें लोक वागूंही लागतात त्यानंतर प्रीव्ही कौंसिलच्या न्यायाधिशापुढें एखादा खटला गेला असतांना त्या खटल्याचे संबंधांत वरील न्यायमूर्ती एखादें नवीनच तत्व जाहीर करतात. त्याचा परिणाम एखादे वेळेस हिंदुस्थानांतील हायकोर्टांनीं दिलेले निवाडे चुकीचे आहेत असें म्हणण्यासारखा होतो. त्यामुळें मागील मुकदम्यांत हरलेल्या लोकांना स्फुरण येतें. फिरून कज्जेदलाली वाढते. कोर्टाचें काम वाढतें व गरीब लोकांचें मात्र नुकसान होतें व इतकेंही करून त्या मुद्यावर कायदा काय आहे याचा कांहीं चांगलासा निर्णय झालेला नसतो. मी काय म्हणतों हें खालील दोन निवाड्यांचे हकीगतीवरून वाचकांचे ध्यानांत येईल. बापानें जर कांहीं कर्ज काढलेलें असलें व तें कर्ज जर बेकायदेशीर किंवा अनी-

Indira Gandhi National Centre for the Arts

तीच्या कामाकरतां काढलेलें नसलें तर त्या पुढें कर्जाच्या फेडीचा बोजा बाप जिवंत असला तरी देखील सर्व इस्टेटीवर पडतो. मुलांचे हिस्से त्यांतून सुटत नाहींत, तेव्हां त्या कर्जावरून फिर्याद लावून सर्व इस्टेट सावकारांना विक्रीला काढतां येते. अशा तऱ्हेचा कायदा हायकोर्टाच्या ठरावान्वयें प्रस्थापित झाला होता. या तत्वाबरहूकूम दुसरेही अनेक निवाडे झाले होते. पुढें शाहूराम विरुद्ध भूपासिंग ( I. L. R. ३९ All ४३७ ) हा कज्जा विलायतेंत प्रीव्ही कौंसिलपुढें अपीलांत गेला त्या खटल्याचा निकाल देतांना न्यायमूर्तींनीं आपलें कांहीं मत तेथें प्रदर्शित केलें. याचा परिणाम पूर्वीपासून बरेच दिवस हिंदुस्थानांत चालू असलेला बापाच्या जुन्या कर्जात इस्टेट हर्रास होण्याचा कायदा बदलला गेला असें कांहीं कायदेपंडित म्हणूं लागले. पुन्हां कांहीं दिवस घोटाळा माजला. सरते शेवटीं ब्रिज नारायण विरुद्ध मंगलाप्रसाद ( २६ Bom L. R. ५०० ) या खटल्यांत प्रीव्ही कौंसिलमधील न्यायाधिशांनीं हिंदुस्थानांत शाहुरामच्या खटल्याचा पूर्वी चालू असलेलाच कायदा बरोबर होता असा निकाल दिला. मराठ्यांचे मुलखांत पति जर एकत्र कुटुंबांत असतांना मेला तर त्याच्या विधवेला दत्तक घेतां येत नाहीं अशा तऱ्हेचा कायदा बरेच दिवसांपासून होता. पण यादव विरुद्ध नामदेव या मुकदम्यांत ( I· L. R. ४९ Cal १ ) प्रीव्ही कौंसिलनें अशा परिस्थितींत विधवेला नवऱ्याच्या नातेवाइकाच्या संमतीशिवाय दत्तक घेतां येतो. नवऱ्यानें आपल्या बायकोला मरणाचे वेळीं दत्तक घेण्याची बंदी केली नसली म्हणजे झालें असा निकाल दिला. अशा तऱ्हेनें दत्तक घेतलेल्या मुलाला समाईकांतील जिंदगीचा वांटा मिळूं शकतो कीं नाहीं या महत्त्वाच्या मुद्यावर वरील खटल्यांत न्यायमूर्तींनीं आपलें मतच दिलें नाहीं. या निकालामुळें कोर्टातील मुकदम्यांना जणूं काय पीकच आलें. एखाद्या ग्रंथांतील उताऱ्यावर पूर्वीच्या टीकाकारांचा त्याच्या अर्थासंबंधीं जरी मतभेद नसला तरी सध्यांचे न्यायाधीश क्वचित् त्याचा आपल्याला वाटेल तसा अर्थ करतात. त्यामुळें निरनिराळ्या हायकोर्टांत एकाच उताऱ्याचे निरनिराळे अर्थ होतात.त्यामुळें त्याचा खरा अर्थ काय आहे याचा

Indira Gandhi National Centre for the Arts

कोणालाच-अगदीं कसलेल्या कायदेपंडिताला सुद्धां उलगडा होत नाहीं. आणि म्हणून कोर्टांतील मुकदम्यांना निव्वळ सट्टयांचें स्वरूप येतें, मुलगा दत्तक दिला कीं मग त्याला आपल्या जन्मदात्या पित्याचें नांव पुनः लावतां येत नाहीं व दुसऱ्या जिंदगींत त्या मुलाचा कांहींएक हक्क रहात नाहीं. असें मनु एके ठिकाणीं म्हणतो. [ ९ 142 ] या मनूचे वचनाचे आधारावर मद्रासच्या हायकोर्टानें खालील तऱ्हेचा निकाल दिला (I. L. R. 29 Mad. 437) एखादा मनुष्य आपल्या कुळांत जर एकटाच पुरुष असला व तो त्या कुटुंबाच्या इस्टेटीचा पूर्ण मालक असला तर तो मनुष्य नंतर जरी दुसऱ्या कुटुंबांत दत्तक दिला गेला तरी त्याचा स्वतःच्या कुळांतील त्याचेकडे आलेल्या इस्टेटीवरचा हक्क नष्ट होत नाहीं. आतां वर सांगितलेल्या मनूच्या वचनाचा निराळाच अर्थ करून दत्तात्रय विरुद्ध गोविंद या खटल्यांत ( I. L. R. ४० Bom ४२९ ) हायकोर्टानें निराळाच निर्णय दिला आहे. एखादी इस्टेट एखाद्या माणसाला वारशांत मालकी हक्कानें जरी मिळाली असली व त्यानंतर तो दुसऱ्या कुळांत दत्तक दिला गेला तर दत्तविधानामुळें पूर्व कुटुंबांतील इस्टेटीवरचा त्याचा हक्क नष्ट होतो. अशा तऱ्हेचा हा निवाडा आहे. हा निकाल दुसऱ्या कोणच्याही कारणामुळें बरोबर असेल, पण तो वर सांगितलेल्या मनुवचनावर भिस्त ठेवून दिला गेला आहे असें जर कोणाचें म्हणणें असलें तर मग तो निकालाच चुकीचा आहे, असें फार दुःखानें म्हणणें भाग आहे, कारण वर सांगितलेल्या मनुवचनाचा असा अर्थच होत नाहीं. येथें मनूच्या वचनाचा अर्थ करतानांच चूक झालेली आहे असल्या एका चुकीला पूर्वमीमांसेंत वाक्यभेद—एका वाक्यांत दोन नियम सांगणें असें म्हणतात जेव्हां जेव्हां एकाच वाक्यांतून दोन निरानिराळे नियम काढले जातात तेव्हां तेव्हां अशी चूक घडून येते [ ( तन्त्रवार्तिक पृ. ५५५ ) बहवो ह्यर्था युगपदेकेन संबध्यन्ते नच तावता वाक्यं भिद्यते । अनेकविधितोहि वाक्यभेदः उक्तः स चात्र नास्त्येव फलस्याविधेयात् । शबरभाष्य पृ. १ व १४४ पहा तेथें वाक्यभेदाचीं उदाहरणें सांपडतील ] मुंबईच्या मुकदम्यांत मनूच्या वचनाचा जसा अर्थ लावला तसाच जर आपण घेतला

Indira Gandhi National Centre for the Arts

तर त्या वचनापासून दोन नियम निघूं शकतील. त्यांपैकी पहिला अर्थ हा एखाद्या मनुष्याला त्याच्या कुळांतील इस्टेट वारसहक्कानें प्राप्त झाल्यावर तो जर दुसऱ्या कुळांत दत्तक दिला गेला तर पहिल्या ( त्यानें ज्या कुळांत जन्म घेतला त्या ) कुळांतली. जी इस्टेट त्याला मिळाली होती तिच्यावरील त्याचा हक्क नष्ट होतो. तसेंच मनूच्या वचनाचा दुसरा अर्थ खालीलप्रमाणें होईल. एखादा मनुष्य जर दुसऱ्या कुळांत दत्तक दिला गेला आणि दत्तविधानानंतर त्याच्या पहिल्या कुळांतली इस्टेट जरीं वारस हक्कानें त्याच्याकडे येत असली तरी दत्तक गेल्यामुळें त्याचा पहिल्या कुळाचा अजीबात संबंध तुटल्यामुळें ती इस्टेट त्याला घेतां येणार नाहीं. मीमांसा शास्त्रांत खालील अर्थाचें एक वचन आहे. जेव्हां एखाद्या वाक्यांत एखादी झालेली गोष्ट व एखादी होणारी गोष्ट यांचा बरोबर निर्देश केला असेल तेव्हां झालेली गोष्ट हा शब्दही शब्दसमुच्चय होणारी गोष्टीच्या उपयोगासाठीं योजिलेला [पूर्वमीमांसेवरील शबराचें भाष्य ९. १. ९ पहा. [ भूतभव्यसमुच्चारणे च भूतं भव्यायोपादिश्यते हेच शब्द शबर भाष्यांत पुष्कळ वेळ आढळून येतात. ( १२. ४. ६. ) त्याचप्रमाणें त्याच न्यायाकरतां तन्त्रवार्तिक पृ. ३८९ व ९९२ पहा ]. मुंबई कोर्टानें वरील निवाड्यांत मनूचा केलेला अर्थ मीमांसेंतील वरील नियमाचे विरुद्ध आहे. मनूच्या वचनाप्रमाणें दत्तक ही 'झालेली गोष्ट' आहे. तेव्हां या झालेल्या गोष्टीचा संबंध पुढें होणाऱ्या गोष्टीशीं असणें रास्त आहे. कांहींही असलें तरी ह्या झालेल्या गोष्टीचा ( दत्त विधानाचा ) संबंध ती गोष्ट होण्यापूर्वी घडलेल्या गोष्टीशीं असणें शक्य नाहीं, तेव्हां या नियमांत दत्तविधानानंतर कशी परिस्थिति असावी येवढाच विचार केला आहे, असें स्पष्टपणें दिसून येतें.

हिंदु कायद्याचें सूत्रीकरण कसें करावें यासंबंधानें विस्तारपूर्वक विवेचन करावयाचें हें स्थळ नव्हे. हिंदु कायद्यांतील निरनिराळ्या सांप्रदायांत ( Schools ) इतके मतभेद, व मतवैचित्र्य आहे कीं, सर्व हिंदुस्थानकरतां

Indira Gandhi National Centre for the Arts

एकच सूत्रबद्ध कायदा करणें शक्य नाहीं. पण प्रत्येक प्रांतांतील हिंदु कायदा तेवढ्या प्रांतापुरता सूत्रबद्ध करणें शक्य आहे. हिंदुकायद्याचें एकसूत्रीकरण करणें जरूर आहे ह्या विषयीं एकदां एकमत झालें कीं तें करण्याकरतां एक नियुक्तमंडळ ( Committee ) बसविलें पाहिजे. त्यांत विद्वान् कायदेपंडित तर पाहिजेतच, पण त्याशिवाय संस्कृतभाषाकोविद व मीमांसाशास्त्राचें अध्ययन केलेले व इंग्रजी भाषा जाणणारे असे डॉक्टर झा यांचेसारखे लोकही पाहिजेत.

**मीमांसाविद्यालयाचा उपयोग.**

प्राचीन हिंदुस्थानांतील संस्कृतीचें पुनरुज्जीवन व्हावें व आपल्या वाङ्मयांत जें कांहीं चांगलें आहे तें राखलें जाऊन त्यांत भर पडावी अशी आपणां सर्वांची सदिच्छा असणें साहजिक आहे. मीमांसाशास्त्र हा आपल्या हिंदी वाङ्मयाचा अत्यंत महत्त्वाचा असा एक भाग आहे. या उपयुक्त शास्त्राचें अध्ययन करण्याची संधिच आजपर्यंत मिळत नव्हती. आतां आज जें विद्यालय उघडलें गेलें आहे त्यांत या शास्त्राचे अध्ययनाची चांगली सोय झालेली आहे. त्यामुळें आतां लोक या शास्त्राचे अध्ययनांत जास्त लक्ष घालूं लागतील यांत शंका नांहीं. आतां येथें कांहीं लोक विचारांत बरेच पुढें गेलेले असे असतील ते म्हणतील " तुम्ही मीमांसाशास्त्राचे अध्ययनासाठीं एक संस्था काढून ती येथील न्यू पूनाकॉलेजला जोडलीत हें ठीक केलेंत पण आजच्या सुधारणांच्या काळांत येथें 'अग्निहोत्र-दिवाणखाना ' बांधण्याची कांहीं जरूरी नव्हती. या आक्षेपाला आपल्याला थोडक्यांत उत्तर देतां येईल. उत्तम प्रयोगशाला सहाय्याला असल्याशिवाय कोणीही मनुष्य या दिवसांत रसायनशास्त्राचा अभ्यास करणें मनांतसुद्धां आणणार नाहीं. तसेंच उत्तम शस्त्रक्रियामंदिर नसलें तर कोणीही शस्त्रक्रिया शिकूं इच्छिणार नाहीं. अग्निहोत्राचा दिवाणखाना हा मीमांसाशास्त्राची प्रयोगशाळाच आहे असें आपण म्हटलें तरी चालेल. दर्शपूर्णमास व दुसरे किरकोळ विधि हे कसे करतात हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय मीमांसा-

Indira Gandhi National Centre for the Arts

शास्त्रांतील जुने ग्रंथ विद्यार्थ्यांस चांगल्या रीतीनें समजणें शक्य होणार नाहीं. पण याहीशिवाय अग्निहोत्रास दिवाणखाना ठेवण्याचें आणखी एक महत्त्वाचें कारण आहे. आपल्या जुन्या तत्त्वज्ञानाप्रमाणें व धर्माप्रमाणें जगांत एकंदर तीन मार्ग आहेत हें सर्वांना माहीत आहेच. कर्ममार्ग भक्तिमार्ग व ज्ञानमार्ग, सध्यां हिंदुस्थानांत लाखों लोक असे आहेत कीं, ज्यांचा कर्ममार्गावर विश्वास आहे व ज्यांना अग्निहोत्राचें पालन करणें हें एक पवित्र कर्तव्य वाटत असतें. तेव्हां जावत्कालपर्यंत आपण आपला जुना धर्म व तत्त्वज्ञान सोडून द्यावयाला तयार नाहीं, जावत्कालपर्यंत आपण आपला उज्वल असा भूतकाल विसरावयाला तयार नाहीं, तावत्कालपर्यंत ज्या शिक्षणसंस्थेला आपल्या विद्यार्थ्यांना पौरस्त्य अशा दोन्हीही विद्या शिकवावयाच्या आहेत. ज्या शिक्षणसंस्थेला आपल्या विद्यार्थ्यांना परधर्मसहिष्णु बनवावयाचें आहे त्या शिक्षणसंस्थेनें थोड्याशा विचारानें पुढें गेलेल्या लोकांचें समाधान व्हावें म्हणून अग्निहोत्राचा दिवाणखाना उघडण्याचा बेत सोडून देऊन त्यामुळें एखादी मोठी अशी देणगी टाकून देणें इष्ट होणार नाहीं.

सरतेशेवटीं या विद्यालयाचा शिक्षणप्रसारक मंडळीच्या मदतीनें दिवसेंदिवस उत्कर्ष होवो. या विद्यालयानें लोकांना मीमांसाशास्त्राचें अध्ययन करावयाला उत्तेजन मिळो आणि या विद्यालयांत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हातून भविष्यकाळीं सामाजिक, राजकिय व कायद्यासंबंधीं जे कांहीं गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवतील ते यशस्वितेनें सोडविण्याचें सामर्थ्य त्यांना येवो अशी परमेश्वराची प्रार्थना करून मी माझें आजचें भाषण संपवितों.

---

I.G.N.C.A. LIB.
9-12387
GOVT. OF INDIA
Indira Gandhi National Centre for the Arts

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें
व प्रो. दिनकर बळवंत देवधर, यांनीं मीमांसा वियालय,
खजिन्याचे विहिरीजवळ, आंबील ओढा रोड,
सदाशिव पेठ, पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.

Indira Gandhi National
Centre for the Arts